CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह
धाराशिव | बुधवार, १५ जुलै २०२६ । वर्ष ४ थे अंक १२६ । पाने १२+८ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026. | dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



**राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तृतीय सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांचा आज तिथीप्रमाणे स्मृतिदिन**

समाज समर्थ असणे हे व्यक्ती आरोग्यसंपन्न असण्यासारखेच आहे. कोणत्याही देशातील समाज सामर्थ्यसंपन्न असेल, तरच तो प्रगती करू शकतो, स्वतःचे रक्षण करू शकतो. समाजाचे सामर्थ्य तो एकात्म आणि संघटित असण्यात आहे. म्हणून समाज संघटित असण्याची आवश्यकता परिस्थितिनिरपेक्ष म्हणावी लागते.

**- स्व. बाळासाहेब देवरस**
रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

# त्रिभाषा धोरणाला स्थगिती नाही

सुप्रीम कोर्टाचा निर्वाळा



## । भाषा शिकल्याने ज्ञानात भर
## । सीबीएसईला अंमलबजावणीचा तपशील सादर करण्याचा आदेश

**नवी दिल्ली, १४ जुलै**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई ) शाळांमध्ये त्रिभाषा धोरण सक्तीचे करण्याच्या निर्णयाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. भाषा शिकल्याने ज्ञानात भर पडते. त्यामुळे या धोरणाला विरोध करणे अयोग्य आहे असून, या निर्णयाच्या अंमलबजावणीचा सविस्तर तपशील सीबीएसई व केंद्र सरकारने एका आठवड्यात सादर करावा, असे आदेश मंगळवारच्या सुनावणीत न्यायालयाने दिले. याप्रकरणावर पुढील सुनावणी २२ जुलै रोजी होणार आहे.

सीबीएसईने राष्ट्रीय शिक्षण धोरणाच्या (एनईपी) धर्तीवर इयत्ता ९ वी आणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी तीन भाषा शिकणे अनिवार्य केले आहे, ज्यात दोन भारतीय भाषांचा समावेश असणे आवश्यक आहे. या धोरणाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेत निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी करण्यात आली. याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील आनंद ग्रोवर, ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि गोपाल शंकरनारायणन यांनी बाजू मांडताना सांगितले की, त्रिभाषा धोरण अचानक लागू करण्यात आल्याने विद्यार्थ्यांवर



अतिरिक्त अभ्यासाचा ताण पडेल आणि भाषा निवडीच्या स्वातंत्र्यावर गदा येईल, असा युक्तिवाद केला. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. जॉयमाल्य बागची आणि न्या. व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने याचिकाकर्त्याच्या वकिलाने सादर केलेल्या युक्तिवाद अमान्य करत स्पष्ट केले की, कोणतीही भाषा शिकल्याने नुकसान होत नाही, उलट ज्ञानात भर पडते. शिक्षण धोरणाशी संबंधित अशा महत्त्वपूर्ण विषयावर दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्याशिवाय कोणताही अंतरिम आदेश दिला जाऊ शकत नाही. याचिकाकर्त्याने केलेल्या दाव्यात ठोस कारण नाही, त्यामुळे त्रिभाषा धोरणाला स्थगिती देता येणार नाही. ◂ (वृत्तसंस्था)

### परिपत्रक रद्दचा आदेश देण्यास नकार

केंद्र सरकार आणि सीबीएसईने धोरणाच्या अंमलबजावणी संदर्भात सविस्तर माहिती सादर करावी. पुढील सुनावणी आता २२ जुलै रोजी होणार असून, त्या दिवशी केंद्र सरकार आणि सीबीएसई आपले स्पष्टीकरण न्यायालयासमोर मांडतील. तोपर्यंत सीबीएसई शाळांमध्ये सध्याचे तीन भाषांचे धोरण पूर्ववत लागू राहील. सीबीएसईने १५ मे रोजी शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून त्रिभाषा धोरण लागू करण्यासंबंधीचे जारी केलेले परिपत्रक रद्द करण्याचा आदेश देणार नसल्याचे देखील न्यायालयाने स्पष्ट केले. ■

### याचिकाकर्त्यांच्या आक्षेपाला ठोस आधार नाही

याचिकाकर्त्यांची बाजू मांडताना ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी म्हटले की, नवीन धोरणानुसार विद्यार्थ्यांना इयत्ता पाचवीपासून सतत शिकत असलेल्या भाषा सोडाव्या लागतील. याव्यतिरिक्त, इंग्रजीला 'गैर मूळ' भाषा मानले गेले. शाळांना अचानक भाषेचे पर्याय बदलण्यास भाग पाडले गेले, तर शिक्षक आपली नोकरी गमावू शकतात. इयत्ता ७ वी, ८ वी आणि ९ वीचे असे विद्यार्थी ज्यांनी आधीच दोन परदेशी भाषा निवडल्या आहेत, ते त्याच भाषा पुढे चालू ठेवू शकतील. मात्र, त्यांना यासोबत एक भारतीय भाषा देखील शिकावी लागेल.यामुळे त्यांच्यावर अभ्यासाचा ताण येऊ शकतो. याचिकाकर्त्यांच्या आक्षेपाला ठोस आधार नसल्याचे स्पष्ट करत न्यायासनाने त्यांची मागणी फेटाळून लावली. ■

# भोजशाला वाग्देवीचे मंदिर



**सर्वोच्च न्यायालयाचा उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास नकार**

**नवी दिल्ली, १४ जुलै**

मध्य प्रदेशातील धार येथील भोजशालेला वाग्देवी देवीचे मंदिर म्हणून घोषित करणाऱ्या उच्च न्यायालयाच्या आदेशाला स्थगिती देण्यास सर्वोच्च न्यायालयाने नकार दिला. तथापि, मुस्लिमांना शुक्रवारी नमाज अदा करण्यासाठी परिसराजवळ एक पर्यायी मोकळी जागा उपलब्ध करून देण्यात यावी, असा आदेश न्यायालयाने दिला. मुस्लिम पक्षाने मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देत न्यायालयाच्या आदेशावर अंतरिम स्थगिती आणि स्थिती पूर्ववत करण्याची मागणी करणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या आहेत. या याचिकांवर मंगळवारी सरन्यायाधीश सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि व्ही. मोहना यांच्या न्यायासनाने सुनावणी केली.

सुनावणीदरम्यान, न्यायालयाने मध्य प्रदेश सरकार, केंद्र सरकार आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाला नोटीस बजावली आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाच्या परवानगीशिवाय भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभाग इमारतीत कोणतेही संरचनात्मक बदल करणार नाही, असे निर्देशही दिले.

मुस्लिम पक्षाचे प्रतिनिधित्व करणारे ज्येष्ठ वकील हुजैफा अहमदी, अभिषेक मनु सिंघवी आणि मीनाक्षी अरोरा यांनी जोरदार युक्तिवाद केला. ◂ (वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### सेन्सेक्स ५६१ अंकांनी घसरला

**मुंबई** : भू-राजकीय तणावामुळे कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि कमकुवत जागतिक संकेतांमुळे मंगळवारी भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण पाहायला मिळाली. दोन्ही प्रमुख निर्देशांक मोठ्या घसरणीसह बंद झाले. मंगळवारी बाजाराची सुरुवात निराशाजनक झाली. निफ्टी ५० निर्देशांक २४,१०० च्या खाली घसरला. सत्रादरम्यान विक्रीचा दबाव सातत्याने वाढला. विशेषतः आयटी, ऑटो आणि बँकिंग शेअर्समध्ये मोठी घसरण झाली. यामुळे निर्देशांक २४,००० च्या पातळीजवळ पोहोचला.

### मोशी दुर्घटना : प्रकल्प प्रमुखाला अटक

**पिंपरी** : मोशी कचरा डेपोतील वेस्ट टु एनर्जी प्रकल्पाच्या इमारतीवर कचऱ्याचा ढीग कोसळून झालेल्या दुर्घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला. या प्रकरणी ठेकेदार अन्टोनी लारा रिन्युएबल कंपनीचे प्रकल्प प्रमुख आणि सुरक्षा अधिकारी यांच्यावर भोसरी एमआयडीसी पोलिस ठाण्यात सोमवार, १३ जुलै रोजी रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला. प्रकल्प प्रमुख अशोककुमार गुप्ता व सुरक्षा अधिकारी विजय सपकाळ अशी या आरोपींची नावे आहेत. गुप्ता यांना अटक करण्यात आली. ■

# एल निनोचा प्रभाव तीव्र
## जुलै-ऑक्टोबरपर्यंत कमी पाऊस

**नवी दिल्ली, १४ जुलै**

मान्सूनवर एल निनोचा प्रभाव अधिक तीव्र असल्याचे दिसून येत असून, जून महिन्याच्या तुलनेत जुलैमध्ये अत्यल्प पाऊस राहणार असल्याचा अंदाज हवामाना विभागाने वर्तवला आहे. दुसरीकडे युरोपियन सेंटर फॉर मीडियम रेंज वेदर फोरकास्ट्सच्या (ईसीएमडब्लूएफ)च्या नव्या अहवालातही जुलै ते ऑक्टोबर दरम्यान भारतात पाऊस अत्यल्प राहणार असल्याचे म्हटले आहे.

अहवालानुसार महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि कर्नाटक राज्यात सरासरीपेक्षा कमी पाऊस राहणार असून, जूनच्या तुलनेत जुलैमध्ये पाऊस खूपच कमी राहणार आहे.

एल निनो आधीच्या अंदाजांपेक्षा अधिक मजबूत झालेला आहे. तसेच, त्याचा प्रभाव ऑगस्ट ते ऑक्टोबर या महिन्यांपर्यंत कायम राहण्याची शक्यता आहे. दुसरीकडे महाराष्ट्रात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात काही भागात सरासरीपेक्षा अधिक पाऊस नोंदवला. मात्र, राज्यातील अनेक भाग अजूनही कोरडे आहेत. ◂ (वृत्तसंस्था)



उत्तर प्रदेशात शासकीय जमिनीवरील अवैध बांधकामाविरोधात प्रशासनाची कारवाई सुरूच आहे. संभल जिल्ह्यातील माधान गावात सरकारी जमिनीवरील बेकायदेशीर बांधकामावर प्रशासनाने बुलडोजर चालविला

### पक्षात फूट नाही : सुनील तटकरे

**मुंबई** : अजित पवार गटाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार यांच्या निवडीला आव्हान देणाऱ्या सच्चिदानंद सिंह यांच्या नोटिशीला आवश्यकता भासल्यास कायदेशीर उत्तर देण्याबाबत प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मंगळवारी सांगितले. नोटीसमधील मुद्द्यांचा अभ्यास करून कायदेशीर सल्ला घेऊन गरज भासल्यास कायदेशीर मार्गाने प्रत्युत्तर दिले जाईल, अन्यथा या नोटिशीकडे दुर्लक्ष केले जाईल, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली.

पक्ष कार्यालयात पत्रकारांशी बोलताना तटकरे यांनी सिंह यांच्या आरोपांना कोणताही आधार नसल्याचे ठामपणे सांगितले. ■

# रामाला काल्पनिक ठरवणाऱ्यांनी धर्म शिकवू नये : गोविंददेव गिरी

**पुणे, १४ जुलै**

अयोध्या येथील श्रीराम मंदिर दानपेटीतील कथित अपहाराची विशेष तपास पथकाकडून (एसआयटी) चौकशी सुरू आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्ट या चौकशीमध्ये प्रशासनाला पूर्णपणे सहकार्य करत असून दोषींवर कठोर कारवाई व्हावी, अशी ट्रस्टचीदेखील मागणी आहे. मात्र, या प्रकरणात काही राजकीय पक्षांकडून जाणीवपूर्वक राजकारण केले जात आहे. यामध्ये राजकारण करणारे एकेकाळी राम काल्पनिक असल्याचे सांगत होते. त्यामुळे रामाला काल्पनिक ठरवणाऱ्यांनी धर्म शिकवू नये, असे प्रतिपादन श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे कोषाध्यक्ष स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांनी केले.

मंदिर दानपेटीतील अनियमिततेप्रकरणी स्वामी



गोविंददेव गिरी महाराज राजीनामा देणार असल्याची चुकीची माहिती काही प्रसारमाध्यमांतून प्रसारित झाल्यानंतर याबाबतचे स्पष्टीकरण देण्यासाठी त्यांनी पुण्यातील तीर्थ क्षेत्र ट्रस्टच्या धर्मश्री या निवासस्थानी पत्रकार परिषद आयोजित केली होती. यावेळी आपल्या राजीनाम्याबाबतच्या सर्व बातम्यांचा त्यांनी स्पष्ट शब्दांत निषेध केला. तसेच ट्रस्टवर आलेल्या या कठीण काळात ट्रस्टच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हे आपले कर्तव्य असून, राजीनामा देण्याचा कोणताही विचार नसल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.

ते म्हणाले की, दानपेटीत अपहार झाला असून ही बाब अत्यंत वेदनादायी आहे. मात्र, दानपेटीतील रक्कम मोजण्याचे काम सामंजस्य कराराद्वारे स्टेट बँक ऑफ इंडियाकडे सोपवण्यात आले होते. सध्या या प्रकरणात जे आरोपी अटकेत आहेत, ते सर्व बँकेचे कर्मचारी आहेत. त्यामुळे कर्मचाऱ्यांची निवड आणि त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी प्रामुख्याने बँकेची होती, असे त्यांनी नमूद केले. तथापि, स्थानिक स्तरावर ट्रस्टच्या वतीने जे पर्यवेक्षण होणे आवश्यक होते, त्यामध्ये काही प्रमाणात शिथिलता आल्याची कबुली त्यांनी दिली. मंदिराचे व्यवस्थापन अधिक सुव्यवस्थित करण्यासाठी ट्रस्ट आता व्यावसायिक दृष्टिकोन स्वीकारणार असून, लवकरच एका सीईओची नियुक्ती केली जाणार आहे, अशी माहिती त्यांनी दिली. ◂ (तभा वृत्तसेवा)

### संयुक्त खात्यासाठी स्टॅम्प पेपरची अट रद्द

**मुंबई, १४ जुलै**

राज्यातील लाखो निवृत्तीवेतनधारकांसाठी राज्य सरकारने एक अत्यंत दिलासादायक आणि महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. निवृत्तीवेतनासाठी बँकेत संयुक्त बचत खाते उघडल्यानंतर सादर करावे लागणारे शपथपत्र आता स्टॅम्प पेपरऐवजी साध्या कागदावर देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

यापूर्वीच्या नियमांनुसार, निवृत्तीवेतनधारकांना संयुक्त खाते उघडल्यावर १०० रुपयांच्या जनरल स्टॅम्प पेपरवर शपथपत्र लिहून द्यावे लागत होते. दरम्यानच्या काळात, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील सुधारणेनुसार हे शुल्क ५०० रुपये करण्यात आले होते. मात्र, शासनाच्या दुसऱ्या एका परिपत्रकानुसार शासकीय कार्यालयांमध्ये सादर करावयाच्या सर्व प्रकारच्या प्रतिज्ञापत्रांवर मुद्रांक शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

# भारतीय खलाशांच्या जहाजावर इराणचा हल्ला
## एक ठार; 'होर्मुझ'मध्ये अमेरिकेची नाकाबंदी सुरू

**दुबई, १४ जुलै**

इराण-अमेरिकेचा सलग तिसऱ्या दिवशी परस्परावर क्षेपणास्त्राचा मारा सुरू असताना इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड्सने होर्मुझमध्ये संयुक्त अरब अमिरातीच्या दोन तेलवाहू जहाजांवर क्षेपणास्त्र डागले. यात एका भारतीय नाविकाचा मृत्यू झाला. तर इतर ७ भारतीय आणि २ युक्रेनी नागरिक जखमी आहेत. भारताने हल्ल्याचा निषेध करत इराणी राजदूताला समन्स बजावले आहे. दुसरीकडे इराणला नमवण्यासाठी अमेरिकेच्या सैन्याने होर्मुझ जलमार्गात नाकाबंदी सुरू केली आहे.

यूएईच्या संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, 'मोम्बासा' नावाचे तेल टँकर आणि



इराणच्या हल्ल्यानंतर तेलवाहू जहाजाला आग लागली

'अल बहिया' या एलएनजी (नैसर्गिक वायू) नाहून नेणाऱ्या जहाजांवर ओमानच्या सागरी हद्दीतील होर्मुझ जलमार्गात इराणने क्रूझ क्षेपणास्त्राचा मारा केला. या हल्ल्यानंतर दोन्ही जहाजांना भीषण आग लागली. या जहाजांवर ३० भारतीय आणि इतर देशातील १६ असे ४६ नाविक तैनात होते. यात एका भारतीय नाविकाचा मृत्यू झाला. ओमानच्या नौदलाने तत्काळ बचाव मोहीम राबवत इतर नाविकांना सुरक्षित बाहेर काढले. इराणचा हल्ला आंतरराष्ट्रीय कायद्याचे गंभीर उल्लंघन असल्याचे भारताने म्हटले आहे. ◂ (वृत्तसंस्था)

**ताज्या घडामोडी**
क्षणाक्षणाला मिळविण्यासाठी **तरुण भारत पोर्टलला भेट द्या** किंवा ९८८१०११६६२ व्हॉट्सअॅप क्रमांकावर संपर्क साधा. सोबत असलेला क्यूआर कोड स्कॅन करा आणि रहा **क्षणाक्षणाला अपडेट!**

## अंतरंग

३ इराणचे माजी राष्ट्राध्यक्ष अहमदीनेजाद नजरकैदेत
४ मास्तरांच्या मल्टिटास्किंगचा मुद्दा... (अग्रलेख)
६ सर्वांच्या नजरा मेस्सी-केनच्या खेळाकडे
८ जिल्हा परिषद भरतीत अनियमितता

# 'ई-२०'ने इंजिन खराब होत असल्याचा पुरावा नाही

## । आयआयटी कानपूरच्या संशोधनातून स्पष्ट । इंधन कार्यक्षमतेवर कोणताही लक्षणीय परिणाम नाही

**कानपूर, १४ जुलै**

अभ्यासात इंधनाच्या कार्यक्षमतेत (मायलेजमध्ये) कोणतीही लक्षणीय घट आढळली नाही आणि ई-२० मुळे विद्यमान किंवा जुन्या वाहनांच्या इंजिनचे नुकसान होते, याचा कोणताही पुरावा सापडला नाही, असा दावा देशभरात २० टक्के इथेनॉल-मिश्रित पेट्रोल लागू करण्याबाबतच्या चिंतांच्या पृष्ठभूमीवर, आयआयटी कानपूरच्या संशोधकांनी मंगळवारी केला.

हे निष्कर्ष पेट्रोलियम मंत्रालयाच्या मागील आठवड्यातील स्पष्टीकरणानंतर आले आहेत. ई-२० मुळे काही वाहनांच्या मायलेजमध्ये पाच टक्क्यांपर्यंत घट होऊ शकते, परंतु कार्बन उत्सर्जनात होणारी घट यांसारख्या अनेक फायद्यांमुळे हा परिणाम गौण ठरतो, असे मंत्रालयाने म्हटले होते. संस्थेने केलेल्या संशोधनानुसार ई-२० इंधनामुळे इंधनाच्या कार्यक्षमतेत होणारी घट पाच टक्क्यांपेक्षा कमी आहे, असा दावा आयआयटी कानपूरच्या 'मेकॅनिकल इंजिनिअरिंग' विभागांतर्गत असलेल्या 'इंजिन रिसर्च लॅबोरेटरी'चे प्रकल्प शास्त्रज्ञ ध्रुव राज यांनी केला.




पाच टक्क्यांपर्यंतची ही घट इंधनाव्यतिरिक्त इतर कारणांमुळे असू शकते आणि शुद्ध पेट्रोल वापरून सलग चाचण्या केल्यास देखील असेच परिणाम मिळू शकतात, असे त्यांनी सांगितले.

समाज माध्यमावर ई-२० मुळे वाहनांचे नुकसान होत असल्याबाबत पसरलेल्या दाव्यांना वैज्ञानिकदृष्ट्या निराधार ठरवले आणि वाहनचालकांना त्यांनी पडताळणी न केलेल्या ऑनलाइन पोस्ट्सवर अवलंबून न राहता, वाहन उत्पादकाचे मॅन्युअल आणि पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांवर विश्वास ठेवावा, असा सल्ला दिला.

आयआयटी कानपूरमध्ये इथेनॉल-मिश्रित इंधनांवर व्यापक संशोधन सुरू आहे. या टीमने ई-८५ इंधनाची यशस्वी चाचणी देखील केली आहे; मात्र, अशा उच्च मिश्रणासाठी विशेषतः डिझाइन केलेली इंजिने आणि सुसंगत इंधन प्रणालींची आवश्यकता असते. संस्थेच्या अभ्यासात ई२० मुळे इंधनाच्या कार्यक्षमतेत कोणतीही लक्षणीय घट आढळली नाही, असे राज यांनी नमूद केले. ◂ (वृत्तसंस्था)

### ई-२० शुद्ध पेट्रोलच्या तुलनेत अधिक स्वच्छ

'इथेनॉल मिश्रित पेट्रोल कार्यक्रमा'वर होणाऱ्या टीकेला उत्तर देण्यासाठी पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने नुकत्याच जारी केलेल्या एका तपशीलवार प्रश्न-उत्तर दस्तऐवजात ई-२० हे ई-१० किंवा शुद्ध पेट्रोलच्या तुलनेत अधिक स्वच्छ, उच्च दर्जाचे आणि अधिक कार्यक्षम इंधन आहे. ■

# वाल्हे नगरीत माउलींचे जल्लोषात स्वागत

**जेजुरी, १४ जुलै**

मृदुंगाचा गजर, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि "ज्ञानोबा-तुकाराम"च्या अखंड जयघोषात संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याचे सोमवारी सकाळी अकराच्या सुमारास महर्षी वाल्मिकींच्या वाल्हे नगरीत आगमन झाले. भाविकांनी ठिकठिकाणी रांगोळ्या, फुलांची उधळण आणि जयघोष करत माउलींचे जल्लोषात स्वागत केले. उद्या (दि. १५) निरा स्नानानंतर पालखी सोहळा सातारा जिल्ह्यात प्रवेश करणार आहे.

पहाटे माउलींची महापूजा झाल्यानंतर खंडोबाच्या जेजुरी नगरीतून सकाळी सहा वाजता पालखी सोहळा वाल्हेकडे मार्गस्थ झाला. सकाळपासून वातावरण ढगाळ असल्याने वारकऱ्यांची पावलेही भराभर पडत होती. सकाळी हिरवाईने नटलेल्या दौंडज खिंडीमध्ये वारकऱ्यांनी सकाळची न्याहरी उरकून सोहळा पुढे मार्गस्थ झाला. सकाळी साडेअकरा वाजता महर्षी वाल्मिकींच्या नगरीत प्रवेश केला. माउलींच्या रथाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या हजारो ग्रामस्थांनी रथ जवळ आल्यावर माउली माउली असा जयघोष करीत फुलांची उधळण केली.

यावेळी पुणे जिल्हा बँकेचे अध्यक्ष दिगंबर दुर्गाडे, सरपंच अतुल गायकवाड , सुकलवाडीचे सरपंच संदेश पवार, संदीप यादव ,दत्तात्रय पवार, अमोल खवले, सचिन लंबाते, गिरीश पवार यांनी पालखीचे स्वागत केले. ◂ (तभा वृत्तसेवा)

## महत्वाचे...



### तगारे बालक मंदिर सेवासदनमध्ये पालक सभा उत्साहात

**सोलापूर, दि. १४ जुलै-**

कै. सौ. आनंदीबाई द.तगारे बालक मंदिर सेवासदन येथे शैक्षणिक वर्ष २०२६- २७ मधील पहिली पालक सभा शालेय समिती अध्यक्ष ॲड. अर्चना कुलकर्णी यांची उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. शाळेच्या सचिवा वीणा पतकी, मुख्याध्यापिका निशिगंधा जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी सहशिक्षिका अनुजा कुलकर्णी यांनी आम्ही शिक्षिका आम्ही माता असून हे ध्येय गीत सादर केले. मुख्याध्यापिका निशिगंधा जाधव यांनी प्रास्ताविकेतून शाळेचे नियम विविध शैक्षणिक उपक्रम तसेच शाळेत शिकवल्या जाणाऱ्या विषयांची माहिती दिली. ॲड. कुलकर्णी यांनी बालकांचा विकास करण्यासाठी शिक्षक आणि पालकांनी मिळून काय केले पाहिजे त्यातून बालकांचा विकास कसा होईल याची माहिती दिली. सहशिक्षिका अनुजा कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.



### मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी यांचा वाढदिवस वृक्षारोपण करून साजरा

**सांगोला,दि.१४ जुलै -**

सांगोला नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांचा वाढदिवस नगरपरिषदेकडून वृक्षारोपण करून उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये लिंगायत स्मशानभूमी जुना मेडशिंगी रोड, यल्लमा देवी मंदिर माळवाडी रोड परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे वृक्षारोपण उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, गटनेते प्रशांत धनवजीर, बांधकाम सभापती ज्ञानेश्वर तेली, महिला व बालकल्याण सभापती छाया मेटकरी, नगरसेविका आशादेवी यावलकर, नगरसेवक काशिलिंग गावडे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी महात्मा बसवेश्वर संघटनेचे रत्नाकर पाटणे, सुमित चांदणे, मनोज उकळे, अमर लोखंडे, निलेश नष्टे, संतोष महिमकर, संदीप चौगुले, काशिनाथ ढोले, प्रसाद जिरगे, अक्षय माहिमकर, वैभव गवळी, नगरपरिषदेचे कर व प्रशासकीय अधिकारी महेश राजपूत, सिटी कोऑर्डिनेटर अजितकुमार पवार, वृक्ष प्राधिकरण विभागाचे आरिफ मुलाणी उपस्थित होते.

### धायटी येथे सोमवारी आट्या-पाट्याचे सामने

**सांगोला,दि.१४ जुलै -**

सांगोला तालुक्यातील जय हनुमान व श्रीराम क्रिडा मंडळ, कै. दिलीप भोसले क्रिडा मंडळ, धायटी यांच्यावतीने सोमवार २० जुलै रोजी सायंकाळी ७ वाजता धायटी येथे आट्या-पाट्याचे सामने आयोजित केले आहेत. यामध्ये २१ हजार १२१ रु प्रथम, १५ हजार ११५ रु द्वितीय, १० हजार १०१ रु तिसरे, ७ हजार १०७ रु चौथे, ५ हजार १०५ रु पाचवे असे पारितोषिक, छत्रपती शिवाजी महाराज प्रतिमा व चषक ठेवण्यात आले आहे. शो मॅचसाठी ५ हजार १०५ रु ठेवण्यात आले आहेत. इच्छुक संघानी दि.२० जुलै दुपारी १२ वाजेपर्यंत तानाजी भोसले-९६२३४५६३६३ अथवा वैभव जाधव-८६२३००३६३२ यांच्याकडे नोंदणी करावी.

### हुंड्यासाठी विवाहितेचा छळ- पतीसह पाच जणांवर गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १४ जुलै-**

हुंड्यासाठी व घर घेण्यासाठी माहेरून पाच लाख रुपये आण म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अविनाश (पती), शोभा (सासू), मंगलसिंग (सासरे), किशोर (दीर), शर्मिला-ननंद, (रा. सैफुल, सोलापूर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून याबाबत मिनाक्षी अविनाश चव्हाण (रा.सी २७४,राजस्व नगर, सोलापूर) हिने फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी ही दि. १२ जुलै २०२४ ते ६ जुलै २०२५ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळून फिर्यादीस हुंड्यासाठी मानसिक, शारीरीक त्रास दिला . तसेच नवीन घर घेण्यासाठी माहेरून ५ लाख रुपये आणण्यासाठी शारीरीक व मानसिक त्रास दिला तसेच मारहाण शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे .पोलीस हवालदार जाधव हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

### राहत्या घरातून ३५ हजाराचा लॅपटॉप चोरीस

**सोलापूर, दि. १४ जुलै-**



बंद घराचा कडी कोयंडा उघडून अज्ञात चोरट्याने ३५ हजार रुपये किमतीचा लॅपटॉप चोरून नेल्याची घटना राम लिंग नगरात घडली .याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अशपाक रफिक पठाण (रा. ७७/२, रामलिंग नगर, सोलापूर ) यांनी फिर्याद दिली आहे. दि. ११ ते १२ जुलै दरम्यान अज्ञात चोरट्याने यातील फिर्यादीचे बंद घराचा दरवाज्याचे कडी कोयंडा उघडुन, ३५ हजार रुपये किमतीचा एक लॅपटॉप व साहित्य चोरुन नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस हवालदार परदेशी हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

# मंगळवेढा तालुक्याच्या पाणीपुरवठ्यासाठी राज्य सरकारशी चर्चा : खा. प्रणिती शिंदे

- शिष्टमंडळाकडून मुंबईत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट
- भीमा-सीना पात्र, म्हैसाळ योजना, १५ बंधाऱ्यांचे बॅरेज रुपांतर

**तभा वृत्तसेवा**
**मंगळवेढा, दि. १४ जुलै -**

सोलापूर लोकसभा मतदारसंघातील महत्त्वाच्या पाणीवाटप व सिंचन विषयांसंदर्भात मंगळवेढा तालुक्यातील स्थानिक नेत्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेतली. भीमा व सीना नदीचे आणि तालुक्याला म्हैसाळ योजनेअंतर्गत पाणी उपलब्ध करून देण्याबाबत सविस्तर चर्चा झाली आणि संबंधित सर्व प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन मंत्र्यांनी दिल्याचे खासदार प्रणिती शिंदे यांनी सांगितले.

बैठकीत मंगळवेढा येथील काँग्रेस पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष शिवाजी काळुंगे, जकराया शुगर कंपनीचे अध्यक्ष बिराप्पा जाधव, मंगळवेढा काँग्रेस शहराध्यक्ष राहुल घुले, युवा कार्यकर्ते युवराज गडदे, अमोल रणदिवे, सिताराम रणदिवे तसेच मंगळवेढा काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रशांत साळे उपस्थित होते. गटाने तालुक्यातील शेतकरी, पिण्याचे पाणी आणि शहरी-ग्रामीण विकास यांना धोका निर्माण करणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्याच्या समस्या मांडल्या.

उजव्या व डाव्या कालव्यानुसार मुख्य नदी पात्रांमध्ये पाणी सोडणे, म्हैसाळ योजनेअंतर्गत मंगळवेढा तालुक्यास पाणी उपलब्ध करून देण्याचे तात्काळ नियोजन व प्रशासकीय परवानग्या,१५ बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतर, स्थानिक तालुक्यातील पाणीसाठा व्यवस्थापन, सिंचित क्षेत्र वाढविणे, पाण्याचा शास्त्रीय वाटप आणि पीक सुरक्षा यांसारख्या बाबींवर धोरणात्मक चर्चा झाली. मंत्री कार्यालयातून व संबंधित विभागांमधून पुढील १५ दिवसांत प्राथमिक अहवाल प्राप्त होईल, ज्यावरून पुढील वेळा-पत्रक निश्चित केले जाईल. स्थानिक प्रशासन व ग्रामपंचायतींनी तयारी करून ठेवल्यास अंमलबजावणी जलद होण्यास मदत होईल, असे स्थानिक नेत्यांनी सांगितले.



> मंगळवेढा तालुक्याच्या विकासासाठी पाण्याची उपलब्धता ही प्राथमिक गरज आहे; मंत्र्यांनी उचललेले पाऊल महत्त्वाचे आहे.
>
> **- शिवाजी काळुंखे, माजी तालुकाध्यक्ष, काँग्रेस.**
>
> ---------------------------------------------
>
> औद्योगिक व कृषी वापरासाठी पाण्याच्या समन्वयाने स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठा फायदा होईल. स्थानिक काँग्रेस नेते राहुल घुले व प्रशांत साळे यांनीही जलसाधनांच्या व्यवस्थापनावर जलद कृतीची मागणी केली.
>
> **- बिराप्पा जाधव, अध्यक्ष, जकराया शुगर**

**मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रतिसादात्मक भूमिका**

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी हे प्रश्न तातडीने पाहिले जातील, असे सांगत संबंधित प्रशासनाला अधिकाऱ्यांसोबत बैठका घेऊन तांत्रिक व कायदेशीर बाजू तपासण्याचे निर्देश दिले. प्रस्तावित बॅरेज रूपांतरण आणि कालव्यात पाणी सोडण्याचे प्रभाव मूल्यांकनासाठी अभियांत्रिकी व पर्यावरणीय सर्वे करणे, आदी मुद्दे सोडवण्याचे आश्वासन दिले.



## मध्य रेल्वेच्या महिला कर्मचाऱ्याचा सुरक्षा पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १४ जुलै-**

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे आयोजित एका कार्यक्रमात, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक राजीव श्रीवास्तव यांनी सोलापूर विभागातील कलावती रामकृष्ण, वरिष्ठ तंत्रज्ञ या कर्मचाऱ्यासह मध्य रेल्वेच्या एकूण १० कर्मचाऱ्यांना 'सुरक्षा पुरस्कार' देऊन सन्मानित केले.

हे सुरक्षा पुरस्कार कर्मचाऱ्यांनी कर्तव्यावर असताना दाखवलेली सतर्कता, प्रसंगावधान आणि कर्तव्यनिष्ठा यांच्या सन्मानार्थ प्रदान करण्यात आले. या गुणांमुळे संभाव्य दुर्घटना टाळण्यास आणि गेल्या काही महिन्यांत रेल्वेची सुरक्षित वाहतूक सुनिश्चित करण्यास मदत झाली. प्रत्येक पुरस्कारामध्ये पदक, प्रशस्तिपत्र, उत्कृष्ट सुरक्षा कार्याचा गौरव करणारा लेख आणि ३,५०० रुपयांचे रोख पारितोषिक यांचा समावेश आहे.

कलावती रामकृष्ण, वरिष्ठ तंत्रज्ञ (यांत्रिक), वाडी (सोलापूर विभाग) या १ जुलै २०२६ रोजी 'रोलिंग-इन' तपासणी (गाडी स्थानकात येत असताना केलेली तपासणी) करत असताना, त्यांना एका मालगाडीच्या १४ व्या वॅगनच्या दोन बोगींमधून सहा स्प्रिंग्स (कमानी) गायब असल्याचे आढळले. त्यांनी याची माहिती संबंधित सर्वांना दिली. त्यांच्या या सतर्कतेमुळे संभाव्य अपघात टळला.

महाव्यवस्थापकांनी पुरस्कार विजेत्यांचे त्यांच्या उत्कृष्ट कर्तव्यनिष्ठेबद्दल आणि सतर्कतेबद्दल अभिनंदन केले. तसेच, त्यांच्या या कृतीमुळे इतर रेल्वे कर्मचारीही सतर्क राहण्यास आणि प्रवाशांची सुरक्षा व रेल्वेच्या मालमत्तेचे रक्षण करण्यास प्रेरित होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी मध्य रेल्वेचे अतिरिक्त महाव्यवस्थापक प्रतीक गोस्वामी, प्रधान मुख्य सुरक्षा अधिकारी चंद्र किशोर प्रसाद, तसेच विविध विभागांचे प्रमुख आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.



## म्हैसाळ योजनेचे रखडलेले काम तत्काळ पूर्ण करा

**माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांची सूचना**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.१४ जुलै -**

सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदायिनी असणाऱ्या म्हैसाळ उपसा सिंचन योजनेचे विस्तारीकरण झाले. योजनेसाठी निधीही मंजूर झाला. परंतु गेल्या काही दिवसांपासून या योजनेचे काम संथ गतीने सुरू होते. याबाबत लाभ क्षेत्रातील शेतकऱ्यांनी आपली व्यथा माजी आ.दिपकआबा साळुंखे पाटील यांच्या कडे मांडली होती. या पार्श्वभूमीवर त्यांनी वायफळ ता.जत येथील म्हैसाळ योजनेच्या मुख्य कालव्यापासून ते नराळे, हबीसेवाडी, यमगरवाडी, मानेवाडी, घेरडी तसेच वाकी घे, वाणिचिंचाळे, जवळा, आगलावेवाडी, तरंगेवाडी आलेगाव, मेडशिंगी या परिसरात सुरू असणाऱ्या कामाची पाहणी करून आढावा घेतला. यावेळी संबंधित ठेकेदार आणि अधिकारी यांना लवकरात लवकर हे काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. याप्रसंगी घेरडीचे माजी सरपंच दिलीप मोटे, भाऊसाहेब यमगर, चंद्रकांत कारंडे, मधुकर करतडे, नामदेव साळुंखे, संजय गायकवाड, सुरेश गावडे, सुखदेव गावडे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी, ठेकेदार तसेच लाभ क्षेत्रातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**सकारात्मक प्रतिसादाने शेतकरी सुखावला**

कामे पूर्ण झाल्यानंतर लगेचच या योजनेतून बंद पाईपलाईनच्या सहाय्याने पारे, नराळे हबीसेवाडी, हंगीरगे गावडेवाडी, घेरडी, सोनंद या गावांसह वाकी घे, वाणिचिंचाळे, जवळा, आगलावेवाडी, तरंगेवाडी, भोपसेवाडी, आलेगाव आणि मेडशिंगी या गावांना लवकरच पाणी सोडण्याच्या सूचना दिपकआबा साळुंखे पाटील यांनी दिल्या. यावर संबंधित अधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने या परिसरातील शेतकरी सुखावला आहे.

## जिल्ह्यातील ६,९१३ हेक्टरसाठी साडेदहा हजार शेतकऱ्यांनी भरला पीकविमा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जुलै-**

जिल्ह्यात सुधारित पंतप्रधान पीकविमा योजना राबविण्यात येत आहे. या विम्या नुसार चालू वर्षात अधिसूचित महसूल मंडळामध्ये अधिसूचित पिकाचे सरासरी उत्पादन जर उंबरठा उत्पादनापेक्षा कमी आले, तर शेतकऱ्यांना विमा नुकसान भरपाई मिळणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत आहे. दरम्यान, आजतागायत जिल्ह्यातील दहा हजार ५७५ हजार शेतकऱ्यांनी त्यांच्या ६ हजार ९१३ हेक्टरसाठी पीकविमा भरला आहे.




पिकनिहाय विमा संरक्षित रक्कम व शेतकरी हिस्सा (प्रति हेक्टर) योजनेंतर्गत विविध पिकांसाठी निश्चित केलेली आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी बाजरी, मका, सोयाबीन, मूग, तूर, उडीद, भुईमूग आणि कांदा ही पिके अधिसूचित केली आहेत. या पिकांचा विमा शेतकऱ्यांना उतरता येईल. यासाठी ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी असणे अत्यंत बंधनकारक आहे. जमिनीचा चालू ७/१२, ८-अ उतारा आणि पीक लागवड घोषणापत्र, आधार क्रमांक आणि आधारशी संलग्न असलेले बँक खाते, डिजिटल क्रॉप सर्व्हे करणे बंधनकारक आहे.

डिजिटल क्रॉप सर्व्हेमधील पीक आणि विम्याच्या अर्जात नमूद केलेले पीक यात तफावत आढळल्यास, डिजिटल क्रॉप सर्व्हेमधील नोंदच अंतिम मानली जाईल आणि विम्याचा अर्ज रद्द होऊ शकतो. तसेच योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्याकडे किमान ०.१० हेक्टर क्षेत्र अधिसूचित पिकाखाली असणे आवश्यक आहे.

खरीप हंगाम २०२६ साठी सुधारित 'पंतप्रधान पीक विमा योजना' लागू करण्यात आली असून, नोंदणीसाठी ३१ जुलै २०२६ ही अंतिम मुदत आहे. यंदा विमा अर्जासोबत 'ई-पीक पाहणी' सक्तीची करण्यात आली आहे. सोलापूरसह राज्यातील १४ प्रमुख पिकांसाठी ही योजना राबविण्यात येत आहे.

पीक विमा २०२६ मधील महत्त्वाचे बदल व नियमई-पीक पाहणी सक्तीची: शेतात प्रत्यक्ष पेरणी केलेल्या पिकांची नोंदणी ई-पीक पाहणी असणे अनिवार्य आहे, अन्यथा विमा नाकारला जाऊ शकतो. जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी यासाठी ५२ लाख ५९ हजार २८ रूपये भरले आहेत. तर राज्याचा हिस्सा ५९ लाख ४३ हजार ८६५ आणि केंद्राचा ५९ हजार ४३ हजार ८६५ असा समान आहे. तर अशी एकूण पीक विमा रक्कम १ कोटी ७१ लाख ४६ हजार ७५८ इतकी भरली आहे. तर यासाठी संरक्षित रक्कम ३० कोटी ९४ लाख ६३ हजार २९५ इतकी आहे.

## महाकवी कालिदास : भारतीय साहित्याचा सुवर्णअध्याय

प्राचीन भारताचा इतिहास पाहताना संस्कृत साहित्यात कविकुलगुरु कालिदास यांच्या अजरामर साहित्यकृतीचा अभ्यास केल्याशिवाय तो इतिहास पूर्ण होऊ शकत नाही. संस्कृत साहित्यातील श्रेष्ठ कवी, नाटककार आणि प्रतिभावंत साहित्यिक म्हणून कालिदासांचे स्थान अढळ आहे. त्यांच्या लेखणीतून निर्माण झालेल्या साहित्यकृतींनी केवळ संस्कृत भाषेलाच समृद्ध केले नाही, तर संपूर्ण भारतीय संस्कृती, निसर्गप्रेम, मानवी भावना आणि जीवनमूल्यांना जागतिक स्तरावर प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी महाकवी कालिदास दिन साजरा केला जातो.

कालिदासांच्या जीवनाविषयी निश्चित ऐतिहासिक माहिती कमी उपलब्ध असली तरी त्यांच्या साहित्यकृती, त्यांच्या असामान्य बुद्धिमत्तेची आणि कल्पनाशक्तीची साक्ष देतात. ते गुप्तकालीन सुवर्णयुगातील कवी मानले जातात. निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण, मानवी मनाचे भावपूर्ण चित्रण आणि संस्कृत भाषेवरील अद्भुत प्रभुत्व यामुळे त्यांना 'कविकुलगुरू' ही उपाधी प्राप्त झाली. महाकवी कालिदासांनी अनेक अजरामर साहित्यकृती निर्माण केल्या. त्यातील प्रमुख ग्रंथ म्हणजे अभिज्ञानशाकुंतलम्, विक्रमोर्वशीयम्, मालविकाग्निमित्रम् ही नाटके; तसेच रघुवंशम्, कुमारसंभवम् ही महाकाव्ये आणि मेघदूतम्, ऋतुसंहारम् ही खंडकाव्ये होत. त्यांच्या प्रत्येक रचनेत सौंदर्य, संस्कृती आणि जीवनदृष्टी यांचा सुंदर संगम दिसून येतो. त्यांच्या कवितांमध्ये निसर्ग निखळपणे वावरताना दिसून येतो. कालिदासांच्या मेघदूतम् या काव्यात विरहाने व्याकुळ झालेल्या यक्षाने आपल्या प्रिय पत्नीला संदेश देण्यासाठी मेघाला दूत बनविले आहे. या काव्यातील निसर्गवर्णन, प्रेमभावना आणि कल्पनाशक्ती अद्वितीय आहे.

''आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्लिष्टसानुं
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श।''

आषाढ महिन्याच्या पहिल्या दिवशी पर्वताच्या शिखराला आलिंगन देणाऱ्या, मातीच्या उंच बांधावर खेळणाऱ्या हत्तीप्रमाणे सुंदर दिसणाऱ्या मेघाला यक्षाने पाहिले. या श्लोकातून कालिदासांची निसर्गाकडे पाहण्याची दृष्टी दिसून येते. साध्या मेघामध्येही त्यांनी सौंदर्य, भावना आणि संदेशवाहकाची भूमिका पाहिली. मेघ हा त्यांच्या कल्पनेत केवळ पाण्याचा समूह नसून प्रेमाचा दूत बनतो. कालिदासांच्या काव्यात निसर्ग आणि मानवी भावना यांचे अतूट नाते दिसते. ऋतू, पर्वत, नद्या, वृक्ष, फुले, पक्षी या सर्वांना त्यांनी भावनांचे रूप दिले.

''कश्चित्कान्ताविरहगुरुणा स्वाधिकारात् प्रमत्तः
शापेनास्तंगमितमहिमा वर्षभोग्येन भर्तुः।''

आपल्या प्रिय पत्नीच्या विरहाच्या दुःखाने व्याकुळ झालेला आणि कर्तव्यापासून दूर गेलेला एक यक्ष आपल्या स्वामीच्या शापामुळे एका वर्षासाठी वैभवापासून वंचित झाला. या श्लोकातून विरहाची वेदना आणि प्रेमाची खोली व्यक्त होते. कालिदासांनी मानवी भावनांचे इतके सूक्ष्म चित्रण केले आहे की शतकानुशतके वाचक त्याच्याशी जोडले जातात. रघुवंशम् या महाकाव्यात कालिदासांनी रघुकुलातील राजांचे चरित्र, त्यांचे आदर्श, कर्तव्यनिष्ठा आणि त्याग यांचे वर्णन केले आहे.

''वागर्थाविव संपृक्तौ वागर्थप्रतिपत्तये।
जगतः पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ।।''

शब्द आणि अर्थ जसे एकमेकांपासून वेगळे करता येत नाहीत, तसेच संपूर्ण जगाचे माता-पिता असलेल्या पार्वती आणि परमेश्वराला मी वंदन करतो. या श्लोकातून कालिदासांची भाषेवरील पकड आणि विचारांची उंची स्पष्ट होते. शब्द आणि अर्थ यांचे नाते त्यांनी अत्यंत सुंदर रीतीने मांडले आहे. कुमारसंभवम् या काव्यात भगवान शिव आणि पार्वती यांच्या दिव्य मिलनातून कुमार कार्तिकेयाच्या जन्माची कथा वर्णिली आहे. या काव्यात प्रेम, तपस्या आणि शक्ती यांचे सुंदर चित्रण आढळते. कालिदासांनी सौंदर्याचे वर्णन करताना केवळ बाह्य रूपाला महत्त्व दिले नाही, तर त्यामागील भावविश्व आणि आत्मिक सौंदर्यही मांडले. कालिदासांचे अभिज्ञानशाकुंतलम् हे नाटक जगातील अनेक भाषांमध्ये अनुवादित झाले आहे. शकुंतला आणि राजा दुष्यंत यांच्या प्रेमकथेच्या माध्यमातून त्यांनी प्रेम, कर्तव्य, स्मृती आणि नियती यांचे प्रभावी चित्रण केले. या नाटकाने भारतीय नाट्यपरंपरेला जागतिक स्तरावर मान मिळवून दिला. पाश्चात्त्य साहित्यिकांनीही कालिदासांच्या प्रतिभेचे कौतुक केले आहे. आजच्या आधुनिक युगातही कालिदासांचे साहित्य तितकेच प्रेरणादायी आहे. त्यांच्या लेखनातून निसर्गसंवर्धनाची भावना, प्रेमातील पवित्रता, कर्तव्याची जाणीव आणि संस्कृतीचे महत्त्व शिकायला मिळते. महाकवी कालिदास हे केवळ संस्कृत भाषेचे कवी नव्हते, तर भारतीय संस्कृतीचे महान प्रतिनिधी होते. त्यांच्या साहित्याने सौंदर्य, प्रेम, निसर्ग आणि जीवनमूल्यांना अमरत्व दिले. त्यांची प्रतिभा काळाच्या सीमा ओलांडून आजही जगाला प्रेरणा देते.



आज १५ जुलै रोजी साजरा होणारा महाकवी कालिदास दिन हा केवळ एका कवीचे स्मरण करण्याचा दिवस नाही, तर भारतीय साहित्यपरंपरेच्या महान वारशाचा गौरव करण्याचा दिवस आहे. कालिदासांच्या साहित्याचा अभ्यास करून आपण भाषा, संस्कृती आणि जीवनाकडे पाहण्याची अधिक सुंदर दृष्टी प्राप्त करू शकतो. 'उपमा कालिदासस्य' असे म्हटले जाते, कारण उपमा अलंकाराचा इतका प्रभावी आणि सुंदर वापर करणारा कवी क्वचितच आढळतो. त्यांच्या अमर साहित्यामुळे महाकवी कालिदासांचे नाव भारतीय साहित्याच्या इतिहासात सदैव सुवर्णाक्षरांनी कोरलेले राहील.

**- डॉ. गुरबसप्पा करपे**
**संस्कृत विभाग**
**जवाहर महाविद्यालय, अणदूर**
**ता. तुळजापूर जि. धाराशिव.**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# इराणचे माजी राष्ट्राध्यक्ष अहमदीनेजाद नजरकैदेत

**| इस्त्रायलच्या संपर्कात असल्याचा आरोप**
**| शत्रूसोबत हातमिळवणी केल्याचा आरोप**



**वॉशिंग्टन, १४ जुलै**

सत्तेत परत येण्यासाठी इस्त्रायलची गुप्तचर संस्था मोसादच्या संपर्कात असल्याच्या आरोपात इराणचे माजी राष्ट्राध्यक्ष महमूद अहमदीनेजाद यांना आयआरजीसीने नजरकैदेत ठेवले आहे. अमेरिका व इस्त्रायल त्यांना पुन्हा सत्तेवर आणू इच्छित होते आणि अहमदीनेजाद यांनी त्यांच्यासोबत हातमिळवणी केली असा ठपका त्यांच्यावर ठेवला असल्याचा दावा अमेरिकन माध्यमांनी केला आहे.

चार इराणी अधिकाऱ्यांच्या हवाल्याने अमेरिकन माध्यमांनी दावा केला की, इराणच्या इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्सच्या (आयआरजीसी) गुप्तचर शाखेने अहमदीनेजाद यांना ताब्यात घेऊन नजरकैदेत ठेवले आहे.

इस्त्रायलची गुप्तचर संस्था मोसादच्या संपर्कात असल्याची माहिती मिळाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. सध्याच्या इस्लामिक राजवटीच्या जागी अहमदीनेजाद यांना सत्तेवर आणण्याची इस्त्रायलची कथित योजना अयशस्वी झाल्यानंतर त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले. त्यांची प्रकृती ढासळली असून, उपचारही दिला जात नाही.

दरम्यान २८ फेब्रुवारी रोजी सुरू झालेल्या इराणविरुद्ध अमेरिकेच्या 'ऑपरेशन एपिक फ्युरी' दरम्यान त्यांच्या निवासस्थानावर झालेल्या इस्त्रायली हवाई हल्ल्यानंतर, अहमदीनेजाद सार्वजनिक ठिकाणी दिसले नव्हते. हल्ल्यानंतर त्यांना एका सुरक्षित ठिकाणी नेण्यात आले. कारवाईची शंका येऊ नये यासाठी गेल्या आठवड्यात त्यांना इराणचे दिवंगत सर्वोच्च नेते, अयातुल्ला अली खामेनेई यांच्या अंत्यविधीच्या वेळी सार्वजनिकरित्या आणले गेले होते. ◂(वृत्तसंस्था)

### मोसादसोबत गुप्त संपर्क

अहमदीनेजाद यांनी २०२३ मध्ये ग्वाटेमाला येथे झालेल्या एका पर्यावरण परिषदेदरम्यान मोसादशी प्रथम संपर्क साधला होता. त्यानंतर, २०२४ मध्ये, त्यांना हंगेरीमधील एका विद्यापीठात आयोजित हवामान बदल परिषदेसाठी आमंत्रित केले. विद्यापीठाचे रेक्टर, गेर्गेली डेली यांनी दावा केला की, अहमदीनेजाद आणि इस्त्रायली अधिकाऱ्यांची भेट घडवून आणण्यासाठी एका हंगेरियन सरकारी अधिकाऱ्याच्या विनंतीवरुन हे आमंत्रण देण्यात आले होते. ■

### माजी सल्लागाराने आरोप फेटाळले

तत्कालीन मोसाद प्रमुख डेव्हिड बार्निया हे देखील बुडापेस्ट येथील या कथित बैठकीत उपस्थित होते. अमेरिकन अधिकाऱ्यांनी दावा केला की, इस्त्रायलने अहमदीनेजाद यांच्या प्रवासाचा आणि निवासाचा काही खर्च देखील उचलला होता. तथापि, अहमदीनेजाद यांचे माजी सल्लागार अब्दोलरेझा दावरी यांनी अमेरिकन माध्यमांचे सर्व आरोप फेटाळले आहे. तथापि त्यांनी इराणमध्ये पुन्हा एकदा सत्तेच्या शिखरावर पोहोचणे हा त्यांचा उद्देश असल्याचे म्हटले आहे. ■

## रोहिंग्या बोट बुडी प्रकरणाची चौकशी

**सिडनी, १४ जुलै**

म्यानमारमधील छळवणूक होत असलेल्या रोहिंग्या अल्पसंख्याक समुदायातील लोकांना घेऊन जाणाऱ्या दोन बोटी बंगालच्या उपसागरात उलटल्याच्या वृत्ताची संयुक्त राष्ट्रांची निर्वासित-विषयक संस्था चौकशी करत आहे. या बोटी बुडण्यापूर्वी जूनच्या अखेरीस म्यानमारच्या पश्चिम भागातील रखाइन राज्यातून निघाल्या होत्या, असे संयुक्त राष्ट्रांच्या निर्वासित-विषयक उच्चायुक्तांनी मंगळवारी एका निवेदनात म्हटले.

संभाव्य जीवितहानीबद्दल आम्हाला तीव्र चिंता वाटत आहे आणि आम्ही अधिक तपशील पडताळण्याचे काम करत आहोत, असे निर्वासित-विषयक संस्थेने म्हटले आहे. या बोटींवर किती रोहिंग्या होते किंवा त्या नेमक्या कुठे बुडाल्या, यासह इतर तपशील देण्यास संस्थेने नकार दिला. म्यानमारच्या सुरक्षा दलांच्या हिंसाचारापासून जीव वाचवून पळून आलेले सुमारे १२ लाख नागरिकत्व नसलेले आणि प्रामुख्याने मुस्लिम असलेले रोहिंग्या बांगलादेशातील अस्वच्छ व गर्दीने भरलेल्या निर्वासित छावण्यांमध्ये अडकून पडले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# सीमापार दहशतवादी हल्ले अस्वीकारार्ह : बार्टोझेवस्की

**| पोलंडचा भारताला पाठिंबा | पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा निषेध**



**नवी दिल्ली, १४ जुलै**

सीमापार दहशतवादी हल्ले अस्वीकारार्ह असून, भारताला याविरोधात कारवाई करण्याचा पूर्ण अधिकार आहे. दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुतेचे धोरण योग्य आहे आणि पाकिस्तान पुरस्कृत दहशतवादाचा बिमोड करण्यासाठी योग्य ती पावले उचलायला हवी असे स्पष्ट करत पोलंडचे उपपरराष्ट्र मंत्री व्लादिस्लाव तेओफिल बार्टोझेवस्की यांनी भारताला पाठिंबा दर्शवला आहे.

सीमापार दहशतवादाच्या मुद्द्यावर युरोपीय देश पोलंडकडून भारताला पाठिंबा मिळाला आहे. सीमापार दहशतवादाबद्दल भारताने व्यक्त केलेल्या चिंतेला उत्तर देताना, बार्टोझेवस्की यांनी सांगितले की, भारताचे सर्व प्रकारच्या दहशतवादाविरोधात असलेले शून्य सहिष्णुतेचे धोरण योग्य आहे. भारतीय भूभागावरील दहशतवादी हल्ले कोणत्याही परिस्थितीत अस्वीकार्य असल्याचे वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले. त्यांनी सांगितले की, पोलंड स्वतः रशियाकडून होणाऱ्या जाळपोळ, घातपात, सायबर हल्ले आणि हत्यांच्या घटनांचा सामना करत आहे आणि हा राज्य पुरस्कृत दहशतवाद आहे. रशियाकडून होणाऱ्या अशा हल्ल्यांबाबत आमची शून्य सहनशीलता आहे. फेब्रुवारीमध्ये माझ्या भारत दौऱ्यादरम्यान या विषयावर माझी जयशंकर यांच्याशी प्रदीर्घ चर्चा झाली होती. ◂(वृत्तसंस्था)

### द्विपक्षीय भागीदारी आणखी बळकट



पोलंडच्या पाकिस्तानसोबतच्या संबंधांविषयी विचारलेल्या प्रश्नावर व्लादिस्लाव म्हणाले की, याचा भारताच्या हितावर परिणाम होणार नाही. दोन्ही देशांमधील वारंवार होणाऱ्या उच्चस्तरीय बैठका हे सिद्ध करतात की पोलंड भारतासोबतच्या आपल्या संबंधांना खूप महत्त्व देतो. पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतील. पोलंडचे परराष्ट्र मंत्री राडोस्लाव आणि जयशंकर नियमित संपर्कात असतात. यामुळे दोन्ही देशांमधील सामरिक भागीदारी आणखी मजबूत होते. ■

## जीप-मोटारसायकल धडकेत दोन जण ठार

**बांदा, १४ जुलै**

नारायणी भागात एका जीपने मागून धडक दिल्याने मोटारसायकलवरील दोन जण ठार झाले, तर एक जण गंभीर जखमी झाला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी मंगळवारी दिली. सोमवारी संध्याकाळी नारायणी पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पडमाई गावाजवळ एका भरधाव जीपने मोटारसायकलवरून जाणाऱ्या तिघांना चिरडले, असे सर्कल ऑफिसर प्रतिज्ञा सिंग यांनी सांगितले. जखमी तिघांना तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी शत्रुघ्न गुप्ता आणि हलकू त्रिवेदी यांना मृत घोषित केले. हे दोघेही मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील छठी बम्हौरी गावचे रहिवासी होते. तसेच, गंभीर जखमी झालेले रामनारायण गुप्ता यांच्यावर उपचार सुरू आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# चीनमध्ये पुराचे तांडव; जनजीवन विस्कळीत

**बीजिंग, १४ जुलै**

चीनच्या हेबेई आणि लियाओनिंग प्रांतांमध्ये चक्रीवादळानंतर आलेल्या भीषण पुरामुळे रस्ते पाण्याखाली गेले असून, अनेक वाहने वाहून गेली. रेल्वे, विमानसेवा स्थगित करण्यात आली आहे. पुरामुळे २५ लाख नागरिकांना स्थलांतरित करण्यात आले. भूस्खलन आणि पुलांच्या पडझडीमुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे.

आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, उत्तर हेबेई आणि ईशान्य लियाओनिंग प्रांतांमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे रस्ते पाण्याखाली गेले आणि वाहने वाहून गेली. कुआनचेंग काउंटीमधील रस्त्यांवर पाण्याची पातळी दोन मीटरपेक्षा जास्त आहे. कुआनचेंगमधील बहुतांश घरात पाणी शिरले असून, लोकांना जीव वाचवण्यासाठी उंच इमारतींचा आधार घ्यावा लागला. रस्त्यांना तलावाचे स्वरुप आले असून, महामार्गावरील वाहतूक विस्कळीत झाल्याने मदत कार्यात अडचणी येत आहे. वादळामुळे जिलिन, लियाओनिंग, हेबेई, शांदोंग, जिआंग्सू आणि आन्हुई प्रांतांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे, ज्यामुळे अनेक नद्यांनी धोक्याची पातळी ओलांडली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### रेल्वेसेवा स्थगित; लाखो लोकांचे स्थलांतर



चीनच्या हेबेई आणि लियाओनिंग प्रांतांमधील रस्त्याला तलावाचे स्वरूप आले आहे

### अनेक भागांतील शाळा बंद

हेबेईच्या अधिकाऱ्यांनी वीचॅटवरील एका निवेदनात म्हटले की, मुसळधार पावसाच्या रेड अलर्ट दरम्यान, सर्व काम थांबवणे, व्यवसाय बंद ठेवणे आणि गर्दीवर कठोरपणे बंदी घालण्यात आली. शेनयांगमधील अनेक रेल्वे सेवाही स्थगित करण्यात आल्या असून, त्याचा परिणाम रेल्वेच्या ३० हून अधिक विभागांवर झाला आहे. ईशान्येकडील जिलिन प्रांतासह अनेक भागांतील शाळा बंद ठेवण्यात आल्या आहेत. ■

## कॉमेडियन समय रैनाला तीन लाखांचा दंड

**नवी दिल्ली, १४ जुलै**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी स्टँड-अप कॉमेडियन आणि यूट्यूबर समय रैना, रणवीर अलाहाबादिया, विपुल गोयल, बलराज परमजीत सिंग घई, सोनाली ठक्कर, निशांत जगदीश तंवर यांच्यावर तीन लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. न्यायालयाने दिव्यांगांवर केलेल्या वादग्रस्त टिप्पणीच्या प्रकरणात हा आदेश दिला आहे. याची सुनावणी सरन्यायाधीश सूर्यकांत, जॉयमाल्या बागची आणि व्ही. मोहन यांच्या खंडपीठाने केली. आमच्या आदेशानंतरही रैनाने आपल्या शोमध्ये कोणत्याही दिव्यांगाला बोलावले नाही, असे खंडपीठाने म्हटले. रैनाच्या शोमध्ये स्पाइनल मस्कुलर अॅट्रोफीच्या उपचाराच्या खर्चावर असंवेदनशील टिप्पणी केल्याचा आणि दिव्यांगांची खिल्ली उडवल्याचा आरोप आहे. ◂(वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### 'गोलमाल'चे मोशन पोस्टर जारी



**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेता अजय देवगणने त्याच्या सुपरहिट विनोदी चित्रपट 'गोलमाल'ला २० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त आनंद व्यक्त केला. अजयने समाज माध्यमावर चित्रपटातील जुने फोटो शेअर केले. त्याने 'गोलमाल'च्या प्रवास आठवणींना उजाळा देत इन्स्टाग्रामवर अनेक व्हिडीओ शेअर केले. यासोबतच अजयने दोन दशकांपूर्वी सुरू झालेला हा प्रवास आजही लोकांना तितकेच हास्य आणि आनंद देत आहे. 'गोलमाल' सुरू होऊन २० वर्षे झाली आहेत आणि आजही तेवढाच आनंद मिळतो, असे लिहिले. त्याने चित्रपटातील पात्रांचे काही मजेशीर फोटोही शेअर केले. 'गोलमाल' या चित्रपटात अजय देवगणसोबत तुषार कपूर, अर्शद वारसी, शर्मन जोशी, रिमी सेन आणि परेश रावल यांच्या प्रमुख भूमिका होत्या. रोहित शेट्टी दिग्दर्शित या चित्रपटाचे लेखन नीरज वोरा यांनी केले आहे. १४ जुलै २००६ रोजी प्रदर्शित झालेला हा चित्रपट 'घर घर' या मराठी नाटकावर आणि 'अफलातून' या गुजराती नाटकावर आधारित होता. ■

### प्रियंका चोप्रा सुटीसाठी लंडनमध्ये



**मुंबई :** ग्लोबल स्टार प्रियंका चोप्रा सध्या आपल्या कुटुंबासोबत लंडनमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत आहे. प्रियंकाने समाज माध्यमावर ट्रिपचे अनेक फोटो आणि व्हिडीओ जारी केले आहेत. ज्यामध्ये तिची मुलगी मालती मेरी आणि पती निक जोनास देखील दिसत आहेत. या पोस्टमधील एका व्हिडीओने चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. ज्यामध्ये छोटी मालती तिच्या आईच्या केसांमधून पिन काढताना दिसत आहे. यादरम्यान ती प्रसिद्ध टेनिस स्पर्धा विम्बल्डन २०२६ चे सामने पाहण्यासाठी देखील पोहोचली होती. प्रियंका चोप्राने इंस्टाग्रामवर तिच्या लंडन ट्रिपच्या आठवणी शेअर केल्या आहेत. सुरुवातीच्या फोटोंमध्ये ती विम्बल्डन सामन्याचा आनंद घेताना आणि तेथे उपस्थित लोकांना भेटताना दिसत आहे. पोस्टच्या शेवटच्या भागात तिने कुटुंबासोबत घालवलेले खासगी क्षण दाखवले आहेत. मात्र, प्रियंकाने कोणत्याही फोटोत तिच्या मुलीचा चेहरा दाखवलेला नाही. ■

### दिलीप जोशी राहतील मालिकेचा भाग



**मुंबई :** 'तारक मेहता का उल्टा चष्मा'मधील जेठालालचे पात्र संपल्याच्या समाज माध्यमावर सुरू असलेल्या अफवांचे निर्मात्यांनी खंडन केले. दिलीप जोशी हे मालिकेचा भाग राहतील आणि कथा अजूनही त्यांच्या पात्राभोवतीच फिरत आहे, असे निर्मात्यांनी स्पष्ट केले. मागील काही दिवसांपासून समाज माध्यमावर मालिकेतील जेठालालचे पात्र संपुष्टात येणार आहे, असा दावा केला जात होता. या दाव्यानंतर प्रेक्षकांमध्ये दिलीप जोशी मालिका सोडणार का, अशी चर्चा सुरू झाली होती. मात्र, शोच्या निर्मात्यांनी हे दावे चुकीचे असल्याचे सांगितले. निर्मात्यांनुसार, शोची कथा अजूनही जेठालालच्या पात्रावर केंद्रित आहे आणि त्यांना बाजूला केले जाणार नाही. २८ जुलै रोजी 'तारक मेहता का उल्टा चष्मा'ला १८ वर्षे पूर्ण होतील. या निमित्तानेही जेठालालचे पात्र पूर्वीप्रमाणेच मालिकेचा महत्त्वाचा भाग राहील, असे निर्मात्यांनी सांगितले. ■

# दक्षिण सागर मुद्द्यावरून चीन संतापला

**| १४ देशांच्या निवेदनाला नाकारले | जपानी राजदूताला बोलावून सुनावले**



**बीजिंग, १४ जुलै**

दक्षिण चीन समुद्रावरील २०१६ च्या आंतरराष्ट्रीय लवादाच्या निर्णयाच्या १० व्या वर्धापनदिनानिमित्त जपानसह १४ देशांनी चीनच्या सागरी दाव्यांना फेटाळल्याचा चीनने तीव्र शब्दात निषेध नोंदवला आहे. सागरावरील सार्वभौमत्वाला आव्हान खपवून घेणार नाही असे त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच

चीनने बीजिंगमधील जपानी दूतावासाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याला बोलावून औपचारिक निषेध नोंदवला. अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया, ब्रिटन, फिलिपिन्स, कॅनडा, जर्मनी, इटली, न्यूझीलंडसह एकूण १४ देशांनी संयुक्त निवेदन जारी करून १२ जुलै २०१६ रोजी द हेग येथील स्थायी लवाद न्यायाधिकरणच्या निर्णयाला अंतिम आणि कायदेशीररित्या बंधनकारक असल्याचे नमूद केले. चीनच्या 'नाइन-डॅश लाइन' दाव्यांना संयुक्त राष्ट्र सागरी कायद्यानुसार कोणताही कायदेशीर आधार नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. यावर चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाने आक्षेप नोंदवत

जपानवर प्रादेशिक बाबींमध्ये हस्तक्षेप आणि दक्षिण चीन समुद्रातील शांतता व स्थिरतेला हानी पोहोचवल्याचा आरोप केला. जपान या वादाचा पक्षकार नाही आणि त्याने या प्रकरणात हस्तक्षेप करू नये अशी तंबी दिली. जपानचे परराष्ट्र मंत्री तोशिमित्सु मोतेगी यांनी चीनच्या वक्तव्यावर म्हटले की,

त्यांनी २०१६ च्या निर्णयाला नाकारणे हे वादांच्या शांततापूर्ण निराकरणाच्या आणि आंतरराष्ट्रीय कायद्याच्या शासनाच्या विरुद्ध आहे. दुसरीकडे चीनने ही टिप्पणी फेटाळून लावली आहे. ◂(वृत्तसंस्था)

## नऊ मासेमारांचे मृतदेह सापडले

**कोलकाता, १४ जुलै**

पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगनाजवळ बंगालच्या उपसागरात बुडालेल्या एका ट्रॉलरमधून आठ दिवसांनंतर नऊ मासेमारांचे मृतदेह सापडले आहेत. सहा मासेमार अजूनही बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. जय माँ काली नावाचा ट्रॉलर २ जुलै रोजी पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील शंकरपूर मासेमारी बंदरातून १५ मासेमारांना घेऊन समुद्रात मासेमारीसाठी निघाला होता. ६ जुलै नंतर ट्रॉलरशी संपर्क तुटला होता. समुद्रात अनेक दिवस राहिल्यामुळे मृतदेह खूप कुजले आहेत आणि त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. आता त्यांची ओळख डीएनए तपासणीनंतरच पटू शकेल, असे अधिकाऱ्याने सांगितले. पंतप्रधान मोदींनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना पीएमएनआरएफ मधून प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

## पोलिस वाहनाची ट्रकला धडक; कॉन्स्टेबलचा मृत्यू

**धनबाद, १४ जुलै**

झारखंडच्या धनबाद जिल्ह्यात मंगळवारी एका पोलिस कॉन्स्टेबलचा मृत्यू झाला आणि इतर तीन पोलिस कर्मचारी जखमी झाले. त्यांचे वाहन रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका ट्रकला धडकल्याने ही घटना घडली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. जखमींपैकी एकाची प्रकृती गंभीर आहे, तर उर्वरित दोघे धोक्याबाहेर आहेत, असे त्यांनी सांगितले. ही घटना बरवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील जीटी रोडवर घडली. धनबादमधील मैथन धरण चौकीच्या परिसरात एका कारवाईनंतर हे पोलिस कर्मचारी हजारीबागला परतत असताना ही घटना घडली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. मृत कॉन्स्टेबलची ओळख राम लखन यादव अशी पटली आहे. ते कोडरमा जिल्ह्यातील जयनगरचे रहिवासी होते, अशी माहिती ज्या पोलिस पथकाचा ते भाग होते त्या चालकुशा पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सूर्यकांत यांनी दिली. ◂(वृत्तसंस्था)

# दहशतवाद मुळापासून उखडून टाकू

**| एस. जयशंकर यांचे प्रतिपादन | सुरक्षा परिषदेच्या सदस्यत्वासाठी भारताची मोहीम सुरू**



**नवी दिल्ली, १४ जुलै**

भारताने २०२८-२९ च्या कार्यकाळासाठी संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेच्या (यूएनएससी) तात्पुरत्या सदस्यत्वासाठीच्या प्रयत्नात जगासमोर आपला स्पष्ट अजेंडा मांडला आहे. सोमवारी संयुक्त राष्ट्र मुख्यालयात भारताच्या मोहिमेचा शुभारंभ करताना परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी सांगितले की, सुरक्षा परिषदेचे तात्पुरते सदस्य म्हणून निवडून आल्यास भारत दहशतवादी वित्तपुरवठा रोखणे, सागरी सुरक्षा मजबूत करणे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या (एआय) उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा जबाबदार व मानवकेंद्रित वापर यास प्राधान्य देईल.

जयशंकर पुढे म्हणाले, दहशतवाद हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. आतापर्यंत जग केवळ दहशतवादाच्या लक्षणांशी लढत आहे. परंतु, दहशतवाद्यांची आर्थिक आणि वित्तीय शक्ती नष्ट केल्यावरच कायमस्वरूपी तोडगा निघेल. दहशतवादी वित्तपुरवठा प्रभावीपणे रोखणे ही आमची वचनबद्धता आहे. आम्ही दहशतवादी संघटनांच्या सूचीकरणासाठी वस्तुनिष्ठ आणि ठोस पुराव्यांवर आधारित प्रस्तावांनाही प्रोत्साहन देऊ, असेही त्यांनी सांगितले.

**जागतिक सागरी व्यापार अखंडपणे सुरू रहावा**

आज जागतिक अर्थव्यवस्था पुरवठा साखळ्यांद्वारे एकमेकांशी जोडलेली आहे. त्यामुळे, सागरी व्यापाराचे सुरक्षित आणि अखंड संचालन हे संपूर्ण जगाच्या हिताचे आहे. यासंदर्भात आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन सुनिश्चित करणे ही एक प्राथमिक गरज आहे. चाचेगिरीसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम देशांनी एकत्र काम केले पाहिजे, जेणेकरून जागतिक सागरी व्यापार अखंडपणे सुरू राहील, असेही ते म्हणाले.

**सागरी सुरक्षा मुद्द्यांना योग्य महत्त्व दिले जाईल**

भारताने सागरी सुरक्षेच्या क्षेत्रात दीर्घकाळापासून सक्रिय भूमिका बजावली आहे. शोध आणि बचाव कार्य, मानवतावादी मदत आणि आपत्ती निवारण, क्षमता बांधणी आणि सर्वोत्तम पद्धतींची देवाणघेवाण हे भारताच्या प्रमुख उपक्रमांपैकी आहेत. भारताचे आंतरराष्ट्रीय फ्यूजन केंद्र हिंद महासागर क्षेत्रात एक सहयोगी नेटवर्क चालवते. भारत हे सुनिश्चित करेल की, या सागरी सुरक्षा मुद्द्यांना संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत योग्य महत्त्व दिले जाईल, असेही जयशंकर यांनी स्पष्ट केले. ◂(वृत्तसंस्था)

### एआयच्या वापरासाठी जबाबदार शासन आवश्यक

उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा संदर्भ देत जयशंकर पुढे म्हणाले, आर्टिफिशियल इंटेलिजन्स संधी तसेच नवीन आव्हाने घेऊन येते. त्यामुळे, त्याच्या वापरासाठी मानवकेंद्रित आणि जबाबदार शासन आवश्यक आहे. भारताने एआयसाठी 'मानव' आराखडा प्रस्तावित केला आहे. याचा अर्थ नैतिक आणि नीतिमत्तापूर्ण प्रणाली, उत्तरदायी शासन, राष्ट्रीय सार्वभौमत्व, सुलभ आणि सर्वसमावेशक प्रणाली आणि वैध व कायदेशीर प्रणाली असा आहे. ■

### एआयचे फायदे सुनिश्चित करण्यासाठी भारत कटिबद्ध

भारताने जागतिक डिजिटल दरी कमी करण्यासाठी सातत्याने योगदान दिले आहे. एआयबाबतचा दृष्टिकोनही तितकाच सर्वसमावेशक आहे. याच उद्देशाने, भारतात नुकत्याच झालेल्या 'एआय इम्पॅक्ट समिट'ची संकल्पना 'सर्वांसाठी एआय' ही होती. एआयचे फायदे सर्व देशांपर्यंत आणि समाजांपर्यंत पोहोचतील हे सुनिश्चित करण्यासाठी भारत कटिबद्ध आहे, असेही त्यांनी सांगितले. ■

## अग्रलेख

# मास्तरांच्या मल्टिटास्किंगचा मुद्दा...

एका छोट्या उद्योगपतीकडे कार चालविण्यासाठी एक चालक होता. त्याचे थोडेसेही रिकामे किंवा शांत बसणे त्या उद्योगपतींना आवडत नसे. गाडीतून उतरल्या-उतरल्या त्याला काही ना काही काम सांगितले जाई. कधी झेरॉक्स काढ, पाणी दे, कधी पाण्याचा पंप लावून ये तर कधी झाडपूस कर इत्यादी. अगदी मालकांना विड्याचे पान लावून देण्यापर्यंतची कामे हा चालक करायचा. अधूनमधून कारही चालवायचा. तेव्हा मल्टिटास्किंग स्टाफ अर्थात एमटीएस ही संकल्पना नव्हती. ती आता बऱ्यापैकी रुजू झाली आहे. आजकाल एमटीएस म्हणून सेवा देणारी व्यक्ती कितपत बहुविध प्रकारची कामे करते, हे सांगता येत नाही. आपल्याकडील शिक्षकांना एमटीएसमध्ये रूपांतरित करण्याचा विडा प्रशासकीय व्यवस्थेने उचललेला आहे हे मात्र नक्की सांगता येते! शिक्षकाला सर्वोच्च दर्जा देण्याची आणि 'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु' वगैरे म्हणण्याची आपली जुनीच पद्धत. शिक्षक किंवा मास्तर म्हणजे विद्यार्थ्यांना शिकवणारी किंवा त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि जीवन घडविणारी व्यक्ती असाच आपला साऱ्यांचा समज. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करणे, त्यांच्या जिज्ञासेला चालना देणे, अभ्यासात मागे असलेल्या मुलांकडे लक्ष देणे आणि उद्याची सक्षम पिढी घडविणे, हीच खरी शिक्षकांची कामे. मात्र, सध्याची परिस्थिती पाहिली तर शिक्षकांच्या हातातील खडू-पुस्तके हळूहळू गायब होत असून, त्यांची जागा सरकारी कामांच्या फायली आणि विविध प्रकारच्या माहितीच्या तक्त्यांनी घेतली आहे. शिक्षकांना विविध प्रकारची १५ अशैक्षणिक कामे सक्तीने करावी लागत आहेत. मुख्याध्यापकांवर तर १९४ प्रकारच्या कामांचा बोजा टाकण्यात आला आहे. विद्यार्थ्यांसह शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेचा केंद्रबिंदू. प्रत्येक विद्यार्थ्याची आकलनक्षमता वेगळी असते. कुणाला गणित अवघड जाते, कुणाला भाषा समजत नाही, कुणाच्या मनात प्रश्न असतात; पण ते विचारण्याचे धाडस नसते. अशा प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्याचे काम शिक्षकाला करावे लागते. त्यासाठी वेळ हवा, मानसिक शांतता हवी आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शिक्षकाला शिकविण्याचे स्वातंत्र्य हवे. घडतेय ते असे की, शिक्षकांचा बराच वेळ अध्यापनाऐवजी इतर कामांमध्ये खर्च होत आहे. विविध प्रकारची माहिती गोळा करणे, सर्वेक्षणे करणे, सरकारी योजनांची आकडेवारी भरणे, ऑनलाईन नोंदी अद्ययावत करणे, अहवाल तयार करणे आणि वरिष्ठ प्रशासकीय कार्यालयांना माहिती पाठविणे अशा असंख्य जबाबदाऱ्या शिक्षकांच्या खांद्यावर टाकण्यात आल्या आहेत. एक प्रकारे त्यांना 'एमटीएस' बनविण्याचा सारा खटाटोप दिसतो. निवडणूक असली की शिक्षकांची आठवण होते. जनगणना असली तरी शिक्षक हवेत. सरकारी सर्वेक्षण करायचे असेल तरी शिक्षकच पाहिजेत. एखाद्या योजनेची माहिती गोळा करायची असेल तरी शिक्षक. सरकारच्या प्रत्येक विभागासाठी सहज उपलब्ध होणारा कर्मचारी म्हणजे शिक्षक, अशीच मानसिकता प्रशासनात निर्माण झाली आहे. सरकारी यंत्रणेची इतर कामे करण्यासाठी स्वतंत्र कर्मचारी आणि विभाग असताना शिक्षकांनाच वारंवार अशा कामांसाठी का जुंपले जाते, असा प्रश्न विचारला जाऊ शकतो. परंतु, आतापर्यंत या प्रश्नाचे उत्तर कुणीही दिले नाही हेही तेवढेच खरे. कारण असे सांगतात की, सरकार त्याला पगार देत असते. मग शासनाच्या इतर विभागांत काम करणाऱ्यांना कोण पगार देतं? डॉक्टरला रुग्णांवर उपचार करण्याऐवजी सरकारी कार्यालयात फायली तपासण्याचे काम दिले, अभियंत्याला बांधकामांची पाहणी करण्याऐवजी जनगणनेसाठी पाठविले किंवा पोलिसांना कायदा-सुव्यवस्था राखण्याऐवजी महसुली सर्वेक्षणात गुंतविले तर ते जसे चुकीचे ठरेल, तसेच शिक्षकांना अशैक्षणिक कामांमध्ये गुंतविणेही चुकीचे आहे. याचा फटका शेवटी विद्यार्थ्यांना बसतो. शिक्षकांची अशैक्षणिक कामे वाढली की त्यांचा शाळा आणि वर्गातील वेळ कमी होतो. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. परिणामी शाळेत उपस्थित राहूनही अनेक विद्यार्थ्यांच्या मूलभूत संकल्पना स्पष्ट होत नाहीत. पुढील वर्गात गेल्यानंतर अभ्यास आणखी कठीण होतो आणि अशा विद्यार्थ्यांचे भविष्यच बिघडते.

एका बाजूला सरकार शैक्षणिक गुणवत्ता सुधारण्याच्या घोषणा करते. शाळांची गुणवत्ता तपासली जाते. शिक्षकांच्या कामगिरीचे परीक्षण होते. निकाल कमी लागला तर शिक्षकांना जबाबदार धरले जाते. मग त्याच शिक्षकांना वर्षभरात प्रत्यक्ष शिकविण्यासाठी किती वेळ दिला जातो, याचा हिशेब कोण करणार? शिक्षकाला शिकविण्याऐवजी सरकारी माहिती गोळा करण्यात गुंतवायचे आणि नंतर शिक्षणाची गुणवत्ता घसरल्याबद्दल त्यालाच दोष द्यायचा, हे कसे? वर्गात जाण्यापूर्वी शिक्षकाला तयारी करावी लागते, उदाहरणे शोधावी लागतात. प्रश्नपत्रिका तयार कराव्या लागतात. उत्तरपत्रिका तपासाव्या लागतात. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे निरीक्षण करताना पालकांशी संवादही साधावा लागतो. स्वतःचे ज्ञान अद्ययावत ठेवावे लागते. ही सर्व कामे शैक्षणिक प्रक्रियेचाच भाग आहेत. शिक्षकांचा वेळ अशैक्षणिक कामांत खर्च झाला तर या महत्त्वाच्या जबाबदाऱ्यांसाठी वेळ उरणार कसा आणि असा मल्टिटास्किंग मास्तर पिढ्यांचे भविष्य घडवणार कसा?

शिक्षण क्षेत्रासमोरील आव्हाने आधीच कमी नाहीत. सरकारी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अनेक शाळांमध्ये शिक्षकांची असंख्य पदे रिक्त आहेत. अशा परिस्थितीत उपलब्ध शिक्षकांनाही इतर कामांसाठी शाळेबाहेर पाठविले तर विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी कोण घेणार? शिक्षणाचा अधिकार कायदा असो किंवा न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले निर्देश असोत, त्यामागील मूलभूत भूमिका स्पष्ट आहे. शिक्षकांचा अधिकाधिक वेळ अध्यापनासाठी उपलब्ध असला पाहिजे. मात्र, प्रत्यक्ष परिस्थितीत अपेक्षित बदल झालेला दिसत नाही. आदेश निघतात, परिपत्रके जारी होतात; पण प्रशासकीय यंत्रणेची शिक्षकांकडे पाहण्याची मानसिकता बदलत नाही. कोणतेही तातडीचे काम आले की सर्वांत आधी शिक्षकांची यादी मागविली जाते. शिक्षण प्रक्रियेशी संबंधित कामे शिक्षकांना दिली गेली तर हरकत नाही. अपवादात्मक परिस्थितीत अन्य कामेही राष्ट्रहिताच्या दृष्टीने त्यांच्याकडे सोपविता येतील. मात्र, अपवादाचे रूपांतर नियमात होणे धोकादायक आहे. सरकारने यासाठी स्पष्ट धोरण आखण्याची गरज आहे. शिक्षकांना कोणती कामे देता येतील आणि कोणती देता येणार नाहीत, याची निश्चित यादी असली पाहिजे. प्रत्येक विभागाने आपल्या कामासाठी आवश्यक स्वतंत्र मनुष्यबळ उभारले पाहिजे. सरकारच्या अनेक विभागांमध्ये असंख्य कर्मचाऱ्यांना कामच नाही. ज्यांना काहीच काम नसेल आणि तरीही ज्यांना पोसायचे असेल, अशांचा विशेष संवर्ग तयार करून अशा कामांसाठी गुंतविला तर साऱ्यांचेच भले होईल. शिक्षकांनीही बदलत्या काळानुसार आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. अशैक्षणिक कामांना विरोध करताना अध्यापनाच्या गुणवत्तेबाबत त्यांनी अधिक सजग राहणे आवश्यक आहे. शिक्षकांना वर्गात राहू द्या, ही मागणी रास्तच; पण प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचण्याची जबाबदारीही तितक्याच प्रामाणिकपणे पार पाडली गेली पाहिजे. शैक्षणिक गुणवत्तेची चिंता सरकारला खरोखरच असेल तर एक साधी गोष्ट करण्याची गरज आहे. ती म्हणजे शिक्षकांना वर्गात शिकवू द्या. त्यांच्या हातातील फायली कमी करा आणि खडू पुन्हा त्यांच्या हातात द्या. शिक्षक वर्गात असेल तरच विद्यार्थी शिकेल आणि विद्यार्थी शिकला तरच समाज पुढे जाईल. अन्यथा शिक्षणाच्या गुणवत्तेवर चर्चा होत राहतील, समित्यांचे अहवाल येतील, पण मूलभूत प्रश्न तसाच राहील... तो म्हणजे-शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शिकवायचे कधी? ■

## विशेष

# 'बेस्ट'ला नवी दिशा

**प्रा. सुखदेव बखळे**

मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी म्हणून ओळखली जाते. लाखो नागरिकांचे दैनंदिन जीवन येथील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेवर अवलंबून आहे. लोकल रेल्वेनंतर सर्वाधिक महत्त्वाची सेवा म्हणजे बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट). गेल्या अनेक दशकांपासून या 'बेस्ट'ने मुंबईकरांना परवडणारी, विश्वासार्ह आणि सर्वसमावेशक बससेवा पुरवली. मात्र वाढती लोकसंख्या, खाजगी वाहनांची वाढ, आर्थिक अडचणी, जुनाट पायाभूत सुविधा आणि बदलत्या शहरी गरजा यामुळे 'बेस्ट'समोर अनेक आव्हाने उभी राहिली. या पृष्ठभूमीवर राज्य सरकारने बेस्टच्या २२ बस आगारांच्या पुनर्विकासाचा महत्त्वाकांक्षी आराखडा तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. हा केवळ इमारतींचा पुनर्विकास नसून मुंबईच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा व्यापक कायापालट करण्याचा प्रयत्न मानला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच झालेल्या बैठकीत या पुनर्विकासासाठी नागरिकांचे हित, कर्मचाऱ्यांचे कल्याण आणि शहराचा दीर्घकालीन विकास हे तीन मूलभूत आधारस्तंभ निश्चित केले. सार्वजनिक वाहतूक ही नफ्याच्या निकषावर चालणारी सेवा नसून सामाजिक जबाबदारी आहे, ही बाब लक्षात घेऊन हा आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी दिले. त्यामुळे या प्रकल्पाकडे केवळ रिअल इस्टेट विकास म्हणून न पाहता शहराच्या भविष्यातील गरजांशी जोडलेल्या परिवर्तनाच्या उपक्रमाच्या रूपात पाहणे आवश्यक आहे.

मुंबईतील सुमारे १३२ एकर क्षेत्रावर पसरलेल्या 'बेस्ट'च्या २२ बस आगारांचा सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर पुनर्विकास करण्याची योजना आहे. या प्रकल्पात आधुनिक बस आगारे, स्मार्ट ईव्ही चार्जिंग सुविधा, कर्मचाऱ्यांसाठी निवासी घरे, व्यावसायिक संकुले, किरकोळ विक्री केंद्रे, सार्वजनिक वाहनतळ, कला दालने आणि नागरिकांसाठी खुल्या जागांचा समावेश करण्यात येणार आहे. या माध्यमातून उपलब्ध जमिनीचा अधिक कार्यक्षम वापर करून उत्पन्नाचे नवीन स्रोत निर्माण करण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे. 'बेस्ट'ची आर्थिक स्थिती गेल्या अनेक वर्षांपासून चिंतेचा विषय राहिली आहे. वाढता खर्च, मर्यादित महसूल आणि प्रवासी संख्येतील चढ-उतार यामुळे या उपक्रमावरील आर्थिक ताण वाढत गेला. अशा



परिस्थितीत बस आगारांमधील उपलब्ध जागेचा सुयोग्य वापर करून अतिरिक्त उत्पन्न निर्माण करणे ही काळाची गरज बनली. व्यावसायिक विकासातून मिळणारे उत्पन्न बससेवा अधिक सक्षम करण्यासाठी वापरता आले, तर 'बेस्ट'ची आर्थिक शाश्वतता मोठ्या प्रमाणात सुधारू शकते. या संपूर्ण प्रक्रियेत सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे 'बेस्ट'च्या जमिनींची मालकी कायम उपक्रमाकडेच राहणार आहे. पुनर्विकासासाठी जमीन विकली जाणार नसून सार्वजनिक-खाजगी भागीदारी आणि दीर्घकालीन भाडेपट्टा या पद्धतीचा अवलंब केला जाणार आहे. यामुळे सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करतानाच तिचा अधिक परिणामकारक वापर करण्याचा मार्ग खुला होतो.

मुंबईसारख्या शहरात जमिनीचे मूल्य अत्यंत मोठे असल्याने या धोरणाला विशेष महत्त्व प्राप्त होते. पुनर्विकासामध्ये कर्मचाऱ्यांच्या हितालाही प्राधान्य देण्यात आले आहे. अनेक कर्मचाऱ्यांच्या निवासाच्या समस्या, जुन्या वसाहती आणि अपुऱ्या सुविधा या दीर्घकाळापासून प्रलंबित आहेत. नव्या आराखड्यात कर्मचाऱ्यांसाठी आधुनिक घरे उभारण्याचा प्रस्ताव आहे. त्यामुळे त्यांच्या राहणीमानात सुधारणा होण्यास मदत होईल. कर्मचारी समाधानी असतील, तर सेवेच्या गुणवत्तेवरही त्याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. भविष्यातील वाहतुकीचा विचार करता इलेक्ट्रिक बस हा अत्यंत महत्त्वाचा घटक ठरणार आहे. त्यामुळे प्रत्येक प्रमुख बस आगारात 'स्मार्ट ईव्ही चार्जिंग' सुविधा उभारण्याचा निर्णय दूरदृष्टीचा मानला जात आहे. प्रदूषणमुक्त आणि ऊर्जा कार्यक्षम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभारण्यासाठी ही सुविधा अत्यावश्यक आहे.

मराठी चित्रपटांसाठी निवडक बस आगारांमध्ये ३०० ते ४०० आसनक्षमतेची चित्रपटगृहे उभारण्याचा प्रस्तावही लक्षवेधी आहे. मुंबई ही मराठी चित्रपटसृष्टीचे प्रमुख केंद्र असली, तरी मराठी चित्रपटांसाठी स्वतंत्र प्रदर्शनस्थळांची संख्या मर्यादित आहे. या उपक्रमामुळे मराठी चित्रपटांना नवे व्यासपीठ मिळू शकते. त्याचबरोबर नागरिकांना वाहतूक केंद्रांमध्येच मनोरंजनाच्या सुविधा उपलब्ध होतील. 'बेस्ट'च्या बस ताफ्यामध्ये सात हजार नवीन बसेसचा समावेश करण्याचा प्रस्तावही तितकाच महत्त्वाचा आहे. मुंबईतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी दहिसर, मानखुर्द, मुलुंड आणि ऐरोली येथील जकात नाक्यांना वाहतूक केंद्रांच्या स्वरूपात विकसित करण्याचा प्रस्तावही महत्त्वाचा आहे.

सिंगापूर, पॅरिस, हाँगकाँग आणि लंडनसारख्या शहरांमध्ये बस आगारे ही केवळ बसेस उभी करण्याची ठिकाणे नसून बहुउद्देशीय शहरी केंद्रे आहेत. त्या धर्तीवर मुंबईतील बस आगारे विकसित करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यामुळे प्रवाशांना अधिक सुरक्षित, स्वच्छ, तंत्रज्ञानाधारित आणि सुविधायुक्त सेवा मिळू शकते. तथापि, या प्रकल्पासमोर काही आव्हानेही आहेत. सार्वजनिक-खाजगी भागीदारीमध्ये पारदर्शकता राखणे, करारांची प्रभावी अंमलबजावणी, प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि पुनर्विकासादरम्यान बससेवा सुरळीत सुरू ठेवणे ही मोठी जबाबदारी असेल. याशिवाय व्यावसायिक विकासाच्या नावाखाली सार्वजनिक हिताला दुय्यम स्थान मिळणार नाही, याचीही काळजी घ्यावी लागेल. नागरिक, कर्मचारी संघटना आणि तज्ज्ञांचा सहभाग घेऊन निर्णय प्रक्रिया अधिक विश्वासार्ह बनवणे आवश्यक ठरेल. 'बेस्ट' ही मुंबईची ओळख आहे. त्यामुळे तिच्या पुनर्विकासाकडे केवळ बांधकाम प्रकल्प म्हणून न पाहता सार्वजनिक वाहतुकीच्या भविष्याशी संबंधित सुधारणा म्हणून पाहणे गरजेचे आहे. 'विकसित महाराष्ट्र' आणि 'विकसित भारत २०४७' या संकल्पनांच्या दिशेने वाटचाल करताना मजबूत सार्वजनिक वाहतूक व्यवस्था हा विकासाचा अत्यावश्यक पाया आहे. 'बेस्ट'च्या बस आगारांचा प्रस्तावित पुनर्विकास यशस्वी होणे हा मुंबईच्या वाहतूक व्यवस्थेचाच नाही, तर देशातील इतर महानगरांसाठीही एक आदर्श नमुना ठरू शकतो. त्यामुळे या प्रकल्पाच्या अंमलबजावणीकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. ■

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**गिरीश शेरेकर**

# जन्म-मृत्यू सुलभ, प्रमाणपत्र कठीण

पूर्वी अगदी सहजतेने जन्म व मृत्यूचे दाखले मिळत होते. पण, गेल्या काही वर्षांत त्यामध्ये कमालीचा बोगसपणा झाला. प्रत्येक जिल्हास्थानावर हजारोंच्या संख्येने बनावट दाखले तयार झाल्याचे समोर आले. त्याचे दुष्परिणाम जाणवयाला लागल्याने दाखले देण्याची प्रक्रिया अधिक काटेकोर करण्याची आणि बनावट दाखले रद्द करण्याची मागणी झाली. त्यात अनेकांचे दाखले रद्द झाले तर काहींवर फौजदारी कारवाई सुरू करण्यात आली. संपूर्ण देशातच ही समस्या असल्याने दाखले देण्याची ठोस कार्यप्रणाली तयार करण्याची गरज लक्षात आली. त्यानुसार केंद्र सरकारने नागरी नोंदणी प्रणाली (सीआरएस) १ ऑक्टोबर २०२३ पासून देशभरात अनिवार्य केली आहे. या प्रणालीवर जन्म व मृत्यूची डिजिटल नोंदणी करणे बंधनकारक आहे. या प्रणालीद्वारे तयार झालेले प्रमाणपत्रच आता ग्राह्य धरले जाते. केंद्र सरकारने सुद्धा महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी जन्म व मृत्यू दाखले बंधनकारक केल्याने अनेकांसाठी हे प्रमाणपत्र आवश्यक झाले. त्यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांकडे धाव घेतली आहे. तेथे गेल्यावर त्यांना जन्म-मृत्यू सुलभ पण, प्रमाणपत्र कठीण यांचा अनुभव येत आहे. त्यांची ओरड सुरू झाली आहे. प्रमाणपत्र देण्याचे नवे नियम पूर्वानुभव लक्षात घेऊन अत्यंत कडक बनवले आहे. त्यात बदल करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारलाच आहे. नव्या नियमानुसार जन्म व मृत्यूच्या एक महिन्याच्या आत अर्ज केला तर प्रमाणपत्र देण्याचा अधिकार स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्राधिकृत अधिकाऱ्याला आहे. महिना उलटून गेल्यावर एक वर्षापर्यंत अर्ज केला तर संबंधित अधिकारी पोर्टलवर नोंदणी घेऊन आवश्यक पुराव्यासह सदर अर्ज मंजुरीसाठी जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे पाठवितो. ते अर्ज आणि पुराव्यांची शहानिशा करतात आणि ओटीपीद्वारे डिजिटल स्वाक्षरी करून मंजुरी देतात. पुराव्यांवर काही संशय आला तर अर्ज परत पाठविला जातो. संपूर्ण जिल्ह्यासाठी हा एकमेव अधिकारी प्राधिकृत करण्यात आला आहे. देशभरात हीच पद्धत आहे. एकट्या अमरावती जिल्ह्याचा विचार करायचा झाल्यास आजच्या स्थितीत अडीच हजार दाखले मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. विशेष म्हणजे हा अधिकारी फक्त याच कामासाठी नाही. त्याच्या मूळ कामाच्या व्यतिरिक्त हे काम त्याला स्वतःलाच करायचे असल्याने तो कितपत न्याय देईल हा प्रश्नच आहे. जन्म आणि मृत्यूच्या एक वर्षानंतर प्रमाणपत्रासाठी अर्ज केला तर प्रकरण तहसीलदाराकडे जाते. दुसरे महत्त्वाचे म्हणजे महापालिकेला एका महिन्यात २ हजारापेक्षा जास्त प्रमाणपत्र देता येत नाही. हा नियम सरसकट सर्व महापालिकांसाठी आहे. त्यामुळे मोठीच अडचण झाली आहे. ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपरिषद यांच्यासाठी प्रमाणपत्र देण्याची मर्यादा मान्य होऊ शकते. कारण, तेथे मागणी टाकण्यात आलेल्या मर्यादेपेक्षाही कमी आहे. फक्त एखादी मोठी नगरपरिषद त्याला अपवाद असू शकते. महापालिका क्षेत्र खूप मोठे असते. येथे जन्माचे व मृत्यचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याने प्रमाणपत्राची मागणी देखील जास्त असते. या सर्व प्रक्रियेत आणखी एक अडचण म्हणजे २०१६ पूर्वीच्या जन्म व मृत्यूच्या नोंदी पोर्टलवर झालेल्या नाहीत. तेव्हाचे दाखले द्यायचे असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थेला पहिले पोर्टलवर नोंद घ्यावी लागते आणि त्यांच्याकडे असलेला नोंदीचा पुरावा जोडून मंजुरीला पाठवावा लागतो. जेव्हापासून नव्या नियमानुसार काम होत आहे, तेव्हापासून प्रत्येक महापालिकेच्या जन्म व मृत्यू विभागासमोर लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहे. दाखले मिळण्यासाठी फार वेळ लागत असल्याने काहींचा तर संताप अनावर होत आहे.

सध्या जी काही स्थिती निर्माण झाली आहे, त्यावर तातडीने मार्ग काढावा म्हणून महापालिकेचे पदाधिकारी राज्य सरकारकडे पाठपुरावा करीत आहेत. पण, राज्य सरकारचे सुद्धा हात बांधले आहे. नियमांमध्ये बदल करण्याचा अधिकार फक्त केंद्र सरकारलाच आहे. त्यांच्या पुढे हा विषय मांडायचा म्हणजे मुख्यमंत्र्यांमार्फतच तो केंद्रीय गृहमंत्र्यांसमोर मांडला जाऊ शकतो. मुख्यमंत्र्यांनी ही अडचण त्यांच्या लक्षात आणून द्यावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत. प्राधिकृत अधिकाऱ्यांची संख्या वाढविणे आणि महापालिकास्तरावर दाखले देण्याच्या संख्येत वाढ करणे, या दोनच प्रमुख मागण्यात आहेत. एका चांगल्या उद्देशाने जन्म व मृत्यू प्रमाणपत्रासाठीचे नवे नियम लावण्यात आले आहेत. फक्त त्यांची कार्यप्रणाली सुलभ व्हावी, हीच अपेक्षा आहे. ■

९४२०७२१२२५

## धर्म संस्कृती

# दुर्गतिनाशिनी नवदुर्गा

**प्रा. दिलीप जोशी**

भारतीय उपासकांमध्ये शैव, वैष्णव, गाणपत्य असे विविध प्रकार आहेत. त्यातच आसेतुहिमाचल असणारा संप्रदाय म्हणजे शाक्त; जे शक्तीची म्हणजे देवीची उपासना करतात. वेदात शक्तीला 'श्री' म्हणतात. या 'श्री'ची तीन रूपे, दशरूपे अशी विविध रूपे आहेत. पण प्रामुख्याने देशभरात नवरूपांची उपासना केली जाते. त्या रूपांना नवदुर्गा म्हणून संबोधिले जाते. मार्कण्डेय पुराणात प्रसिद्ध अशी दुर्गा सप्तशती दिली आहे. या सप्तशतीचाच भाग कवच, किलक आणि अर्गला स्तोत्र आहे. यातील कवच स्तोत्रात नवदुर्गांचा उल्लेख पुढील श्लोकातून आहे.

प्रथमं शैलपुत्री च द्वितीयं ब्रह्मचारिणी।
तृतीयं चन्द्रघण्टेति कूष्माण्डेति चतुर्थकम्॥
पंचमं स्कन्दमातेति षष्ठं कात्यायनीति च।
सप्तमं कालरात्रीति महागौरीति चाष्टमम्॥
नवमं सिद्धिदात्री च नवदुर्गाः प्रकीर्तिताः।

यामध्ये १) शैलपुत्री २) ब्रह्मचारिणी ३) चंद्रघंटा ४) कूष्मांडा ५) स्कंदमाता ६) कात्यायनी ७) कालरात्री ८) महागौरी ९) सिद्धिदात्री ही दुर्गेची नवरूपे आहेत. या नवदुर्गांचा आज विचार करू.

**१) शैलपुत्री :** देवी भगवतीचे हे प्रथम स्वरूप असून केनोपनिषदानुसार हीच परब्रह्मपरमात्म्याची आद्याशक्ती असून तिचे नाव हैमवती आहे. शैल म्हणजे पर्वत आणि पुत्री म्हणजे कन्या. पर्वतराज हिमालय आणि मैनादेवी यांची ही कन्या म्हणून ती शैलपुत्री हिमवती.

वन्दे वांच्छितलाभाय चन्द्रार्धकृतशेखराम्।
वृषारूढां शूलधरां शैलपुत्रीं यशस्विनीम्॥

जिच्या उजव्या हातात त्रिशूळ आणि डाव्या हातात पद्म म्हणजे कमळ आहे. जी वृषभारुढा म्हणजे बैलावर बसलेली आहे. देवी सतीचा हा पुनर्जन्म आहे. योगशास्त्रानुसार आई शैलपुत्री ही मूलाधार चक्रावर स्थित आहे. तेथून चेतनेची सर्वोच्च पातळी गाठण्याची प्रेरणा ती देते म्हणून ती हैमवती. परमोच्च पातळीवर गेल्यावरच चैतन्याची अनुभूती येते.

**२) ब्रह्मचारिणी :** नवदुर्गारूपातील द्वितीयं ब्रह्मचारिणी म्हणजे दुर्गेचे दुसरे रूप ब्रह्मचारिणी रूप आहे. हे दुर्गेचे योगिनी रूप आहे.

दधाना करपदमाभ्यामक्षमालाकमंडलू।
देवी प्रसिदतु मयि ब्रम्हाचारिण्यनुमत्तमा॥

श्वेतवस्त्र, उजव्या हातात जपमाळ आणि डाव्या हातात कमंडलू आहे म्हणून ती ब्रह्मचारिणी आहे. ती शैलपुत्री म्हणजे हिमालय कन्या आहे. तिने देवर्षी नारदांच्या सूचनेवरून भगवान शिवांना पती म्हणून प्राप्त करण्यासाठी कठोर तप केले.

**३) चंद्रघंटा :** नवदुर्गेतील एक रूप चंद्रघंटा आहे.

पिण्डजप्रवरारूढ़ा ण्डकोपास्त्रकेर्युता।
प्रसादं तनुते मह्यं चंद्रघण्टेति विश्रुता॥

तिच्या मस्तकावर घंटेच्या आकाराचा चंद्र असतो. ती दशप्रहरणधारिणी असून त्रिशूल, गदा, भाला, धनुष्य, बाण, तलवार, रुद्राक्षमाला, कमंडलू, कलश आणि अभयमुद्रेत असणारी चंद्रघंटा म्हणजेच महिषासुरमर्दिनी आहे. महिषासुर मातला तेव्हा देवांच्या क्रोध आणि उर्जेतून ही शक्ती निर्माण झाली.

**४) कूष्मांडा :** भगवतीचे चौथे रूप कूष्मांड रूप आहे. कु म्हणजे लघु, उष्म म्हणजे ऊर्जा, उष्णता आणि अंड म्हणजे बीज म्हणून तिचे नाव कूष्मांड आहे.

सुरासम्पूर्णकलशं रूधिराप्लुतमेंव च।
दधाना हस्तपदमाभ्यां कुष्माण्डा शुभदास्तु में॥

ती अष्टभुजा असून तिच्या आठ हातात कमंडलू, धनुष्य, बाण, कमळ, अमृतकलश, चक्र, गदा आणि जपमाळ आहे. ती सिंहावर बसली आहे. ती अनाहत चक्रात स्थित आहे. जगनिर्माती म्हणून ती जगतजननी आहे.(कूष्मांड म्हणजे कोहळा भोपळा)

**५) स्कंदमाता :** स्कंद हे शिवपुत्र कार्तिकेय यांचे नाव आहे. त्यामुळे स्कंदमाता म्हणजे कार्तिकस्वामींची माता.

सिंहासनगता नित्यं पद्माश्रितकरद्वया।
शुभदास्तु सदा देवी स्कंदमाता यशस्विनी!!

तिचे वाहन सिंह आहे. भगवती स्कंदमातेला चार हात असून दोन हातात कमळ आहेत. तिच्या मांडीवर बाळ कार्तिकेय आहेत. तिसऱ्या हाताने तिने बाळाला धरले आहे तर चौथा हात अभयमुद्रेत आहे.

**६) कात्यायनी :** आदिमाया कात्यायनी भगवती दुर्गेचे सहावे रूप.

कंचनाभा वराभयं पद्मधरां मुकटोज्जवलां।
स्मेरमुखीं शिवपत्नी कात्यायनी नमोस्तुते॥

कात्यायनी माता सिंहावर विराजमान आहे. तिला चार हात असून दोन हातात तलवार आणि कमळ तर दुसरे दोन हात अभयमुद्रा आणि वरदमुद्रेत आहेत.

**७) कालरात्री :** आदिशक्तीचे कालरात्री हे विक्राळ स्वरूप आहे.

एकवेणी जपाकर्णपूरा नग्ना खरास्थिता,
लम्बोष्टी कर्णिकाकर्णी तैलाभ्यक्तशरीरिणी।
वामपादोल्ल सल्लोहलता कण्टक भूषणा,
वर्धनमूर्धध्वजा कृष्णा कालरात्रिर्भयङ्करी॥

रंग काळा, केश मोकळे, एका हातात खड्ग तर दुसऱ्या हातात काटेरी शस्त्र, दुसरे दोन हात अभय आणि वरद मुद्रेत. काळरात्री मातेचे वाहन गर्दभ म्हणजे गाढव आहे.

**८) महागौरी :** आदिशक्तीचे आठवे रूप महागौरी होय. महा म्हणजे सर्वाधिक आणि गौरी म्हणजे गौर वर्णाची.

श्वेते वृषेसमारूढा श्वेताम्बरधरा शुचिः।
महागौरी शुभं दद्यान्महादेव प्रमोददा॥

आत्यंतिक तेजस्वी गौरवर्णाची महागौरी श्वेत वस्त्र घालून श्वेत वृषभवाहिनी आहे. जिच्या दोन हातात त्रिशूळ आणि डमरू आहेत. दुसरे दोन हात अभय आणि वरदमुद्रेत आहेत.

**९) सिद्धिदात्री :** भगवती आदिमाया दुर्गेचे एक रूप सिद्धिदात्री आहे. सिद्धी म्हणजे अलौकिक शक्ती आणि दात्री म्हणजे देणारी. भगवान शिवाला या आद्याशक्तीने अष्टसिद्धी दिल्या म्हणून तिचे नाव सिद्धिदात्री पडले.

वन्दे वांछित मनोरथार्थ चन्द्रार्घकृत शेखराम्।
कमलस्थितां चतुर्भुजा सिद्धीदात्री यशस्वनीम्॥

कमळावर विराजमान सिद्धिदात्री चतुर्भुज आहे. तिच्या हातात शंख पद्म गदा आणि पद्म आहे. नवरात्रात नऊ दिवसही नवदुर्गेची नऊ रूपे मोठ्या भक्तीने पूजली जातात. आराधना केली जाते. त्रिगुणात्मिका जगदंबेच्या केवळ स्मरणाने ऐहिक आणि पारलौकिक सुखे प्राप्त होतात.

जो चार अक्षरे जपेन। जगदंब जगदंब ऐसे म्हणेन।
त्याची दुष्टाक्षरे पुसेन। ललाटा वरची॥ ■

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### आषाढी एकादशी व पंढरीची वारी

आषाढी एकादशी म्हटली तर डोळ्यासमोर येते ती पंढरीची वारी. आषाढातल्या यव एकादशीच्या व्रतामध्ये सर्व देवतांचे तेज सामावलेले असते. वारकरी पायी वारी करतात. शेकडो किलोमीटरचा प्रवास आनंदाने करतात. गेल्या ८०० वर्षापासून हा पायी वारीचा महिमा सुरू आहे. भारतीय संस्कृतीत सन्मार्गाने वागावे, सत्याचरण करावे ह्यासाठी आपल्या संस्कृतीत विविध व्रतवैकल्य सांगितले आहे. मनावर जर अंकुश ठेवायचा असेल तर एकादशीचे व्रत फलदायी ठरते. उपवास व हरिस्मरण हा एकादशी व्रताचा मुख्य गाभा आहे. आहारशास्त्रानुसार बघितले तर लंघन करणे हे आरोग्यासाठी उत्तम असते. त्याचप्रमाणे मन हरिस्मरणाने सामर्थ्यवान व पवित्र बनते. एकादशीचे व्रत करतांना दशमीस एकभुक्त म्हणजेच एकवेळेस जेवण करावे व एकादशीस पूर्ण उपवास करावा व द्वादशीला विठ्ठलाला महानैवेद्य दाखवून उपवास सोडावा. श्रीविठ्ठलाबद्दल निरपेक्ष प्रेमभाव हे बळ प्रदान करणारे ठरते. आषाढी एकादशीला लाखो लोक, वारकरी विठोबाच्या दर्शनासाठी आसुसलेले असतात आणि एकदा विठ्ठल दिसला की सगळ्यांच्या मनात, हृदयात प्रेमभाव दाटून येतो. डोळ्यांना अश्रुधारा लागतात. विठुमिलनाचा तो सोहळा अनुपम, डोळ्याचे पारणे फेडणारा असतो.

**अलका माईणकर**/९४०३११४६५८

■■■

### पुण्याचे मनपाचे नाट्यगृह आणि अस्वच्छता

मागच्या आठवड्यात कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात जाण्याचा प्रसंग आला. तेथील व्यवस्था पाहून वीट आला. नाटककारांनी व्यथा मांडल्या आहेतच पण प्रेक्षकांचे काय? त्याकडे कोण पाहणार. सर्वत्र सफाईची वानवा जाणवते. सभागृहात तर कार्यक्रमापूर्वी स्वच्छता नसतेच. बाहेरही अस्वच्छता होती. खुर्च्यांची सफाई केलेली नव्हती. स्वछतागृह हे जणू स्वच्छ ठेवायचे असतात ह्याचा विसर पडलेला. बाजूच्या वऱ्हांड्यात नको असणारे सामान ठेवलेले होते. ह्या सर्व गोष्टी दर्शनी आहेत, जर बारकाईने पाहणी केली तर अजून भयानक अवस्था असू शकेल. आवाजाची प्रत खराब होती का ह्याचा शोध घ्यावा लागेल. या गोष्टी कलाकार, इतर संस्था सांगू शकतील. सभागृहामधून पार्किंगकडे वाट नाही. मनपा हे वापरण्यासाठी भाडे घेते. प्रेक्षक तिकिटे काढून येतो. त्याला योग्य सुविधा मिळावयास नको का? ती तशी देणे मनापास बंधनकारक नाही का? मनपा अधिकारी, पदाधिकारी यात लक्ष घालणार का?

**प्रदीप महाबळे**/पुणे

■■■

### जगन्नाथ पुरी रथयात्रा : भक्ती, श्रद्धा आणि अनोखी परंपरा

ओडिशामधील पुरी हे हिंदू धर्मातील चार प्रमुख धामांपैकी एक अत्यंत पवित्र तीर्थक्षेत्र आहे. येथील ८०० वर्षांहून अधिक जुन्या भव्य मंदिरात भगवान विष्णूंचा अवतार मानले जाणारे भगवान जगन्नाथ, त्यांचे बंधू बलभद्र आणि बहीण सुभद्रा यांच्यासह विराजमान आहेत. जरी या मंदिरात केवळ हिंदूंनाच प्रवेश दिला जात असला, तरी येथील वार्षिक 'रथयात्रा' मात्र संपूर्ण जगाला सामावून घेणारा एक मोठा सोहळा ठरतो. जगभरातून लाखो भाविक आणि अनेक विदेशी पर्यटकही ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत असतात, तो म्हणजे जगन्नाथ पुरीची विश्वप्रसिद्ध रथयात्रा. यावर्षी ही रथयात्रा १६ जुलै रोजी मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न होत आहे. या रथयात्रेमागे एक अतिशय हृदयस्पर्शी कथा आहे. ज्येष्ठ पौर्णिमेला भगवान जगन्नाथांना मोठ्या उत्साहात 'स्नान यात्रा' घडवून आणली जाते. या अतिस्नानामुळे देव आजारी पडतात, अशी भक्तांची श्रद्धा आहे. त्यानंतरच्या १५ दिवसांच्या 'अनसर' काळात देव विश्रांती घेतात आणि भक्तांना दर्शन देत नाहीत. प्रकृती सुधारल्यानंतर, आषाढ शुद्ध द्वितीयेला देव आपली मावशी, 'गुंडीचा' देवी यांच्या दर्शनाला जाण्यासाठी बाहेर पडतात. तेथे ते सात दिवस राहतात आणि भक्तांच्या प्रेमाचा स्वीकार करतात. या प्रवासाचाच भाग म्हणजे ही भव्य रथयात्रा होय.



या यात्रेचे मुख्य आकर्षण म्हणजे तीन अवाढव्य लाकडी रथ. 'नंदीघोष' भगवान जगन्नाथांचा रथ. 'तालध्वज' बलभद्रांचा रथ. 'दर्पदलन' सुभद्रेचा रथ. ही यात्रा केवळ एक धार्मिक सोहळा नसून, ती मानवी एकतेचे आणि समतेचे प्रतीक आहे. येथे कोणताही भेदभाव न करता, सर्व भक्त भगवंताच्या रथाला हात लावू शकतात. भगवान जगन्नाथांच्या डोळ्यांत पाहताना मिळणारी शांतता आणि रथाच्या दोरीला हात लावताना उचंबळून येणारा भक्तीचा पूर, हे शब्दांत मांडणे कठीण आहे. हा उत्सव म्हणजे मानवी मनाचे भगवंताशी जुळलेले एक अतूट नाते आहे. या रथयात्रेत सहभागी होणे, म्हणजे साक्षात आनंदाच्या आणि चैतन्याच्या प्रवासाचा अनुभव घेणे होय. ■

**वर्षा आवदे**/नागपूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# आई-वडिलांना घराबाहेर काढणाऱ्या दोन मुलांसह दोन सुनांविरुध्द गुन्हा

## ज्येष्ठ दांपत्याचा छळ; देखभाल न केल्याप्रकरणी फौजदार चावडी पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ जुलै-**

आई-वडील हेच कुटुंबाचा आधारस्तंभ मानले जातात. मात्र वृद्धापकाळात त्यांचाच सांभाळ करण्यास नकार देत, त्यांना घराबाहेर काढणे, शिवीगाळ करून मानसिक छळ करणे आणि राहण्याची, जेवणाची तसेच आरोग्याची कोणतीही व्यवस्था न करणे, ही अत्यंत वेदनादायी आणि समाजाला अंतर्मुख करणारी घटना सोलापुरात उघडकीस आली आहे. या प्रकरणी फौजदार चावडी पोलिसांनी दोन मुलांसह त्यांच्या दोन सुनांविरुद्ध ज्येष्ठ नागरिक पालनपोषण व देखभाल अधिनियम, २००७ च्या कलम २४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

### आई-वडिलांचा सांभाळ कायदेशीर कर्तव्य

या कारवाईमुळे वृद्ध आई-वडिलांचा सांभाळ करणे ही केवळ नैतिक जबाबदारी नसून कायदेशीर कर्तव्यदेखील असल्याचा स्पष्ट संदेश समाजात गेला आहे. वृद्धांचा छळ करणे, त्यांना घराबाहेर काढणे, पालनपोषण न करणे किंवा मानसिक व शारीरिक त्रास देणे हे गंभीर स्वरूपाचे कृत्य असून अशा घटनांविरोधात पोलिस प्रशासन कठोर भूमिका घेत असल्याचे या कारवाईतून दिसून आले आहे.

अतुल रमेश शिंदे, अनुप रमेश शिंदे, सुवर्णा अतुल शिंदे आणि दिपाली अनुप शिंदे (सर्व रा. जुनी मिल चाळ) अशी गुन्हा दाखल आरोपी मुलांची व सुनांची नावे असून याप्रकरणी नंदा रमेश शिंदे (वय ६८, रा. जुनी मिल चाळ, मुरारजी पेठ) यांनी फिर्याद दिली आहे.

फिर्यादीनुसार, सन २०१५ पासून त्यांच्या दोन्ही मुलांनी व सुनांनी फिर्यादी आणि त्यांच्या पतीचा सांभाळ करण्यास नकार दिला. वृद्ध दांपत्याच्या राहण्याची, जेवणाची तसेच आरोग्याची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. एवढेच नव्हे, तर त्यांना वारंवार शिवीगाळ करून मानसिक त्रास देण्यात आला आणि घराबाहेरही काढण्यात आले. फिर्यादींच्या नावावरील घराचा स्वतःच्या वापरासाठी ताबा घेतल्यानंतरही वृद्ध दांपत्याला सन्मानाने राहू दिले गेले नाही.

### पोलिस प्रशासन सदैव तत्पर

अशा प्रकारच्या घटना घडल्यास ज्येष्ठ नागरिकांनी किंवा नागरिकांनीही विलंब न करता जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. ज्येष्ठ नागरिकांच्या सन्मानाने आणि सुरक्षिततेने जगण्याच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी पोलिस प्रशासन सदैव तत्पर असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

तसेच १० जुलै २०२६ रोजी फिर्यादी स्वतःच्या घरी गेल्यानंतर त्यांना पुन्हा घराबाहेर हाकलून दिल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे.

या तक्रारीची गंभीर दखल घेत फौजदार चावडी पोलिसांनी ज्येष्ठ नागरिक पालनपोषण व देखभाल अधिनियम, २००७ च्या कलम २४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपायुक्त (परिमंडळ) प्रितम यावलकर, सहायक पोलीस आयुक्त (विभाग-१) प्रताप पोमण, फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि ज्ञानेश्वर पाटील, पोहेकॉ रुपनूर, पोकॉ कुंभार आणि पोकॉ बोराडे यांनी केली.

**CHANG IN NAME**

I, hereby declare that My Old Name- **A. QADIR A JABBAR PYARE** has been changed to - **ABDUL QADIR ABDUL JABBAR PYARE**

Resi add- 223, Telangi Pachha Peth, Near Jail Road Solapur

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस कळविणेत येते की, डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे गुंजेगाव येथील शेतजमीन यासी गट क्र २७१ यासी क्षेत्र ०४ हे ०२ आर + पो. ख. ०० हे. ०६ आर असे एकुण क्षेत्र ०४ हे. ०८ आर, यासी आकार ०१ रु ५० पैसे, पैकी मधली शेतजमीन क्षेत्र ०० हे ८२ आर + पो.ख. क्षेत्र ०० हे. ०६ आर असे एकुण क्षेत्र ०० हे ८८ आर यासी आकार ०० रुपये ३१ पैसे यासी चतुःसिमा पुर्वेसः- सदर गटातील पोपट शिवाजी निकम यांची शेतजमीन, दक्षिणेसः- गट क्र २७०, पश्चिमेसः- सदर गटातील तुळशिराम पवार यांची शेतजमीन, उत्तरेसः- रस्ता येणेप्रमाणे चतुःसिमेत वर्णन केलेली शेतजमीन त्यातील दगड, माती, झाडी झुडपे, बांध, ऊरुळ्या, ताल, रस्त्याचे वहीवाटीचे येणेजाणेच्या हक्कासह व इतर तदंगभुत वस्तुसहची शेतजमीन यशवंत चंद्रकांत गुंड यांचे वैयक्तीक, एकट्याचे स्वतंत्र व स्वकष्टार्जित मालकी वहीवाटीची असून त्यांनी आमचे अशील सतीश तुळशिराम पवार रा. गुंजेगाव यांना सदर शेतजमीन विक्री करण्याचे ठरवून, त्यांनी आमचे अशिलाकडून इसारा रक्कम स्विकारून आमचे अशिलाचे हक्कात इसारा पावती लिहुन दिली आहे. सदर शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी आहे, अशी त्यांनी हमी देऊन आमचे अशिलांना तशी खात्री व विश्वास दिलेला आहे. तथापि सदर शेतजमीनीत कोणाचेही, कसल्याही प्रकारचे लिज, दान, बक्षिस, गहाण, दावा, पोटगी, अग्रहक्क, खरेदी, वहिवाट, नोटरी, करार, साठेखत, बँक बोजा वगैरे प्रकारचे कसलेही व कोणतेही हक्क, हितसंबंध असल्यास सदरची खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी वैध लेखी हरकती समक्ष भेटुन द्याव्यात व पोहोच घ्यावी. मुदतीत कोणाचीही वैध लेखी हरकत न आल्यास ती त्यांनी जाणुंनबुजुन सोडून दिली आहे, असे समजुन आमचे अशील वर नमूद शेतजमीनीचा खुशखरेदीचा व्यवहार वर नमूद शेतजमीनीचे मालक यांचे बरोबर करतील. मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली ता. १५/०७/२०२६

**सही/-**
**श्री शेखर द. टोणपे**
**बी. एस. एल.,एलएल. बी., ॲडव्होकेट**
**ऑफीसः- गाळा नं १०२, पहिला मजला, सायली हाईट्स, वसंत विहार, सोलापूर ४१३००१**
**मो.नं. ७०२०२४११७४/९९२१४५०९०६**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

**जाहिर प्रसिद्धीकरण**

ज्या अर्थी मौजे कोरफळे, ता. बार्शी व परिसरातील लोकांस या जाहिर प्रसिद्धीकरणाद्वारे कळविण्यात येते की,

डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौजे कोरफळे येथील जमिन गट नं. २२५/३ याचे क्षेत्र हे. ०१-४१ आर याचा आकार रु. ०१-६७ पैसे या पैकी श्री. संदीपान रामभाऊ थोरात यांचे मालकीची मिळकत हे. ०१-१२ आर, आकार रु. ०१-३३ पैसे या वर्णनाची संपूर्ण मिळकत ही संदीपान रामभाऊ थोरात यांच्या मालकीची असून, सदर जमिन ही नवीन अविभाज्य शर्तीवर मा. शेतजमीन अधिकारी बार्शी यांचेकडून सिलींग कायद्याप्रमाणे सन १९८४ रोजी मिळालेली आहे. व तशी फ रफार क्रं. ७८६ ने ७/१२ उतारा नोंद झाली आहे. सन १९८४ पासून नमूद मिळकत ही संदीपान रामभाऊ सराफ हे मालकी हक्काने प्रत्यक्ष वहिवाटीत होते व आहेत. सदर मिळकत ही भोगवटदार वर्ग १ करण्याची आहे व तसा प्रस्ताव मा. तहसिलदार साहेब, बार्शी यांच्याकडे दाखल आहे.

त्या अर्थी सदर मिळकतीबाबत कोणाची काही तक्रार असेल अथवा सदर मिळकतीच्या संदर्भाने कोणाचा काही हितसंबंध निर्माण होत असेल तर ती खालील पत्त्यावर किंवा तहसिल कार्यालय, बार्शी येथे सदर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसां मध्ये नोंदवावी जर नमूद मुदतीमध्ये कोणाची काही तक्रार आली नसेल तर नमूद मिळकतीची भोगवटदार नं. १ च्या संदर्भाने पुढील कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

हे जाहिर प्रसिद्धीकरण केले असे दि. १३/७/२०२६

**सही/-**
**ॲड. पद्माकर बी. काटमोरे**
**बी.ए. (ऑ) एलएल.बी**
**अति. जिल्हा व सत्र न्यायालय**
**बार्शी मो.नं. ९८२२७४३८३४**

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः डि सोलापूर सब डि व तालुका बार्शी पैकी मौजे सौंदरे हद्दीतील व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन :- डि सोलापूर सब डि व तालुका बार्शी पैकी मौजे सौंदरे हद्दीतील ग्रामपंचायत मिळकत नंबर सर्वे नंबर ४१२ पैकी दक्षिण बाजूची संपूर्ण जागा याचे क्षेत्र ५४४.५ चौ. फुट चे चौ मी ५०.६० याचे सि स रेकॉर्डप्रमाणे क्षेत्रफळ ५०.३५ चौ मी यांसी चतुःसिमा पुर्वेस - दत्तात्रय कदम यांची मिळकत, दक्षिणेस - भावकी रस्ता, पश्चिमेस - ग्रामपंचायत रोड व उत्तरेस - गणेश कसाब यांची मिळकत येणेप्रमाणे वर्णनाची खुली घरजागा ही शंकर कृष्णा कसाब यांचे मालकीची असून सदरची जागा हक्कपत्री त्यांचे नांवे नोंद आहे. वरील मिळकती बाबत महेश शंकर कसाब यांचे हक्कात दिनांक ०९/०७/२०२६ रोजी नोंदणकृत बक्षीसपत्र केलेले असून सदरचे दस्त बार्शी येथील दुय्यम निबंधक कार्यालयात अनुसूची दोन मध्ये अनुक्रमांक ४८१९/२०२६ वर नोंदलेले आहे.

महेश शंकर कसाब हे सदरच्या मिळकती बँकेस तारण देऊन त्यावर कर्ज घेऊ इच्छितात. तरी सदर मिळकतीवर कोणतीही कसलेही हक्क हितसंबंध. उदा. - गहाण, दान, लीज, लीन, पोटगी, चोळी, बांगडी, टाच, बोजा, अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आमचे वकिलांना वर दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष भेटुन कागदपत्री पुराव्यानिशी आपला हक्क शाबीत करावा, अन्यथा मुदतीनंतर आमचे अशील हे, सदर मिळकतीशी कोणाचाही, कसलाही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही व असल्यास त्याने तो स्वखुशीने सोडून दिलेला आहे, असे समजून सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे, असे समजून सदरची मिळकत आमची पक्षकार बँक तारण घेऊन कर्ज रक्कम वितरीत करेल. कोणची कसलीही हरकत आल्यास ती आमचे अशिलांच्या हक्काधिकारांवर बंधनकारक राहणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये, म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. कळावे.

दिनांक १४/०७/२०२६

**सही/-**
**ॲड. प्रवीण परशुराम करंजकर**
**पाटील प्लॉट, कर्मवीर नगर, बार्शी**
**मो. नं. ९८२२०६५६६१**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

दि. कि. अर्ज नं. ४१/२०२६
नि. नं. ५

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

लहू शिवाजी पालके, वय- ५७ वर्षे,
धंदा- मजूरी, रा. गोरमाळे, ता. बार्शी,
सध्या रा. समता नगर, बौद्ध गार्डन जवळ, **-- अर्जदार**
लातूर, ता. जि. लातूर

**विरुद्ध**

कोणी नाही **-- सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VII प्रमाणे-**

ज्याअर्थी, यातील अर्जदार यांची चुलती रुक्मीण शंकर पालके हि दि. १०/०६/२०२६ रोजी मौजे जामगाव, ता. बार्शी येथे मयत झालेली असून मयत रुक्मीण शंकर पालके यांना यातील अर्जदार हेच वर्ग - २ मधील जवळचे व कायदेशीर वारस आहेत. मयत रुक्मीण शंकर पालके यांचे पश्चात मिळणारे शासकीय, निमशासकीय लाभ व इतर आवश्यक कामाकरीता यातील अर्जदार यांना मे. कोर्टाकडून हेअरशिप सर्टिफिकेट (वारस प्रमाणपत्र) मिळणेसाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत रुक्मीण शंकर पालके यांचेशी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १३/०८/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रांनिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांना मयत रुक्मीण शंकर पालके यांचे वारस असलेबाबतचे हेअरशिप सर्टिफिकेट देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले ता. १३/०७/२०२६

**(सही)** **क. लिपिक** | **कोर्टाचा शिक्का** | **(सही)** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**

**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**

**संकलन - जन्म-मृत्यू**

दूरध्वनी नं. ९४२११९६९५१६ Email- tahakkalkot@.gmail.com

जा.क्र.२०२६/जन्म-मृत्यू/कावि/१२५०/२०२६ दि. १३/०७/२०२६

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. भिवा मारुती जाधव** **- अर्जदार**
रा. दहिटणे कोळेकरवाडी ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय** **- सामनेवाला**
**ग्रामपंचायत, दहिटणे कोळेकरवाडी ता. अक्कलकोट**

ज्याअर्थी, यातील भिवा मारुती जाधव रा. दहिटणे कोळेकरवाडी ता. अक्कलकोट यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा मुलगा सत्यपालसिंह भिवा जाधव यांचा जन्म दि. २५/११/२००६ रोजी मौजे दहिटणे कोळेकरवाडी ता. अक्कलकोट येथे झाला आहे. परंतु माझ्या मुलाच्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या मुलाच्या जन्माची नोंद सत्यपालसिंह भिवा जाधव या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म-मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसीलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि. ०७/०१/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १३/७/२०२६ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिद्ध केले असे.

**शिक्का**

**सही/-**
**विनायक सुधीर मगर**
**तहसीलदार, अक्कलकोट**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

नि. ५
दि. कि. अर्ज नं. ३० / २०२६

**बार्शी येथील मे. सि. ज. ज्यु. डि. साहेब यांचे कोर्टात**

**१) श्री. अशोक दादाराव करंडे,**
वय- ६५ वर्षे, धंदा- शेती, रा. सासुरे, **-- अर्जदार**
ता. बार्शी जि. सोलापूर
**२) लता भारत आवारे,**
वय- ६० वर्षे, धंदा- घरकाम, रा. सदर

**विरुद्ध**

**कोणी नाही** **-- सामनेवाला**

ज्याअर्थी, प्रस्तुत प्रकरणातील अर्जदार नं. १ व २ यांची आई काशीबाई दादाराव करंडे हि होती. काशीबाई दादाराव करंडे हि ता. २६/१२/२०२५ रोजी सासुरे, ता. बार्शी जि. सोलापूर येथे राहते घरी मयत झालेली आहे. मयत काशीबाई दादाराव करंडे यांचे नावाने शासनाच्या घरकुल योजनेअंतर्गत घरकुल मंजूर झालेले होते. तरी सदरहु योजनेचा लाभ मिळण्याकरीता अर्जदारांना मयताचे वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे.

तसेच अर्जदारांशिवाय मयतास अन्य कोणीही वारस नसल्याने त्यांना त्याबाबतचा वारस दाखला मिळणे साठी यातील अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत काशीबाई दादाराव करंडे यांचेबाबत इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली दि. २०/८/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहुन कागदपत्रांनिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांना मयत काशीबाई दादाराव करंडे यांचे वारस असलेबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रगटन दिले ता. १३ /७/२०२६

**(सही)** **क. लिपिक** | **कोर्टाचा शिक्का** | **(सही)** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

दि. कि. अर्ज नं. ३६/२०२६
नि. नं. ५

**बार्शी येथील मे. सि. ज. सि. डि. साहेब यांचे कोर्टात**

१) **श्रीमती सविता सोमनाथ गुरव,** वय- ४४ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. कुर्डूवाडी रोड, शिवाजी कॉलेज जवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
२) **सौ. हर्षदा सुरज क्षिरसागर,** वय- २३ वर्षे,
धंदा- घरकाम, रा. मु.पो. गोपाळपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर
३) **सानिका सोमनाथ गुरव,** वय- २१ वर्षे,
धंदा- शिक्षण, रा. कुर्डूवाडी रोड, शिवाजी कॉलेज **--- अर्जदार**
जवळ, बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर
४) **कृष्णा सोमनाथ गुरव,** वय- १४ वर्षे,
धंदा- शिक्षण, रा. सदर, अ.पा.क. आई अर्जदार नं. १ श्रीमती सविता सोमनाथ गुरव
५) **श्रीमती शोभा शशिकांत गुरव,** वय- ७० वर्षे,
धंदा- घरकाम, रा. सदर

**विरुद्ध**

**कोणी नाही** **-- सामनेवाला**

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम VIII प्रमाणे-**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल तसेच अर्जदार नं. ५ यांचा मुलगा सोमनाथ शशिकांत गुरव हे दि. १९/०५/२०२६ रोजी बार्शी, ता. बार्शी येथे मयत झालेले असून त्यांना यातील अर्जदार नं. १ ते ५ हेच जवळचे व कायदेशीर वारस आहेत. मयत सोमनाथ शशिकांत गुरव यांचे पश्चात मिळणारे शासकीय लाभ व इतर आवश्यक कामाकरीता यातील अर्जदार यांना मे. कोर्टाकडून हेअरशिप सर्टिफिकेट (वारस प्रमाणपत्र) मिळणेसाठी अर्जदार यांनी या मे. कोर्टात सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी, वर नमूद अर्जदार यांचे शिवाय मयत सोमनाथ शशिकांत गुरव यांचेशी इतर कोणाचा कसल्याही प्रकारे वारस हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर नेमलेली तारीख दि. १९/८/२०२६ रोजी या कामी मे. कोर्टात सकाळी ११.०० वा हजर राहून कागदपत्रांनिशी आपले म्हणणे अगर हरकत द्यावी अथवा कोणाचीही काही म्हणणे / हरकत न आल्यास सदरील अर्जदार यांना मयत भारत गंगाधर काळे यांचे वारस असलेबाबतचे हेअरशिप सर्टिफिकेट देण्यात येईल. कळावे.

हे जाहीर प्रसिद्धीकरण दिले ता. १३/७/२०२६

**(सही)** **क. लिपिक** | **कोर्टाचा शिक्का** | **(सही)** **सहा. अधिक्षक** **दिवाणी न्यायालय क. स्तर बार्शी**

**जाहीर प्रसिद्धीकरण**

पुढील नेमली तारीखः ११/०९/२०२६
दि.कि.अ.नं. ५३/२०२६
नि. ५

**बार्शी येथील मे जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात**

१) **समीक्षा हनुमंत वाघमारे,** वय १५ वर्षे,
धंदा-शिक्षण, रा. सावंत वस्ती, पिराची कुरोली, ता. पंढरपूर जि. सोलापूर - अज्ञान अर्जदार
२) **स्नेहा हनुमंत वाघमारे,** वय ०८ वर्षे, **-- अर्जदार**
धंदा-शिक्षण, रा. सदर - अज्ञान
३) **श्रीमती उषा हनुमंत वाघमारे,** वय ४१ वर्षे,
धंदा-घरकाम, रा. सदर (अज्ञान अर्जदार नं. १, २ यांची अ.पा.क. आई)

**विरुद्ध**

महाराष्ट्र सरकार **-- सामनेवाला**

ज्याअर्थी डि. सोलापूर, सब डि. व ता. बार्शी पैकी मौजे रुई येथील शेतजमीन ग.नं. ३५८ पैकी ० हे. ६८ आर आकार रु. ०.५० पैसे ही सदर गटातील न विभागलेली जमीन आतील तदंगभूत वस्तुसह सदर मिळकत अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत झाल्यानंतर वारस हक्काने मिळकतीचे ७/१२ हक्कपत्रकी मालक सदरी नोंद झालेली आहे. अज्ञान अर्जदार यांचा सांभाळ, शिक्षण, पालन पोषण सर्व काही अज्ञान अर्जदाराची आई हिच आई या नात्याने पाहत आहेत. अज्ञान अर्जदाराचे वडिल मयत असून अज्ञान अर्जदारचे शिक्षणाचा दिवसेंदिवस वाढत चाललेला खर्च व भविष्यातील शिक्षणाचा खर्च करणेकरीता त्यांचे अ.पा.क. आईनी वर नमूद जमीन विक्रीस काढली त्याची माहिती प्रियांका जयंत घोडके व हर्षदा प्रशांत घोडके, दोघी रा. रुई, ता. बार्शी यांना झालेने त्यांचेशी व्यवहार ठरवून इसाराची रक्कम स्विकारली आहे. तथापि, सदर मिळकतीचे मालक हे अज्ञान असलेने अज्ञानाचे हिष्याची मिळकत विक्रीकरीता मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी आवश्यक आहे, सदरची कृती योग्य व गरजेची असून अज्ञानाचे हिताची आहे, असे कथन करुन अर्जदाराचे वतीने त्यांचे अज्ञान पालनकर्ते आईनी या मे. न्यायालयात अज्ञानाची मिळकत विक्री करण्यास परवानगी मागणेचा अर्ज या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिद्धीकरणाने कळविण्यात येते की, अर्जदारांच्या वरील मागणी, कथनां संबंधाने कोणाचे काही हरकती, तक्रारी, आक्षेप असल्यास वा सदर मिळकतीत अन्य कोणाचे काही हक्क अधिकार असलेस संबंधीतानी ही जाहीर प्रसिद्धीकरण प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत अगर पुढील नेमली तारीख ११/०९/२०२६ रोजी या मे. कोर्टात स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे, हरकत, तक्रारी सादर कराव्यात. मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास मा. न्यायालयाचे प्रकरणी पुढील यथायोग्य आदेश होतील.

हे जाहीर प्रसिद्धीकरण आमचे सहीनिशी व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिद्ध केले असे. तारीखः १३/०७/२०२६

**शिक्का**

**(सही)**
**अधिक्षक**
**अपर जिल्हा न्यायालय, बार्शी**

**जाहिर प्रकटन**

**'क' प्रवर्गातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळ निवडणुकीचा कार्यक्रम**

क प्रवर्गातील खालील संस्थांचा सन २०२६-२०२७ ते २०३१-२०३२ या कालावधीच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठीचा निवडणूक कार्यक्रम प्रसिध्द करण्यात आलेला आहे.

**संचालक मंडळ निवडणूक कार्यक्रमातील महत्त्वाचे टप्पे**

| अ. क्र. | संस्थेचे नाव | निवडणूक निर्णय अधिकारी | नामनिर्देशन पत्रांची विक्री व स्विकृती | नामनिर्देशन पत्राची छाननी | वैध नामनिर्देशन पत्राची प्रसिध्दीची तारीख | उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख | आवश्यक असल्यास मतदान |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजयोग अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. सांगोला | ए. डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | दि. १५/०७/२०२६ ते दि. २१/०७/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. २२/०७/२०२६ सकाळी ११.०० पासून | दि. २३/०७/२०२६ सकाळी ११.०० वा. | दि. २४/०७/२०२६ ते दि. ०७/०८/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. १६/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| २ | रत्नाई महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. वाणी चिंचाळे | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | दि. १५/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ३ | श्रीमती शारदादेवी महिला ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. मेडशिंगी | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | दि. १४/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ४ | संत सावता माळी नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सांगोला | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | दि. १५/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ५ | सांगोला महाविद्यालय सेवकांची सहकारी पतसंस्था मर्या. सांगोला | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | दि. १४/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ६ | श्री स्वामी समर्थ अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. आलेगांव | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | दि. १६/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ७ | जिजाऊ महिला अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. मेडशिंगी | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | दि. १७/०७/२०२६ ते दि. २३/०७/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. २४/०७/२०२६ सकाळी ११.०० पासून | दि. २७/०७/२०२६ सकाळी ११.०० | दि. २७/०७/२०२६ ते दि. १०/०८/२०२६ स. ११.०० ते दु. ३.०० वा. | दि. १६/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ८ | गोकुळ अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. सांगोला | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | दि. १७/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ९ | ओम साई महिला अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. सांगोला | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | दि. १६/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| १० | मेट्रीक्स ग्लोबल अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. सांगोला | ए.डी. गोसावी, सहाय्यक सहकारी अधिकारी | | | | | दि. १७/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| ११ | श्री स्वामी समर्थ महिला अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. सांगोला | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | दि. १६/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |
| १२ | विद्यामंदिर सेवक सहकारी पतसंस्था मर्या. नाझरे | ए.एस. पुजारी, सहकारी अधिकारी श्रेणी-२ | | | | | दि. १६/०८/२०२६ रोजी स.८.०० ते दु. ४.०० |

**टिप :- सदर कार्यक्रम सुट्ट्यांचे दिवस वगळून आहे.**

संस्थांचा सविस्तर निवडणूक कार्यक्रम त्या त्या संस्थेच्या नोटीस बोर्डावर, संबंधित संस्थेचे निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डावर व तालुका सहकारी अधिकारी, तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सांगोला पत्ता :- क्षत्रिय माळी वि.का.से. इमारत १ ला मजला, कचेरी रोड, सांगोला, ता. सांगोला, जि. सोलापूर येथील नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तरी संबंधित संस्थांचे सभासदांनी सभासद यादी सविस्तर निवडणूक कार्यक्रम व अधिक माहितीसाठी या कार्यालयाशी संपर्क साधावा.

**स्थळ - सांगोला**
**दिनांक - १४/०७/२०२६**

**शिक्का**

**सही/-**
**(डॉ. वैशाली साळवे)**
**तालुका सहकारी निवडणूक अधिकारी तथा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर**



# सर्वांच्या नजरा मेस्सी-केनच्या खेळाकडे

## अटलांटा स्टेडियमवर जुन्या स्पर्धेला मिळणार उजाळा

**अटलांटा, १४ जुलै**

बुधवारी येथे विश्वचषकाच्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात अर्जेंटिना आणि इंग्लंड यांच्यातील प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय फुटबॉल प्रतिस्पर्धा पुन्हा जिवंत होत असताना, लिओनेल मेस्सीची जादू जिंकेल की हॅरी केनचा करिश्मा, याकडे सर्वांच्या नजरा असतील.



सध्याच्या स्पर्धेत आतापर्यंत आठ गोल करून मेस्सीने अर्जेंटिनाच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, तर केनने सहा गोल केले आहेत. हे दोन्ही खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रथमच एकमेकांसमोर उभे ठाकतील, कारण २००५ पासून हे दोन्ही संघ समोरासमोर आलेले नाहीत. केनला ज्युड बेलिंगहॅमकडून (सहा गोल) उत्कृष्ट साथ मिळाली आहे. इंग्लंडसाठी मेस्सीला रोखणे एक आव्हान असेल, तर केन आणि बेलिंगहॅम अर्जेंटिनाच्या बचावाची कसून परीक्षा घेतील. बेलिंगहॅम उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहे आणि अर्जेंटिनाला त्याच्यापासून सावध राहावे लागेल. या दोन देशांमधील दीर्घकालीन वैर पाहता, सामन्यादरम्यान तणाव वाढण्याची शक्यता आहे.

१९६६ च्या विश्वचषकादरम्यान अर्जेंटिनाच्या तत्कालीन कर्णधार अँटोनियो रॅटिनला मैदानाबाहेर पाठवणे असो किंवा १९८२ मधील फॉकलंड बेटांवरून झालेला मैदानाबाहेरील संघर्ष असो, फुटबॉलच्या मैदानावर आणि मैदानाबाहेरही तणाव दिसून आला आहे.

जेव्हा इंग्लंड आणि अर्जेंटिना यांच्यातील सामन्याचा विषय येतो, तेव्हा १९८६ च्या विश्वचषकातील दिएगो मॅराडोनाचा 'हँड ऑफ गॉड' गोल अविस्मरणीय आहे. त्याच्या गोलने अर्जेंटिनाचा विजय निश्चित केला. त्यानंतर, १९९८ मध्ये डेव्हिड बेकहॅमला मैदानाबाहेर पाठवणे आणि चार वर्षांनंतर त्याच स्टार खेळाडूने मारलेली फ्री किक यांमुळे हे वैर शिगेला पोहोचले.

दोन्ही संघ अपराजित राहून उपांत्य फेरीत दाखल झाले आहेत. गतविजेत्या अर्जेंटिनाला अलिकडील सामन्यांमध्ये चढ-उतारांचा सामना करावा लागला आहे. गट फेरीतील आपले तिन्ही सामने जिंकणाऱ्या अर्जेंटिनाचा सामना केप वर्देविरुद्ध अतिरिक्त वेळेपर्यंत गेला होता. त्यानंतर त्यांना इजिप्त आणि स्वित्झर्लंडला हरवण्यासाठी संघर्ष करावा लागला. अर्जेंटिना विश्वचषकाच्या १२ सामन्यांमध्ये अपराजित आहे.



इंग्लंडनेही आपल्या गटात अव्वल स्थान पटकावले. त्यांनी १६ संघांच्या फेरीत मेक्सिकोला ३-२ ने हरवले आणि त्यानंतर उपांत्यपूर्व फेरीत नॉर्वेविरुद्ध पिछाडीवरून पुनरागमन करत बेलिंगहॅमच्या दोन शानदार गोलांच्या जोरावर ३-२ ने विजय मिळवला. (वृत्तसंस्था)

# जोसे मोरिन्हो १३ वर्षांनंतर रियल माद्रिदमध्ये परतले



### तरुण खेळाडूंनाही आत्मविश्वास मिळेल

मोरिन्हो यांनी कबूल केले की, जर सर्व खेळाडू उपलब्ध असते तर तयारी अधिक चांगली झाली असती, परंतु त्यांनी सध्याच्या परिस्थितीचे वर्णन सकारात्मक असे केले. ते म्हणाले, सर्व खेळाडू इथे असते तर बरे झाले असते, पण सध्या मला ज्या खेळाडूंसोबत काम करायचे आहे त्यांना जवळून जाणून घेण्याची संधी मिळाली आहे. त्यांनाही मला समजून घेण्याची संधी मिळेल.

**माद्रिद, १४ जुलै**

जवळपास १३ वर्षांनंतर, जोसे मोरिन्हो यांनी रियल माद्रिदचे मुख्य प्रशिक्षक म्हणून आपल्या दुसऱ्या कार्यकाळाला सुरुवात केली आहे. त्यांनी वाल्देबेबास प्रशिक्षण केंद्रात संघाच्या पहिल्या प्री-सीझन सत्राने नवीन हंगामाची सुरुवात केली. तथापि, ज्यूड बेलिंगहॅम आणि किलियन एमबाप्पेसारखे अनेक स्टार खेळाडू सध्या फिफा विश्वचषकात व्यस्त आहेत, त्यामुळे मोरिन्हो यांना सध्या संपूर्ण संघासोबत काम करण्याची संधी मिळणार नाही.

माध्यमांशी बोलताना, मोरिन्हो यांनी स्पष्ट केले की त्यांच्या योजना केवळ पहिल्या प्रशिक्षण सत्राने सुरू झाल्या नाहीत. ते म्हणाले, असे नाही की मी आज इथे आलो आहे आणि सर्व काही आताच सुरू झाले आहे. आम्ही क्लबच्या विविध विभागांसोबत खूप दिवसांपासून तयारी करत आहोत.

मोरिन्हो म्हणाले की, रियल माद्रिदमध्ये परत येणे ही माझ्यासाठी एक विशेष जबाबदारी आहे. माझ्यासाठी हे एक ध्येय आहे. मी इथे फक्त माझ्या स्वतःच्या यशाचा किंवा ट्रॉफींचा विचार करण्यासाठी आलेलो नाही. खेळाडू, प्रशिक्षण कर्मचारी आणि क्लबशी संबंधित असलेल्या प्रत्येकाला पूर्वीपेक्षा अधिक चांगले बनवणे हे माझे ध्येय आहे. मला एक अशी कार्यसंस्कृती निर्माण करायची आहे, जी कठोर परिश्रम, जबाबदारी आणि मोठी ध्येये साध्य करण्याच्या इच्छेवर भर देईल. रियल माद्रिदमध्ये काम करणे आणि रियल माद्रिदसाठी काम करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. मी क्लबप्रति पूर्ण वचनबद्धतेने येथे आलो आहे. (वृत्तसंस्था)

# नॉर्वेच्या अर्लिंग हॉलंडची अभिनव खरेदी




**डॅलस, १४ जुलै**

२०२६ च्या फिफा विश्वचषकातील नॉर्वेचा ऐतिहासिक प्रवास उपांत्यपूर्व फेरीतच संपुष्टात आला, पण संघाचा स्टार स्ट्रायकर, अर्लिंग हॉलंड, पुन्हा एकदा चर्चेत आहे.

यावेळी, याचे कारण मैदानातील त्याची कामगिरी नसून, तो अमेरिकेतून सोबत आणलेला एक अनोखा 'सोबती' आहे. सोमवारी जेव्हा नॉर्वेजियन संघ ओस्लोच्या गार्डरमोएन विमानतळावर पोहोचला, तेव्हा हॉलंडच्या एका हातात रॅकून घेऊन जाताना पाहून चाहते आश्चर्यचकित झाले.

विमानतळावरील रेड कार्पेटवरून चालताना, हॉलंड एका हातात रॅकून घेऊन दिसला. हॉलंडच्या या अनोख्या खरेदीमुळे रॅकूनच्या मागणीत मोठी वाढ झाली. हॉलंडच्या या अनोख्या खरेदीच्या अनुभवाने दुकानाचा मालक खूप खूश झाला. त्याने आपल्या वेबसाईटवर हॉलंडचा एक फोटो शेअर केला. यानंतर, हॉलंडच्या चाहत्यांमध्ये रॅकूनची मागणी प्रचंड वाढली. (वृत्तसंस्था)

# २०३० च्या विश्वचषकात ६४ संघ खेळण्यावर विचार

**नवी दिल्ली, १४ जुलै**

फिफा आता २०३० च्या विश्वचषकातील संघांची संख्या ६४ पर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावावर विचार करणार आहे. तथापि, २०२६ चा फिफा विश्वचषक संपल्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल, असे फिफाचे अध्यक्ष जियानी इन्फँटिनो यांनी सांगितले. इन्फँटिनो यांनी फिफाच्या सतत विस्तार करण्याच्या धोरणाचे समर्थन केले. ते म्हणाले, उत्तर अमेरिकेत झालेल्या २०२६ च्या फिफा विश्वचषकात नवीन ४८-संघांचे स्वरूप १०० टक्के यशस्वी ठरले आहे. हे यश पाहता, २०३० च्या विश्वचषकात संघांची संख्या ६४ पर्यंत वाढवण्याच्या प्रस्तावावरही चर्चा केली जाईल.

२०३० चा विश्वचषक आधीच ऐतिहासिक ठरण्याच्या मार्गावर आहे, कारण तो स्पेन, पोर्तुगाल आणि मोरोक्कोमध्ये आयोजित केला जाईल, तर स्पर्धेचे उद्घाटन सामने उरुग्वे, अर्जेंटिना आणि पॅराग्वे येथे खेळले जातील. आता, जर ६४-संघांच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली, तर ही विश्वचषकाच्या इतिहासातील सर्वांत मोठी स्पर्धा ठरेल. इन्फँटिनो म्हणाले की, २०२६ मध्ये पहिल्यांदा लागू केलेल्या ४८-संघांच्या स्वरूपामुळे अनेक नवीन देशांना विश्वचषकात खेळण्याची संधी मिळाली आणि त्याचा सकारात्मक परिणाम झाला.



त्यांचा विश्वास आहे की, अधिक देशांच्या सहभागामुळे जगभरात फुटबॉलचा विकास होईल. ६४ संघांच्या प्रस्तावाला फुटबॉल जगतातही समर्थन आहे. अनेक तज्ज्ञ आणि चाहत्यांचा असा विश्वास आहे की, यामुळे स्पर्धेची गुणवत्ता सुधारू शकते, सामन्यांदरम्यान खेळाडूंवरील दबाव वाढू शकतो आणि आयोजनातील गुंतागुंत वाढू शकते. दुसरीकडे, समर्थकांचे म्हणणे आहे की, यामुळे अधिक देशांना विश्वचषकात खेळण्याची संधी मिळेल आणि या खेळाचा जागतिक स्तरावर विस्तारही होईल. (वृत्तसंस्था)

### श्रीलंकेला भारताचे दमदार प्रत्युत्तर

**गॅले :** येथे सुरू असलेल्या १९ वर्षांखालील युवाच्या कसोटी सामन्यात सेनुजा वेकुनागोडाच्या द्विशतकाच्या जोरावर श्रीलंकेने ४२४ धावा काढून डाव घोषित केला. धावांचा पाठलाग करताना भारताने दमदार सुरुवात केली आणि दुसऱ्या दिवसाच्या अखेर बिनबाद १८६ धावा केल्या. भारताच्या लक्ष्य रायचंदानी ९३ धावा आणि सागर विर्क ८७ धावांवर नाबाद होता. श्रीलंकेकडून विमन दिनसारा (५२), कविजा गमागे (४९) आणि चमिका हीनातिगाला (४५) यांनी चांगली फलंदाजी करीत संघाला मोठी धावसंख्या उभारून दिली.

# युवा हॉकी ५-एस आशियाई स्पर्धेसाठी संघ घोषित

**नवी दिल्ली, १४ जुलै**

पहिल्यांदाच होणारी युवा हॉकी ५-एस आशियाई चॅम्पियनशिप २० ते २५ जुलै दरम्यान ओमानमधील मस्कत येथे आयोजित केली जाईल. हॉकी इंडियाने मंगळवारी या चॅम्पियनशिपसाठी भारतीय सब-ज्युनियर पुरुष आणि महिला संघांची घोषणा केली. ही खंडीय स्पर्धा पहिल्या एफआयएच अंडर-१८ युवा हॉकी ५-एस विश्वचषकासाठी आशियाई पात्रता फेरी म्हणूनही काम करेल, ज्यात प्रत्येक गटात सात संघ सहभागी होतील.

पुरुषांच्या स्पर्धेत यजमान ओमान, भारत, पाकिस्तान, इराण, इराक, सौदी अरेबिया आणि बांगलादेश हे संघ सहभागी होतील. महिलांच्या स्पर्धेत भारताचा सामना पाकिस्तान, ओमान, चीन, उझबेकिस्तान, कझाकस्तान आणि इराण यांच्याशी होईल. सब-ज्युनियर महिला संघाचे नेतृत्व स्वीटी कुजूर करत असून, खिली कुमारी आणि मेहक परिहार या गोलरक्षक आहेत. केतन कुशवाह सब-ज्युनियर पुरुष संघाचे कर्णधारपद भूषवेल. पहिल्या एफआयएच अंडर-१८ युथ हॉकी ५एस विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता मिळवण्याची संधी असल्याने, भारत या खंडीय चॅम्पियनशिपच्या पहिल्या आवृत्तीत दमदार सुरुवात करून वयोगट हॉकीमधील यशाची आपली प्रभावी परंपरा कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल.

**भारतीय संघ :** सब-ज्युनियर महिला : गोलरक्षकः खिली कुमारी, मेहक परिहार. बचावपटू : नीलम टोपनो, किरण एक्का. मिडफिल्डर : दिया, पुष्पा माझी, श्रुती कुमारी. फॉरवर्ड्स : स्वीटी कुजूर (कर्णधार), नौशीन नाझ आणि संदीप कुमारी. (वृत्तसंस्था)

### राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत हरयाणाला सांघिक विजेतेपद

**रोहतक :** यजमान हरयाणाने मंगळवारी येथे झालेल्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत वर्चस्व गाजवत पुरुष फ्रीस्टाईल, ग्रीको-रोमन आणि महिला कुस्ती या प्रकारांमध्ये सर्वसाधारण सांघिक विजेतेपदे जिंकली. तीन दिवसीय स्पर्धेत, यजमान राज्याने पुरुष फ्रीस्टाईल प्रकारात २०० गुणांसह, ग्रीको-रोमन प्रकारात १९५ गुणांसह आणि महिला कुस्ती प्रकारात १८३ गुणांसह अव्वल स्थान पटकावले. आर्मी स्पोर्ट्स कंट्रोल बोर्ड (एसएससीबी) पुरुष फ्रीस्टाईल (१३८ गुण) आणि ग्रीको-रोमन (१६५ गुण) या दोन्ही प्रकारांमध्ये दुसऱ्या स्थानावर राहिले.

# सिंधू जपान ओपनच्या दुसऱ्या फेरीत

## दुखापतीमुळे सात्त्विक-चिराग सामन्यातून बाहेर



**टोकियो, १४ जुलै**

दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधूने मंगळवारी जपान ओपन बॅडमिंटन स्पर्धेतील महिला एकेरीच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. भारताची स्टार पुरुष दुहेरी जोडी सात्त्विकसाईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी यांना खांद्याच्या दुखापतीमुळे आपला पहिला सामना सोडावा लागला.

जागतिक क्रमवारीत १० व्या क्रमांकावर असलेल्या सिंधूने मलेशियाच्या वोंग लिंग चिंगचा २१-१४, २१-११ असा सहज पराभव केला. सिंधूने सुरुवातीपासूनच नियंत्रण राखले आणि आपल्या अचूक स्मॅश, ड्रॉप शॉट्स आणि उत्कृष्ट नेट गेमच्या जोरावर सरळ गेममध्ये विजय मिळवला.

दुसरीकडे, जागतिक क्रमवारीत चौथ्या क्रमांकावर असलेल्या भारतीय पुरुष दुहेरी जोडी सात्त्विक-चिराग यांना डेन्मार्कच्या डॅनियल लुंडगार्ड आणि मॅड्स वेस्टरगार्ड यांच्याविरुद्ध पहिला गेम १९-२१ ने गमावल्यानंतर सामन्यातून माघार घ्यावी लागली. सात्त्विकची जुनी खांद्याची दुखापत पुन्हा बळावल्याने दोन्ही खेळाडूंना सामना पुढे खेळता आला नाही.

मुख्य दुहेरी प्रशिक्षक टॅन किम हर यांनी सांगितले की, सात्त्विक आणि चिराग पुढील आठवड्यात होणाऱ्या चायना ओपनमध्येही सहभागी होणार नाहीत. आता दोन्ही खेळाडू पूर्ण तंदुरुस्त होण्यासाठी आणि ऑगस्टमध्ये भारतात होणाऱ्या जागतिक बॅडमिंटन चॅम्पियनशिपसाठी पूर्णपणे तयार होण्याकरिता पुनर्वसनावर लक्ष केंद्रित करतील.

मिश्र दुहेरीमध्ये, भारताच्या ध्रुव कपिला आणि तनिषा क्रास्टो यांनी स्कॉटलंडच्या अलेक्झांडर डन आणि ज्युली मॅकफर्सन यांचा २१-१६, २१-१४ असा पराभव करून दुसऱ्या फेरीत प्रवेश केला. मात्र, रोहन कपूर आणि रित्विका शिवानी गद्दे यांची जोडी पहिल्याच फेरीत बाहेर पडली. चीनच्या अव्वल मानांकित फेंग यान झे आणि हुआंग डोंग पिंग यांनी त्यांना २१-११, २१-१० असे पराभूत केले. आता, भारताचे हरिहरन आमसाकरुनन आणि एम. आर. अर्जुन यांचा सामना चायनीज तैपेईच्या ली सी-हुई आणि यांग पो-ह्सुआन या जोडीशी होईल. (वृत्तसंस्था)

# राष्ट्रकुल टेबल टेनिस स्पर्धेच्या शुभंकर 'मयूर'चे अनावरण



कॉमनवेल्थ टेबल टेनिस चॅम्पियनशिपच्या 'मयूर' शुभंकर अनावरणप्रसंगी उपस्थित मुख्यमंत्री रेखा गुप्ता, मंत्री आशिष सूद

**नवी दिल्ली, १४ जुलै**

या महिन्याच्या अखेरीस दिल्लीत होणाऱ्या राष्ट्रकुल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२६ साठीच्या 'मयूर' या अधिकृत शुभंकराचे अनावरण मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी मंगळवारी केले. ही चॅम्पियनशिप २७ जुलै ते २ ऑगस्ट दरम्यान त्यागराज स्टेडियमवर आयोजित केली जाईल. यामध्ये २५ राष्ट्रकुल देशांतील अव्वल खेळाडू सहभागी होतील.

या शुभंकर अनावरण सोहळ्याला दिल्लीचे शिक्षण आणि क्रीडा मंत्री आशिष सूद, राष्ट्रकुल टेबल टेनिस महासंघाचे अध्यक्ष विवेक कोहली, भारतीय टेबल टेनिस महासंघाचे अधिकारी, खेळाडू, प्रशिक्षक आणि इतर मान्यवर उपस्थित होते. रेखा गुप्ता म्हणाल्या की, २२ व्या राष्ट्रकुल टेबल टेनिस चॅम्पियनशिप २०२६ साठी 'मयूर' या शुभंकराचे अनावरण करण्यात आले आहे. आपला राष्ट्रीय पक्षी मोर याच्यापासून प्रेरित असलेला हा शुभंकर, भारताचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, ऊर्जा आणि विविधतेचे एक जिवंत प्रतीक आहे, असे त्या म्हणाल्या. हा प्रत्येक दिल्लीकरासाठी अभिमानाचा प्रसंग असल्याचे त्यांनी सांगितले. सूद म्हणाले की, ही स्पर्धा दिल्लीला आंतरराष्ट्रीय क्रीडा विश्वाच्या केंद्रस्थानी स्थापित करेल आणि शहरासाठी एका मोठ्या प्रवासाची सुरुवात करेल. 'मोर' आत्मविश्वास, उत्कृष्टता, दृढनिश्चय, खिलाडीवृत्ती आणि भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे प्रतीक आहे. भारतीय परंपरेत मोर हे अभिमान, ऊर्जा आणि सौंदर्याचे प्रतीक असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. (वृत्तसंस्था)

# रूट, डॉसनची अर्धशतकी खेळी

## इंग्लंडच्या सर्व बाद २५८ धावा, अक्षरचे ४ बळी

**बर्मिंगहॅम, १४ जुलै**

अनुभवी फलंदाज जो रूट आणि लियाम डॉसन यांची अर्धशतके आणि त्यांनी केलेल्या सातव्या गड्यासाठी १२१ धावांची भागीदारी यामुळे मंगळवारी झालेल्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात इंग्लंडने भारतासमोर २५८ धावांचे लक्ष्य ठेवले.

१३ व्या षटकापर्यंत इंग्लंडची धावसंख्या ६१ होती आणि त्यांचा एकही फलंदाज बाद झाला नव्हता. त्यानंतर २२ व्या षटकापर्यंत १०७ धावांत त्यांचे सहा गडी बाद झाले आणि यजमान संघ १५० धावांपर्यंत पोहोचेल की नाही असे वाटत होते. मात्र, जो रूटने ७६ चेंडूंत ७६ धावा आणि डॉसनने ८३ चेंडूंत ६८ धावा करून संघाला सन्मानजनक स्थितीत आणले. रूटने बुमराहचे पहिले दोन स्पेल संपण्याची वाट पाहिली आणि त्यानंतर अक्षर पटेलच्या चेंडूंवर तुफान फटकेबाजी केली.

बुमराहने नऊ षटकांत ३१ धावा देऊन एक बळी घेतला, तर गुरनूर बराडने नऊ षटकांत ६१ धावा देऊन दोन बळी घेतले. प्रसिद्ध कृष्णाने १० षटकांत ५० धावा देऊन दोन बळी घेतले. नाणेफेक जिंकल्यानंतर इंग्लंडने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सहा आठवड्यांच्या विश्रांतीनंतर पुनरागमन करणाऱ्या बुमराहने आपल्या पहिल्या स्पेलमध्ये चार षटकांत केवळ आठ धावा दिल्या. जेकब बेथेल (३१ चेंडूंत १४ धावा) आणि बेन डकेट (४५ चेंडूंत ४३ धावा) त्याचा सामना करू शकले नाहीत. त्याने आपल्या स्पेलमध्ये ३६ निर्धाव चेंडू टाकले. दुसऱ्या टोकाकडून प्रसिद्धने चांगली गोलंदाजी केली. डकेटने बराडच्या पहिल्या षटकात १७ धावा केल्या. त्याच्या पुढच्या षटकातही दोन चौकार हाणले, पण तिसऱ्या षटकात त्याने तीन चेंडूंत दोन बळी घेतले. जास्त उसळी घेतलेल्या एका चेंडूवर त्याने बेथेलला बाद केले. थर्ड मॅन सीमारेषेवर बुमराहने डकेटचा अप्रतिम झेल घेतला.

बुमराहने आपल्या दुसऱ्या स्पेलमध्ये इंग्लंडचा कर्णधार हॅरी ब्रुकला बाद केले, ज्याचा झेल पहिल्या स्लिपमध्ये रोहित शर्माने घेतला. त्यानंतर प्रसिद्धने जोस बटलर आणि सॅम करण यांना बाद केले. मात्र रूट आणि डॉसन यांनी डाव सावरला. (वृत्तसंस्था)



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सीना नदीला पाणी सोडण्याबाबत शासन सकारात्मक

## आमदार अभिजीत पाटील यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर/ टेंभूर्णी, दि.१४ जुलै -**

सीना नदीतील पाणी प्रश्नावर आमदार अभिजीत पाटील यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनाच्या, जिल्हा नियोजन समिती बैठकीपर्यंत केलेल्या आक्रमक पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. सीना नदीत पाणी सोडण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय प्रक्रिया सुरू केली आहे. यामुळे दुष्काळाच्या छायेत असलेल्या हजारो शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सीना नदी कोरडी पडल्याने नदीकाठच्या गावांतील उभी पिके धोक्यात आली होती. ही गंभीर परिस्थिती लक्षात घेऊन आमदार अभिजीत पाटील यांनी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवसापासून हा प्रश्न सातत्याने लावून धरला. मुख्यमंत्री, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील, सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे, वरिष्ठ अधिकारी आणि जिल्हाधिकाऱ्यांकडे वारंवार पाठपुरावा करून सीना नदीत तातडीने पाणी सोडण्याची ठाम मागणी केली. उजनीतील पाणीसाठा वाढल्यानंतर माढा तालुक्याचा हक्काचा पाणी हिस्सा सीना नदीत सोडावा, अशी भूमिका आमदार पाटील यांनी ठामपणे मांडली. तसेच सीना-माढा उपसा सिंचन योजना, मानेगाव उपसा सिंचन योजना आणि बोगद्यातून सीना नदीला पाणी देण्याच्या मागण्याही मांडल्या.

गुरुवारी रिधोरे येथे रास्ता रोको आंदोलनाचा इशारा दिला होता. मात्र, शासनाशी चर्चे



नंतर जलसंपदा विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. सीना नदीत पाणी सोडण्याबाबत सकारात्मक आश्वासन मिळाल्याने आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर भीमा नदीप्रमाणेच सीना नदीतही लवकरच पाणी सोडले जाईल, असा विश्वास व्यक्त करत आमदार अभिजीत पाटील यांनी मुख्यमंत्री व संबंधित मंत्र्यांचे आभार मानले.

पंढरीचा पांडुरंग आणि आई माढेश्वरीच्या कृपेने राज्यात भरपूर पाऊस पडो, उजनी धरण शंभर टक्के भरू दे आणि बळीराजाच्या जीवनात सुख-समृद्धी नांदो, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली. सीना नदीतील पाणीप्रश्नावर आमदार अभिजीत पाटील यांनी केलेल्या संघर्षामुळे शेतकऱ्यांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत. शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी लवकरात लवकर व्हावी, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

> **बळीराजासाठी लढतच राहणार**
> लोकप्रतिनिधी म्हणून शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करणे हे माझे कर्तव्य आहे. टीका करणारे टीका करतील, पण मी माझ्या बळीराजासाठी प्रत्येक स्तरावर लढत राहणार आहे.
> **- अभिजीत पाटील,** आमदार

## महत्वाचे...

### इच्छेविरुध्द गर्भपात केल्याप्रकरणी सासरकडील पाच जणांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि. १४ जुलै-**

एका विवाहित महिलेच्या इच्छेविरुध्द गर्भपात केल्याप्रकरणी नाशिक येथे राहणाऱ्या सासरकडील पाच जणांविरुध्द सोलापुरातील विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती अल्तमश पटेल, सासू हवाबी पटेल, अकील सय्यद, शेहजादी सय्यद, फरहत सय्यद (सर्वजण रा.गणूर, ता.चांदवड, जि.नाशिक) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत निलोफर अल्तमश पटेल (रा. सहारा नगर १, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.१९ जून २०२५ ते ३ मार्च २०२६ या कालावधीत सासरी नांदत असताना वरील आरोपींनी कर्ज फेडण्यासाठी माहेरुन ३० लाख रुपये घेवून ये असे म्हणत शिवीगाळ, दमदाटी करुन शारिरिक व मानसिक त्रास दिला. तसेच माझ्या इच्छेविरुध्द गर्भपात केला. पती अल्तमश पटेल यांनी गळा दाबून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. फौजदार पवार हे पुढील तपास करीत आहेत.



### दत्त प्राथमिक विद्यामंदिरात माता-पालक मेळावा

**बार्शी, दि. १४ जुलै-**

दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी या शाळेत माता पालक मेळावा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका अरुणा मठपती, प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षिका श्रीमती संगिता काळे, प्रमुख उपस्थिती म्हणून चैताली गुरव तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे उपस्थित होते कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. ज्येष्ठ माता पालक व मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या प्रगतीबाबत तसेच गुणवत्तेबाबत, आरोग्याबाबत, मातापालकांशी सुसंवाद साधण्यात आला. आपल्या पाल्याच्या शैक्षणिक अडचणी सोडविण्यासाठी शिक्षकांना पालकांनी सहकार्य करावे ही अपेक्षा शाळेकडून व्यक्त करण्यात आली. इयत्ता ४ थी, ७ वी शिष्यवृत्ती व स्पर्धा परीक्षाबाबत श्रीमती ललिता चव्हाण यांनी, इयत्ता ६ वीच्या बदललेल्या अभ्यासक्रमाबाबत युवराज जगताप यांनी विस्तृत मार्गदर्शन केले. विध्यार्थी उपस्थिती व गुणवत्तेबाबत श्रीकांत कुंभारे यांनी मार्गदर्शन केले.

# कट मारल्याच्या कारणावरून विद्यार्थ्यावर जीवघेणा हल्ला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जुलै-**

दुचाकीला कट मारल्याच्या किरकोळ कारणावरून एम.ए.चे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यावर तिघांनी जीवघेणा हल्ला केला. ही घटना १३ जुलै रोजी सायंकाळी घडली. आरोपींनी शिवीगाळ करत हाताने, लाथाबुक्क्यांनी मारहाण केली तसेच डोक्यात दगड मारुन गंभीर जखमी केल्याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरज सारंग (वय २२, रा. कारी, ता. बार्शी) हा शिवाजी महाविद्यालयात एम.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेत असून, १३ जुलै रोजी तो स्प्लेंडर दुचाकी घेऊन बार्शी येथे कांद्याचे बियाणे खरेदीसाठी आला होता. त्यानंतर मित्र आदित्य भराडे याला शिवाजी महाविद्यालयातून घेऊन दोघे गावाकडे निघाले.

मार्केट यार्डच्या मागील गेटमधून जात असताना भंगार दुकानासमोर बिगर क्रमांकाच्या बजाज सीटी-१०० दुचाकीवरील तिघांनी त्यांच्या दुचाकीला कट मारला. त्यानंतर 'गाडी नीट चालवता येत नाही का?' असे म्हणत शिवीगाळ सुरु केली. वाद वाढल्यानंतर आरोपींनी सुरज सारंगला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. एका आरोपीने मागून डोक्यात दगड मारल्याने तो गंभीर जखमी झाला व त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरु झाला. जखमी झाल्यानंतर सुरज सारंग व त्याचा मित्र घटनास्थळावर दुचाकी सोडून जीव वाचवण्यासाठी पळाले. त्यानंतर त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती अस्वस्थ असल्याने उपचारानंतर तो घरी गेला. पुढील दिवशी नातेवाईकांसह पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी गेल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी पाहणी करुन स्थानिकांकडून माहिती घेतली. त्यानंतर हल्लेखोरांची ओळख पटली. या प्रकरणी अल्पवयीन असलेले अ, ब ( नांव बदलेले दोघे रा. नाळे प्लॉट, बार्शी) आणि क ( नांव बदलेले, रा. भाजी मंडई, भोगेश्वरी मंदिराजवळ, बार्शी) यांच्याविरुद्ध बार्शी शहर पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा तपास अंमलदार कादर तांबोळी करत आहेत.

# करकंब पोलिसांकडून अवैध दारूसाठा जप्त

## सपोनि योगेश लंगुटे यांची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. १४ जुलै-**

पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक विजय कबाडे,पंढरपूर उपविभागीय पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या आदेशानुसार करकंब पोलीस स्टेशनचे सपोनि योगेश लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली करकंब पोलिसांनी अवैध दारू साठ्यावर छापा टाकून १ लाख १४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

कॉन्स्टेबल श्याम गायकवाड यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार १३ जुलै रोजी सायंकाळी नांदोरे (ता.पंढरपूर) येथील भीमा नदीच्या फुलापासून नांदोरेकडे जाणाऱ्या रस्त्यालगत सुमारे ४०० मीटर अंतरावर चिलारीच्या झाडाखाली अवैधरित्या साठवून ठेवलेला दारूचा साठा आढळून आला. कारवाईत १ लाख १४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. संशयित आरोपी सागर शंकर शिंदे. रा.नांदोरे ता.पंढरपूर हा वरील माल बेकायदेशीररित्या विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगलेल्या स्थितीत मिळून आला.

सपोनि योगेश लंगुटे यांच्या आदेशाने गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस सब इन्स्पेक्टर निलेश पोमणे हे करत आहेत. सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विलास रणदिवे, पोहेकॉ लक्ष्मण भांगे, पोहे गणेश शिंदे, पोना हनुमंत सावंत, पोकॉ श्याम गायकवाड, पोकॉ स्वप्निल बागल आदींनी ही कामगिरी केली.

# विवाहितेचा विनयभंग; एकावर गुन्हा

**बार्शी, दि. १४ जुलै-**

२२ वर्षीय विवाहितेचा विनयभंग व शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी एकावर बार्शी शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पीडिता पतीच्या निधनानंतर आई-वडिलांसोबत राहत असून मोलमजुरी करुन उदरनिर्वाह करते. ११ जुलै रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास ती वाणी प्लॉट परिसरातील घोळवे यांच्या घराच्या कंपाऊंडमध्ये काम करत असताना सुनिल अस्वरे (रा. वाणी प्लॉट, बार्शी) दुचाकीवर तेथे आला. तिला घराबाहेर बोलावून 'माझ्याशी बोलायचे का नाही, गाडीवर बसायचे का नाही,' अशी विचारणा करत तिचा हात पकडून जबरदस्तीने दुचाकीवर बसण्यास भाग पाडण्याचा प्रयत्न केला. मात्र, महिलेने प्रतिसाद न देता पुन्हा कंपाऊंडमध्ये जाऊन काम सुरु केले. त्यानंतर आरोपी तेथून निघून गेला. घरी परतल्यानंतर महिलेने हा प्रकार आई व नातेवाईकांना सांगितला. त्यानंतर त्यांनी आरोपीच्या पत्नीला याबाबत माहिती देण्यासाठी त्याच्या घरी भेट दिली. मात्र आरोपी घरी न आल्याने ते परतले.

दरम्यान, त्याच दिवशी रात्री आठच्या सुमारास सुनिल अस्वरे कोयता घेऊन महिलेच्या घरासमोर आला. पीडिता व तिच्या कुटुंबीयांना अश्लील शिवीगाळ, दमदाटी केली. तुमच्या पोरीला काय होतंय ते बघा', अशी जीवे मारण्याची धमकी दिली. अखेर जीविताला धोका निर्माण झाल्याची भावना झाल्याने तिने बार्शी शहर पोलिसात तक्रार दाखल केली. या प्रकरणी सुनिल अस्वरेवर गुन्हा दाखल झाला आहे,

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**स्टेशन तिकीट बुकिंग एजंट्सची निवड**

सूचना क्रमांक: STBA/01/NSG5, 6/2026; दिनांक: ०८.०७.२०२६

वरिष्ठ मंडळ वाणिज्य व्यवस्थापक, सोलापूर विभाग, मध्य रेल्वे हे भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने स्टेशन तिकीट बुकिंग एजंट्सच्या निवडीसाठी अर्ज मागवत आहेत. स्टेशन श्रेणी : NSG-5 स्टेशनचे नाव: सांगोला स्टेशन श्रेणी : NSG-6 स्टेशनची नावे: १. मोहोळ २. तिकेकरवाडी ३. कवठे महांकाळ ४. आरग ५. मार्तूर ६. हिरेनांदूर ७. ताज सुलतानपूर ८. बबलाद ९. सावळगी १०. गौडगाव ११. मुंढेवाडी १२. पाकणी १३. तिळती १४. नागणसूर १५. मलिकपेठ १६. आनगर १७. वाकाव १८. वाशिंबे १९. औसा रोड २०. येडशी २१. जिंती रोड २२. माळठण वरील सर्व स्टेशनसाठी महत्त्वाचा शेरा: सर्व शिफ्टमध्ये एक खिडकी उपलब्ध असेल. तिकेकरवाडी येथे मुख्य कार्यालयाकडून स्पष्टीकरण प्राप्त झाल्यानंतरच कार्यान्वित केले जाईल. इतर तपशील व माहिती: अधिकृत संकेतस्थळ: सर्व तपशील (http://www.cr.indianrailways.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. संपर्क: अधिक माहितीसाठी वरिष्ठ मंडळ वाणिज्य व्यवस्थापक कार्यालय, सोलापूर - ४१३००१ येथे संपर्क साधावा. अर्ज करण्याची अंतिम तारीख: ०३.०८.२०२६ रोजी दुपारी १५:०० वाजेपर्यंत (३:०० वाजेपर्यंत).

**वरिष्ठ मंडळ वाणिज्य व्यवस्थापक**
**मध्य रेल्वे, सोलापूर**
DE/Sur-34

सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

### अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातर्फे शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर दि.१४ जुलै-**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मार्फत सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी, १२ वी, पदवी, पदव्युत्तर, वैद्यकीय व अभियांत्रिकी अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने ६०% पेक्षा जास्त गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या मांग, मातंग, मिनी-मादीग, मादींग, दानखणी मांग,मांग महाशी,मदारी,राधेमांग,मांग गारुडी,मांग गोराडी, मादगी व मादिगा या जातीतील विदयार्थी/ विदयार्थीनींना महामंडळाकडून जेष्ठता व गुण क्रमांकानुसार जिल्हयातील प्रथम ०३ ते ०५ विदयार्थ्यांना निधीच्या उपलब्धतेनुसार प्रोत्साहनपर अण्णासभाऊ साठे शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

तरी या इच्छुक विदयार्थ्यांनी२८ जुलै २०२६ पर्यंत महामंडळाचे जिल्हा कार्यालय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सात रस्ता, सोलापूर येथे प्रत्यक्ष अथवा पोष्टाव्दारे अर्ज सादर करावे, अर्जासोबत अण्णा भाऊ साठे शिष्यवृत्ती मिळण्यासाठी हस्तलिखित अर्ज, सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात उत्तींण झाल्याची मार्कलिस्ट, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला,पुढील वर्षात प्रवेश घेतल्याची पावती, रेशनकार्ड व आधारकार्ड जोडले असावे.

# आठवडा बाजारातील मोबाईल चोरट्यांच्या मुसक्या आवळल्या

## डी.बी. पथकाची कारवाई; बीड जिल्ह्यातील आंतरजिल्हा टोळी गजाआड

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १४ जुलै-**

बार्शी शहर पोलीस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने (डी.बी. पथक) अत्यंत तत्परता आणि कौशल्य दाखवत शनिवार आठवडा बाजारातील मोबाईल चोरीच्या मालिकेचा छडा लावला. गर्दीचा फायदा घेऊन नागरिकांचे मोबाईल लंपास करणाऱ्या बीड जिल्ह्यातील आंतरजिल्हा टोळीला अटक करण्यात आली असून, त्यांच्याकडून चोरीस गेलेले चारही मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. या कारवाईत ४५ हजारांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

दि. ११ जुलै रोजी सकाळीच्या सुमारास संभाजीनगर, रेल्वे स्टेशन रोड येथील लक्ष्मण शामराव लांडगे हे कुटुंबासह शनिवार आठवडा बाजारात भाजीपाला खरेदीसाठी आले असता त्यांच्या खिशातील सुमारे २० हजार रुपये किमतीचा म टोरोला कंपनीचा मोबाईल अज्ञात चोरट्यांनी लंपास केला. त्याचवेळी बाजारात आलेल्या आणखी तीन नागरिकांचेही मोबाईल चोरीला गेल्याचे समोर आले. याप्रकरणी बार्शी शहर पोलीस ठाण्यात तक्रारी दाखल करण्यात आल्या.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे व त्यांच्या पथकाने तातडीने तपास सुरु केला. तांत्रिक विश्लेषण, सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी संशयितांचा शोध घेत बीड जिल्ह्यातील दोन सराईत चोरट्यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सचिन गोरख इटकर (रा. वडारवाडा, बार्शी नाका, जि. बीड) आणि अण्णा शिवाजी इटकर (रा. राजुरी, ता. व जि. बीड) यांचा समावेश आहे. आरोपींची झडती घेतली असता त्यांच्याकडून फिर्यादींचे चोरीस गेलेले मोटोरोला, व्हिवो व ओप्पो कंपनीचे चार मोबाईल फोन जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ४५ हजार रुपये आहे. ही उल्लेखनीय कारवाई पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अपर पोलीस अधीक्षक विजय कबाडे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी सुहास जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गणेश कुंभार यांच्या नेतृत्वात पार पडली. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक अभय माकणे यांनी भूमिका बजावली.

> **पोलिस प्रशासनाचे आवाहन**
> आठवडा बाजार किंवा इतर गर्दीच्या ठिकाणी नागरिकांनी आपले मोबाईल, पाकीट व इतर मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात. कोणतीही संशयास्पद हालचाल आढळल्यास तात्काळ बार्शी शहर पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा किंवा डायल ११२ वर माहिती द्यावी.

**IDFC FIRST Bank Limited**
(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792
Registered Office: - KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**वित्तीय मालमत्तांचे सुरक्षाकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हितसंबंधांची अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत नोटीस**

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेले तारण कर्ज घेतले आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत. संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तींचे पालन करण्यात ते अपयशी ठरल्यामुळे आणि खात्यांमधील व्यवहार अनियमित झाल्यामुळे, रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार त्यांची कर्जे 'अकार्यक्षम मालमत्ता' म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत. त्यांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) देणे असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये सविस्तरपणे नमूद केलेल्या संबंधित जारी केलेल्या नोटिसीनुसार आहे. तसेच सदर रक्कमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि संबंधित तारखांपासून करारातील दरानुसार ते आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) नोटीस दिनांक | कलम १३ (२) नोटिस नुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 76694986 & 145182831 | मालमत्तेवर कर्ज | १. नितीन सदाशिव केसकर<br>२. पल्लवी नितीन केसकर | 01/07/2026 | INR 9,31,251.05/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** मिळकत क्रमांक ५८० मध्ये नोंदणीकृत असलेल्या निवासी घराचा संपूर्ण भाग आणि तुकडा. हे निवासी घर दगड, विटा आणि काँक्रीटचे बनलेले असून याचे क्षेत्रफळ: तळमजला = ७८०.०० चौ. फूट आणि पहिला मजला = ७८० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ १५६०.०० चौ. फूट आणि एकूण जमीन क्षेत्रफळ ७८० चौ. फूट आहे. ठिकाण - गाव : केसकरवाडी, ग्रामपंचायत हद्द केसकरवाडी, तालुका: पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३१०. सीमा (चतु:सीमा): पूर्व : रस्ता, पश्चिम : उजनी कालवा रस्ता, उत्तर : गणपत केसकर यांचे घर, दक्षिण : भिवाजी केसकर यांचे घर. | | | | |
| 2 | 86862938 | मालमत्तेवर कर्ज | १. किरण जंगलू काळे<br>२. सुवर्णा किरण काळे | 10/06/2026 | INR 3,75,146.71/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** पहिल्या मजल्यावर बांधलेल्या आरसीसी घराचे मोजमाप क्षेत्रफळ २५२.०० चौ. फूट आणि दुसऱ्या मजल्यावरील मोजमाप क्षेत्रफळ २५२.०० चौ. फूट, म्हणजेच एकूण मोजमाप क्षेत्रफळ ५०४.०० चौ. फूट असलेल्या बांधकामाचा संपूर्ण भाग आणि तुकडा. सदर बांधकाम ग्रामपंचायत मिलकत क्रमांक २७/ब वर असून, ठिकाण - गाव: पांगरी (पांगण), दुय्यम निबंधक बार्शी यांच्या अधिकार क्षेत्रांतर्गत, तालुका: बार्शी, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३४०३. (सदर मालमत्ता सध्याचे मालक श्री. किरण जंगलू काळे आणि श्रीमती सुवर्णा किरण काळे यांच्या मालकीची आहे). सीमा (चतु:सीमा) : पूर्व : रस्ता, पश्चिम : राजेंद्र आणि किसन काळे यांची मिळकत, उत्तर : प्रमोद काळे यांची मिळकत, दक्षिण : राजेंद्र काळे यांची मिळकत. | | | | |
| 3 | 91920466 & 140897191 | मालमत्तेवर कर्ज | १. बालाजी अर्जुन गोरे<br>२. अर्जुन अंकुश गोरे | 01/07/2026 | INR 7,33,629.06/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** नगर भूमापन क्रमांक (C.T.S. No.) ४१८ धारण करणाऱ्या मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि तुकडा, ज्याचे एकूण मोजमाप क्षेत्रफळ ३४.१ चौ. मीटर आहे. ठिकाण - मौजे : फुलचिंचोळी, ग्रामपंचायत फुलचिंचोळीच्या हद्दीत, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४. सीमा (चतु:सीमा) : पूर्व : नगर भूमापन क्रमांक ४१४, पश्चिम : नगर भूमापन क्रमांक ४१९, उत्तर : रस्ता, दक्षिण : नगर भूमापन क्रमांक ४१७. | | | | |
| 4 | 119037087 & 167103743 | मालमत्तेवर कर्ज | १. प्रमोद मधुकर बाबर<br>२. अंजली प्रमोद बाबर | 01/07/2026 | INR 11,22,925.33/- |
| | **मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिलकत क्रमांक २८० धारण करणाऱ्या निवासी घराचा संपूर्ण भाग आणि तुकडा. हे निवासी घर दगड, विटा आणि काँक्रीटचे बनलेले असून याचे क्षेत्रफळ: तळमजला = ७८०.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ = ७८०.०० चौ. फूट, एकूण जमीन क्षेत्रफळ १०४० चौ. फूट आहे. ठिकाण - गाव : पुळूज, ग्रामपंचायत : पुळूज, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४. सीमा (चतु:सीमा): पूर्व : सुरेश दत्तू रणसिंग, पश्चिम : रस्ता, उत्तर : आनंदराव विठ्ठल पाटील, दक्षिण: जयदीप मारुती गिड्डे. | | | | |
| 5 | 135214332 | मालमत्तेवर कर्ज | १. सोमनाथ तानाजी मदने<br>२. ज्योती सोमनाथ मदने | 24/06/2026 | INR 8,02,258.20/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिलकत क्रमांक २५८/१ धारण करणाऱ्या निवासी घराचा संपूर्ण भाग आणि तुकडा. हे निवासी घर दगड, विटा आणि काँक्रीटचे बनलेले असून याचे क्षेत्रफळ: तळमजला = ९००.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ ९००.०० चौ. फूट आणि एकूण जमीन क्षेत्रफळ १४०० चौ. फूट आहे. ठिकाण - गाव : पुळूजवाडी, तालुका : पंढरपूर, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४. सीमा (चतु:सीमा) : पूर्व : मिळकत क्रमांक २३५/१, पश्चिम : रस्ता, उत्तर : मिळकत क्रमांक २५८/२, दक्षिण: रस्ता. | | | | |
| 6 | 164155583 | मालमत्तेवर कर्ज | १. काशिम रज्जाक मुजावर<br>२. नसरीन काशिम मुजावर | 27/06/2026 | INR 29,04,032.23/- |
| | **मालमत्तेचा पत्ता :** नगर भूमापन क्रमांक (C.T.S. No.) ११७६, महानगरपालिका कर आकारणी उतारा/मिलकत क्रमांक १४२१ धारण करणाऱ्या स्थावर मालमत्तेचा संपूर्ण भाग आणि तुकडा, ज्याचे मोजमाप क्षेत्रफळ १७६.६० चौ. मीटर आहे. ठिकाण - गाव: वैराग, तालुका : बार्शी, जिल्हा : सोलापूर-४१३४०२, वैराग ग्रामपंचायतीच्या हद्दीत. सीमा (चतु:सीमा) : पूर्व : गावकस, पश्चिम : ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १४२२ चे क्षेत्रफळ, उत्तर : सरकारी रस्ता, दक्षिण : सरकारी रस्ता. | | | | |

या प्रसिद्धीच्या (जाहिरातीच्या) तारखेपासून ६० दिवसांच्या आत वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) वरील रकमा आणि त्यावर संबंधित तारखांपासून करारातील दराने लागू होणारे व्याज आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी भरण्याचे आवाहन तुम्हाला याद्वारे केले जात आहे. तसे न केल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) थकीत रक्कम वसूल करण्यासाठी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांविरुद्ध सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत योग्य ती कायदेशीर कारवाई सुरू करणे स्वाक्षरीकर्त्यास भाग पडेल. शिवाय, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला सदर सुरक्षित (तारण ठेवलेली) मालमत्ता विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे.

**स्वाक्षरी/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, ज्याचे आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीनीकरण झाले असून सध्या ते आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखले जाते)**

**दिनांक : 15/07/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**संकेतन कार्य**

निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-24, दिनांक: ०७.०७.२०२६ भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांच्याद्वारे रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट संकेतस्थळावर www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, नाम ांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागवण्यात येत आहेत:- अ. क्र.: १ कामाचे नाव व ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील "दौंड वाडी, कुर्डूवाडी-लातूर चे ट्रॅक नूतनीकरण कामे आणि टर्नआऊट डीप स्क्रीनिं" च्या अनुषंगाने संकेतन कार्य. निविदा क्रमांक: SUR-N-T-2026-27-24, कामाची अंदाजित किंमत: रु. २,१६,२२,८५१.८५ निविदा फॉर्मची किंमत: निरंक, भरावयाची विनाकारण रक्कम : रु. ४,३२,५०० काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने, निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: ०५/०८/२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. सविस्तर तपशील च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सुधारणा/दुरुस्ती काही असल्यास ती केवळ वरील ई-प्रोक्युअरमेंट संकेतस्थळावरच अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स किंवा हस्तपुस्तिका द्वारे आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत.

निविदाधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. इसारा रकमेचा भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारला जाईल. मूळ बँक गॅरंटी ही निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजेच निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त), निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे वैयक्तिकरित्या सुपूर्द केली जावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

३० **सोलापूर, मध्य रेल्वे**

धोकादायक आणि स्फोटक वस्तूंसह प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**संकेतन कार्य**

निविदा सूचना क्र. SUR-N-T-2026-27-23, दिनांक: ०७.०७.२०२६ भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर यांच्याद्वारे रेल्वेच्या ई-प्रोक्युअरमेंट संकेतस्थळावर www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, नाम ांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागवण्यात येत आहेत:- अ. क्र.: १ कामाचे नाव व ठिकाण: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात ट्रॅक मशीन सायडिंगसाठी पायाभूत सुविधांच्या विकासाच्या अनुषंगाने संकेतन कार्य. निविदा क्रमांक: SUR-N-T-2026-27-23 कामाची अंदाजित किंमत: रु. ६१,१९,९७८.१८, निविदा फॉर्मची किंमत: निरंक भरावयाची विनाकारण रक्कम : रु. १,२२,४००, काम पूर्ण करण्याचा कालावधी: १२ महिने, निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: ०५/०८/२०२६ रोजी १५:३० वाजल्यानंतर. सविस्तर तपशील ireps च्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सुधारणा/ दुरुस्ती काही असल्यास ती केवळ वरील ई-प्रोक्युअरमेंट संकेतस्थळावरच अपलोड केली जाईल. केवळ ऑनलाईन निविदाच स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/टपाल/ई-मेल, फॅक्स किंवा हस्तपुस्तिका द्वारे आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. निविदाधारकांना विनंती आहे की त्यांनी कंपनीच्या नावासह क्लास डिजिटल सिग्नेचर सर्टिफिकेट प्राप्त करावे आणि त्याची www.ireps.gov.in वर नोंदणी करावी. इसारा रकमेचा भरणा नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटीच्या स्वरूपात स्वीकारला जाईल. मूळ बँक गॅरंटी ही निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी म्हणजेच निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिवसाव्यतिरिक्त, निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नामनिर्देशित अधिकाऱ्याकडे वैयक्तिकरित्या सुपूर्द केली जावी. अधिक माहितीसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

२९ **सोलापूर, मध्य रेल्वे**

रेल्वे रुळ अनधिकृतपणे ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**बार्शी नगरपरिषद बार्शी**
**स्थापत्य विभाग**
ई- निविदा सुचना क्र.४ सन-२०२६/२७
Main Portal : http://mahatenders.gov.in

महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या वर्गाचे नोंदणीकृत कंत्राटदाराकडून बार्शी नगरपरिषदेकडील खालील अ.नं.१ ते ३ कामांकरिता ई-नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे(ऑनलाईन) मागवित आहेत.

**ई- निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १) | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी | दिनांक:- १४/७/२६ वेळ दुपारी १६:०० पासून<br>दिनांक:- २१/७/२६ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| २) | निविदा ऑनलाईन अपलोड करण्याचा कालावधी | दिनांक:- १४/७/२६ वेळ दुपारी १६:०० पासून<br>दिनांक:- २१/७/२६ वेळ दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ३) | बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप आणि ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करण्यासाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप व्यक्तिश: स्वत:चे नावाची गोपनियता बाळगुन सिलबंद लखोट्यात तांत्रिक लिफाफ्यास सह सादर करणेचा दिनांक | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयामध्ये दिनांक २१/७/२६ रोजी दुपारी १६:०० वाजेपर्यंत |
| ४) | तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक वेळ | मा. मुख्याधिकारी, बार्शी नगरपरिषद, बार्शी यांचे कार्यालयात दिनांक २२/७/२६ रोजी दु. १६:०० वाजता ऑनलाईन उघडण्यात येतील (शक्य झाल्यास) |

**टिप :-**
१. सर्व पात्र / इच्छुक निविदाधारकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई- निविदा प्रणालीच्या Main portal - "http://mahatenders.gov.in व याच "http://mahatenders.gov.in साईटवर enrolled करणे आवश्यक आहे.
२. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/ अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनीवर संपर्क साधावा. टोल फ्री नंबर (१८००-२३३-७३१५).
३. निविदाधारकांनी निविदा संदर्भात सर्व दस्त ऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच बयाणा रकमेची ऑनलाईन पे स्लीप व ऑनलाईन कोरा निविदा संच डाऊनलोड करणेसाठीच्या किंमतीची मुळ ऑनलाईन पे स्लीप स्वतःच्या नावाची गोपनियता बाळगुन ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमुद केलेल्या दिनांक वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडणेत येणार नाही. याची नोंद घ्यावी.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पाहण्यास मिळतील सदर कामाची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रदद करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
५. ई-निविदेमध्ये तांत्रिक लिफाफा क्र. १ मधिल अपलोड केलेल्या कागदपत्राची हार्ड कॉपीची प्रमाणित प्रत दि.२१/७/२०२६ रोजी दुपारी १६.०० वाजेपर्यंत नगरपरिषद कार्यालयात जमा करणेची आहे.

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**बार्शी नगरपरिषद**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...

### घरासमोर दगड टाकल्याच्या कारणावरुन कोयत्याने मारहाण, महिलेसह चौघे जखमी

**सोलापूर, दि.१४ जुलै-**

राहत्या घरासमोर दगड टाकल्याच्या कारणावरुन कोयता, काठी, लाथाबुक्या आणि दगडाने केलेल्या मारहाणीत दोन महिलांसह चौघेजण




जखमी झाले. ही घटना तिरवंडी (ता.माळिशरस) येथे घडली. मनीषा शिवाजी मसूरकर (वय-२२), राजश्री बाळासाहेब मसूरकर (वय-४७), हरिभाऊ दत्ता तोडकर (वय-६०), ज्ञानेश्वर बाळासाहेब मसूरकर (वय-३२, सर्वजण रा.तिरवंडी) अशी जखमींची नावे आहेत. घरासमोरील रस्त्यावर दगड का टाकला? असे म्हणत पृथ्वीराज बाजारे, सूर्यकांत बाजारे आणि इतर १० जणांनी मिळून त्यांना मारहाण केली. माळशिरस येथील प्राथमिक उपचार करुन जखमींना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### रस्त्याच्या वहिवाटीवरुन भांडण, पती-पत्नीला लाकडाने मारहाण

**सोलापूर, दि.१४ जुलै-**

घराजवळील रस्त्याच्या वहिवाटीवरुन लाकूड आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत पती-पत्नी जखमी झाले. ही घटना कोंडी (ता. उत्तर सोलापूर) येथे घडली. तानाजी भिकू जाधव (वय-४५), सुवर्णा तानाजी जाधव (वय-३५) अशी जखमींची नावे आहेत. वहिवाटीच्या कारणावरुन मंगळवार, दि.१४ जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास अरुण बाळू जाधव, सचिन जाधव आणि इतर चौघांनी मिळून ही मारहाण केली. जखमींना उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

### पत्नीला बळजबरीने माहेरी नेल्याच्या कारणावरुन पतीचा आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि.१४ जुलै-**

पत्नीला बळजबरीने तिच्या आई-वडिलांनी माहेरी नेले. त्यामुळे रागाच्या भरात पतीने विष पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. ही घटना परंडा (जि.धाराशिव) येथे घडली. किरण नामदेव घोगरे (वय-२६, रा.परंडा) असे विष प्राशन केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याच्या घरात येऊन पत्नीला तिच्या आई-वडिलांनी बळजबरीने माहेरी घेऊन गेले होते. त्यामुळे त्याने ११ जुलै रोजी रात्री पिकावर फवारणीचे विषारी द्रव प्राशन केले होते. त्याला धाराशिव येथे प्राथमिक उपचार करुन भाऊ अजय घोगरे यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात आज मंगळवारी दाखल केले.

### फायटर, लाथाबुक्क्यांनी मारहाण, तरुण जखमी; बेगमपूर येथील घटना

**सोलापूर, दि.१४ जुलै-**

बेगमपूर (ता.मोहोळ) येथील चौकात फायटर आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत रामा बबन जाधव (वय ३० रा.बेगमपूर) हा तरुण जखमी झाला. ही घटना आज मंगळवारी दुपारच्या सुमारास घडली. गणेश माने आणि आनंद माने या दोघांनी मिळून त्याला विनाकारण मारहाण केली.



त्याला कामती येथे प्राथमिक उपचार करुन पत्नी संगीता जाधव यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले.

### दगड, विटाने मारहाण, दोघेजण जखमी; विजापूर नाका झोपडपट्टी येथील घटना

**सोलापूर, दि.१४ जुलै-**

शहरातील विजापूरनाका झोपडपट्टी क्र.२ येथील अण्णासाहेब पाटील शाळेजवळ रॉड, दगड आणि विटाने केलेल्या मारहाणीत शोएब दिवाण चौधरी (वय-२२, रा.१ नंबर झोपडपट्टी) हा तरुण जखमी झाला. इम्रान जमादार याने त्याला विनाकारण मारहाण केली. त्याला उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. भांडण सोडविण्यास गेलेल्या सलीम बशीर शेख (वय-६५ रा.संजयगांधी नगर, विजापूर नाका, सोलापूर) यांना इम्रान जमादार व शोएब चौधरी यांनी मारहाण करण्यात आल्याने तेही जखमी झाले. जखमींना सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# जिल्हा परिषद भरतीत अनियमितता; ८७ अतिरिक्त नियुक्त्यांनी खळबळ

**चौकशी अहवालात नियमभंग स्पष्ट**

**पुढील भरतीपूर्वी समायोजनाची शिफारस**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जुलै-**

सोलापूर जिल्हा परिषदेच्या २०२१ मधील पदभरती प्रक्रियेत ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांसाठीच्या १० टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करताना गंभीर अनियमितता झाल्याचे चौकशी समितीच्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. मंजूर पदसंख्येपेक्षा तब्बल ८७ अतिरिक्त पदांवर नियुक्त्या करण्यात आल्या. मात्र, या नियमभंगाला जबाबदार अधिकारी किंवा संबंधितांची नावे अहवालात नसल्याने संपूर्ण प्रकरणावर नव्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मे २०२६ मध्ये सादर झालेल्या या अहवालात २०१९ मधील रिक्त पदे, शासनाचे निर्देश, २४ मे २०२१ रोजी झालेली भरती आणि २०२३ मधील भरती जाहिरातीचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. त्यातून अनेक संवर्गांमध्ये मंजूर पदांपेक्षा



अधिक नियुक्त्या झाल्याचे स्पष्ट झाले असून, याचा थेट परिणाम पुढील भरती प्रक्रियेवर झाल्याचे समितीने नमूद केले आहे. गट 'क' संवर्गात मंजूर पदांपेक्षा ६ अतिरिक्त, तर गट 'ड' संवर्गात ८१ अतिरिक्त पदे भरली गेली. विशेष म्हणजे काही संवर्गांत एकही पद मंजूर नसताना देखील नियुक्त्या करण्यात आल्याचे समोर आले आहे. आरोग्य सेवक (पुरुष ४० टक्के) या संवर्गात ७ पदे भरायची असताना तब्बल २८ नियुक्त्या करण्यात आल्या. कनिष्ठ सहाय्यक पदासाठी ३ जागांच्या तुलनेत २९ उमेदवारांची नियुक्ती करण्यात आली.स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक पदावर ३ अतिरिक्त, विस्तार अधिकारी (कृषी) पदावर मंजुरी नसतानाही १ नियुक्ती, तर परिचर (गट ड) या संवर्गात एकही पद मंजूर नसताना तब्बल ५८ जणांची भरती झाल्याचे अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे. दुसरीकडे, आरक्षणानुसार भरली जाणारी २८ पदे रिक्तच राहिली. त्यामध्ये २४ आरोग्य सेविका, एक अंगणवाडी पर्यवेक्षिका, एक आरोग्य सेवक (पुरुष ५० टक्के) आणि कंत्राटी ग्रामसेवकाचे एक पद रिक्त राहिल्याची नोंद समितीने केली आहे.

**अतिरिक्त नियुक्त्यांचे समायोजन करणे आवश्यक**

चौकशी समितीने स्पष्टपणे नमूद केले आहे की, २०२३ आणि त्यानंतरच्या भरती प्रक्रियेत २०२१ मधील अतिरिक्त नियुक्त्यांचे समायोजन करणे आवश्यक आहे. तसे न करता नव्याने भरती करणे नियमबाह्य ठरेल, अशी शिफारसही समितीने केली आहे.

**सहभागी व्यक्तींचा कुठेही उल्लेख नाही**

इतक्या मोठ्या प्रमाणावर अतिरिक्त नियुक्त्या झाल्याचे स्पष्ट असूनही यासाठी जबाबदार अधिकारी, भरती समिती किंवा निर्णय प्रक्रियेत सहभागी व्यक्तींचा अहवालात कुठेही उल्लेख नसल्याने चौकशीच्या पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. त्यामुळे या प्रकरणात जबाबदारी निश्चित करून दोषींवर कारवाई होणार का? याकडे कर्मचारी संघटना, इच्छुक उमेदवार आणि सर्वसामान्यांचे लक्ष लागले आहे.

**ठळक मुद्दे याप्रमाणे**

२०२१ च्या भरतीत ८७ अतिरिक्त नियुक्त्या झाल्याचा चौकशी अहवाल. गट 'ड'मध्ये मंजुरी नसतानाही ५८ परिचरांची भरती. कनिष्ठ सहाय्यक पदावर २६ अतिरिक्त नियुक्त्या. आरक्षणातील २८ पदे रिक्तच राहिल्याची नोंद. दोषींची नावे अहवालातून गायब; कारवाईबाबत अनिश्चितता. पुढील भरतीपूर्वी अतिरिक्त नियुक्त्यांचे समायोजन करण्याची समितीची शिफारस.

## आपली तक्रार आणि लोकसेवा हक्कातील प्रलंबित प्रकरणी दंडाचा बडगा

**५१ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जुलै-**

आपली तक्रार/माय सोलापूर ॲप व लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अर्ज मुदतीत निकाली न काढल्याप्रकरणी सोलापूर महापालिकेने ५१ अधिकारी व कर्मचाऱ्यांवर दंडात्मक बडगा उगारण्यात आला. दरम्यान, संबंधितांकडून नियमानुसार दंड वसूल करण्याचे आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या उपायुक्त सोनाली यादव यांनी काढले आहेत.

महापालिकेने नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निराकरण व्हावे, यासाठी ऑनलाइन तक्रार प्रणाली सुरू केली आहे. तसेच लोकसेवा हक्क अधिनियम ंतर्गत १३६ सेवा अधिसूचित करण्यात आल्या आहेत. या सेवांशी संबंधित अर्ज वेळेत निकाली काढणे, पोर्टलवरील माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र अद्याप अनेक तक्रारी व अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून आल्याने कारवाई केली आहे.

आपली तक्रार माय सोलापूर ॲपवर प्रकरणे प्रलंबित ठेवल्याप्रकरणी २१ कर्मचाऱ्यांना एकूण ४ हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे. लोकसेवा अधिनियम हक्क अंतर्गत अर्ज प्रलंबित ठेवल्याने ३० कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण २५ हजार ९०० रुपये दंड करण्यात आला आहे. एकूण ५१ कर्मचारी व अधिकाऱ्यांना एकूण २९ हजार ९०० रुपये दंड आकारण्यात आला आहे.

दरम्यान, विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमासाठी नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांवरील आपली तक्रार पोर्टल व लोकसेवा हक्क अधिनियमातील प्रलंबित प्रकरणांसंदर्भातील दंडात्मक कारवाई ३१ जुलै २०२६ पर्यंत स्थगित ठेवण्यात आली आहे. संबंधित विभागप्रमुखांनी या आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

## 'हुतात्मा एक्सप्रेस'ला आज होताहेत २५ वर्षे पूर्ण




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जुलै-**

मध्य रेल्वेचा सोलापूर विभाग हुतात्मा एक्सप्रेसचा रौप्यमहोत्सव १५ जुलै २०२६ रोजी या गाडीच्या समर्पित सेवेला २५ वर्षे पूर्ण होत आहेत. १५ जुलै २००१ रोजी सुरु झाल्यापासून, ही गाडी विश्वसनीय संपर्क, प्रवाशांची सोय आणि प्रादेशिक प्रगतीचे प्रतीक बनली असून, तिने सोलापूर आणि पुणे येथील लोकांच्या हृदयात विशेष स्थान निर्माण केले आहे.

महाराष्ट्रातील दोन महत्त्वाच्या शहरांदरम्यान जलद, आरामदायक आणि विश्वसनीय अशी दिवसा धावणारी रेल्वे सेवा उपलब्ध करुन देण्यात आली. गेल्या पाव शतकात केवळ एक गाडी न राहता त्याहून अधिक काहीतरी बनली आहे. लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक, नोकरदार वर्ग आणि पर्यटकांची ती एक विश्वासू सोबती ठरली आहे.

गाडी क्रमांक १२१५८ (सोलापूर-पुणे) आणि गाडी क्रमांक १२१५७ (पुणे-सोलापूर) म्हणून धावणारी हुतात्मा एक्सप्रेस सुमारे चार तासांत २६३ किलोमीटरचे अंतर कापते. ही गाडी कुर्डुवाडी आणि दौंड यांसारख्या महत्त्वाच्या स्थानकांवर थांबते. ही रेल्वेगाडी १६ डब्यांसह धावते; यात १ एसी चेअर कार, १ एसी ३-टायर इकॉनॉमी कोच, २ स्लीपर क्लास कोच, १० सेकंड क्लास सीटिंग कोचचा समावेश आहे.

सोलापूरच्या स्वातंत्र्यलढ्यातील चार अमर हुतात्म्यांच्या म्हणजेच जगन्नाथ शिंदे, कुर्बान हुसेन, किसन सारडा आणि मल्लप्पा धनशेट्टी यांच्या स्मृती कायम राहाव्यात या उद्देशाने या रेल्वेगाडीला हुतात्मा एक्सप्रेस असे नाव देण्यात आले. आराम आणि परवडणारे दर यांचा समतोल साधत समाजातील विविध घटकांतील प्रवाशांची ही गाडी सेवा करते.

## मनरेगा रस्ते कामात गैरव्यवहाराचा संशय; मंजूर ठिकाणाऐवजी अन्यत्र काम झाल्याची तक्रार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जुलै-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत अक्कलकोट तालुक्यातील सुलेरजवळगे येथील मातोश्री ग्रामसमृद्धी शेत/पाणंद रस्ता योजनेच्या कामामध्ये मंजूर ठिकाणात अनधिकृत बदल करून शासन निधीचा गैरवापर झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मनरेगा कक्षाने पंचायत समिती अक्कलकोटच्या गटविकास अधिकाऱ्यांना दिले आहेत.

पंचायत समिती सदस्य उत्तम वाघमारे यांनी केलेल्या तक्रारीच्या आधारे जिल्हा परिषद प्रशासनाने ही कारवाई सुरू केली आहे. तक्रारीनुसार, सन २०२५-२६ मध्ये "मौजे सुलेरजवळगे ते कणबस रस्त्यापर्यंत मातोश्री पाणंद रस्ता (०/०० ते १/००)" या कामास प्रशासकीय मान्यता मिळाली होती. मात्र, प्रत्यक्षात हे काम मंजूर स्थळी न करता सुलेरजवळगे ते शिरवळ रस्त्याच्या मध्यभागी करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीत संबंधित कंत्राटदार, रोजगार सेवक, ग्रामपंचायत आणि सरपंच यांनी संगनमताने मंजूर कामाचे ठिकाण बदलल्याचा आरोप करण्यात आला असून, यामुळे शासनाची दिशाभूल करून निधीचा गैरवापर झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

मंजुरी आदेश, तांत्रिक मान्यता, मोजमाप पुस्तिका (एम.बी.), मास्टर रोल, जिओ-टॅग छायाचित्रे, निधी वितरण नोंदी आणि इतर सर्व संबंधित अभिलेखांची पडताळणी करण्यात येणार आहे. चौकशीत अनियमितता सिद्ध झाल्यास संबंधित कंत्राटदार, रोजगार सेवक, सरपंच तसेच जबाबदार अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुद्ध शासन निधीचा गैरवापर, फसवणूक, बनावट नोंदी तयार करणे आणि आर्थिक अनियमिततेप्रकरणी लागू कायद्यांनुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## जलजीवन मिशन कंत्राटदारांना दिलासा; सोलापूर झेडपीत सकारात्मक संकेत



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जुलै-**

जलजीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमध्ये काम करणाऱ्या कंत्राटदारांना दिलासा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हा परिषद सोलापूरचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्न मांडले.

या बैठकीत अनेक महत्त्वाच्या मागण्यांवर सकारात्मक भूमिका घेण्यात आल्याने कंत्राटदारांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. दि.८ जून २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या परिपत्रकानुसार सोलापूर जिल्ह्यातील संबंधित कामांना विनादंड मुदतवाढ देण्याबाबत आणि प्रत्येक कामाचा स्वतंत्रपणे (केस-टू-केस) आढावा घेऊन निर्णय घेण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी सकारात्मक आश्वासन दिले.

जलजीवन मिशनअंतर्गत सोलापूर जिल्ह्यातील ४६ कामांवर लावण्यात आलेल्या १० टक्के दंडाच्या प्रश्नावरही आषाढी वारीनंतर संघटनेसोबत स्वतंत्र बैठक घेऊन पुनर्विचार करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे संबंधित कंत्राटदारांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. देयकांमधून (बिलांमधून) लोकवर्गणीच्या नावाखाली होणारी कपात यापुढे केली जाणार नसल्याचेही बैठकीत आश्वासन देण्यात आल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

संबंधित निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास केवळ सोलापूरच नव्हे, तर राज्यातील इतर जिल्ह्यांसाठीही हा एक दिशादर्शक नमुना ठरू शकतो. त्यामुळे आता आषाढी वारीनंतर होणाऱ्या पुढील बैठकीकडे कंत्राटदारांचे लक्ष लागले आहे. यावेळी महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे राज्याध्यक्ष मिलिंद भोसले, सोलापूर जिल्हाध्यक्ष आनंद तोडकरी, जिल्हा सचिव विवेक राठोड यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## 'एआय'चा उपयोग विचारशक्ती विकसित करण्यासाठी करावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ जुलै-**

विद्यार्थ्यांनी उत्तम करिअर घडवावे. आधुनिक तंत्रज्ञान अर्थात एआयचा वापर विचार करण्याची क्षमता कमी करण्यासाठी नव्हे, तर विद्यार्थ्यांनी आपली विचारशक्ती अधिक विकसित करण्यासाठी उपयोग करावे, असे जमाते इस्लामी हिंदचे शहर अध्यक्ष डॉ. इस्माईल शेख यांनी सांगितले.

सोलापूर शहर बागबान जमियततर्फे आयोजित दहावी, बारावी व पदवी परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभात ते बोलत होते. व्यासपीठावर सोलापूर शहर बागबान जमियतचे अध्यक्ष डॉ.एम.ए. दलाल, लवाद समितीचे सदस्य मुख्तार हुमनाबादकर उपस्थित होते. डॉ.एम.ए. दलाल यांनी आपल्या भाषणात शिक्षणाचे महत्व अधोरेखित केले. फय्याज बागबान यांनी स्वागत केले. डॉ. हारुन रशीद बागबान यांनी प्रास्ताविक केले. अश्पाक मेम्बर यांनी सूत्रसंचालन केले. अल्ताफ लिंबुवाले यांनी आभार मानले.




कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अखलाक मर्चंट, मुश्ताक सरदार, इम्तियाझ दलाल, मुश्ताक एम. मतीन बागबान, एजाज बागबान, हाफिज सलाम, रजाक चौधरी, मुश्ताक इंजिनिअर, ॲड. आमिर बागबान, इफ्तेकार तुळजापूरे आदींनी परिश्रम घेतले.

## पावसाअभावी पिके दुपार धरु लागली; जिल्ह्यातील बळीराजाची चिंता वाढली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ जुलै-**

यंदाच्या खरीप हंगामात एल निनोच्या प्रभावामुळे राज्यात मान्सूनचे आगमन उशिरा होणे, पावसाचे कमी प्रमाण, पावसात दीर्घ खंड पडणे अथवा पावसाचे अनियमित वितरण होण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली होती; या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन आपत्कालीन पीक नियोजन अवलंबावे, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले होते मात्र तरीही या आवाहनाला न जुमानता जिल्ह्यात सरासरी २९ टक्के खरिपाची पेरणी झाली. दरम्यान, आता पाऊस लांबणीवर पडल्याने या शेतकऱ्यांची पिके आता दुपार धरू लागली असल्याने त्यांची चिंता वाढली आहे.

एल निनोमुळे पिकांच्या उगवण, वाढ व उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असल्याने उपलब्ध पाऊस व पाण्याचा कार्यक्षम वापर करून उत्पादनातील संभाव्य नुकसान कमी करण्यासाठी नियोजनबद्ध शेती व्यवस्थापन करणे आवश्यक असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले होते. मान्सून उशिरा सुरू झाल्याने बाजरी, राळा, राजगिरा, मूग, तूर, हुलगा, सूर्यफूल, मटकी व सोयाबीन या पिकांची निवड करावी. जुलैच्या दुसऱ्या आठवड्यात चांगला पाऊस झाल्यास सूर्यफूल, तूर, हुलगा, राळा, एरंडी, बाजरी व सोयाबीन ही पिके घ्यावीत. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात सूर्यफूल, हुलगा, एरंडी व बाजरी, तर ऑगस्टच्या दुसऱ्या आठवड्यात सूर्यफूल, एरंडी व बाजरी या पिकांना प्राधान्य द्यावे. विलंबित पेरणीच्या परिस्थितीत मूग, उडीद व सोयाबीन घेणे टाळावे, असेही या विभागाने म्हटले होते. तरीही जिल्ह्यातील अनेक शेतकऱ्यांनी रामभरोसे खरिपाची पेरणी केली. यामुळे सध्या शेतकरी बांधव अडचणीत आले आहेत. पाऊस अजून एक आठवडा नाही आल्यास पिके वाळून जाण्याची भीती त्यांच्यासमोर उभी ठाकली असून, दुबार पेरणीचेही संकट उभारले आहे.

**एकाच पिकावर अवलंबून राहू नये**

जुलै महिन्यातही पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्यास कमी पाण्यावर येणारी बाजरी, ज्वारी, मूग, उडीद, तीळ, तूर व चवळी यांसारख्या पिकांना प्राधान्य द्यावे. एकाच पिकावर अवलंबून न राहता आंतरपीक व मिश्रपीक पद्धतीचा अवलंब केल्यास जोखीम कमी होण्यास मदत होते. शेतातील उपलब्ध पाणी अधिक काळ साठवून ठेवण्यासाठी ठिबक व तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. जमिनीतील आर्द्रता टिकवून ठेवण्यासाठी सेंद्रिय खतांचा वापर, पीक अवशेषांचे आच्छादन आणि वेळेवर आंतरमशागत करणेही महत्त्वाचे आहे, असे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी सांगितले.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## बसस्थानक परिसरात वृक्षारोपण; परिवहन मंत्र्यांच्या संकल्पनेतून उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ जुलै -**

राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून राज्यभरातील बसस्थानके व बस डेपो स्वच्छ, सुंदर आणि हरित करण्याच्या उपक्रमांतर्गत मंगळवारी (दि.१४ जुलै) नळदुर्ग बसस्थानक परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

राज्यातील सर्व बस डेपो आणि बसस्थानकांमध्ये स्वच्छता, सुशोभीकरणासह पर्यावरण संवर्धनाला चालना देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्याचा निर्णय परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे. त्यानुसार विभाग नियंत्रक अजय पाटील, विभागीय वाहतूक अधिकारी मधुरा जाधवर तसेच तुळजापूर आगार प्रमुख महेश रामपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली नळदुर्ग बसस्थानक परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचे उद्घाटन नळदुर्गचे नगराध्यक्ष बसवराज धरणे आणि नगरपालिकेच्या बांधकाम समितीचे सभापती शशिकांत पुदाले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले.

यावेळी तुळजापूर डेपोचे लेखापाल सुधीर बामनकर, नळदुर्ग बसस्थानकाचे वाहतूक नियंत्रक महेश डुकरे, अनिल हांडे, मुकुंद वैद्य, सफाई कर्मचारी लहु देडे, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच प्रवासी उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त...



### सामाजिक कार्यकर्ते चनाप्पा साखरे यांचा भाजपमध्ये प्रवेश

**इटकळ, दि.१४ जुलै -**

तुळजापूर तालुक्यातील केशेगाव येथील सामाजिक कार्यकर्ते तथा शिवा संघटनेचे तालुका अध्यक्ष चनाप्पा साखरे यांनी असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या निवासस्थानी सोमवारी (दि.१३ जुलै) झालेल्या कार्यक्रमात त्यांनी भाजपचा झेंडा हाती घेतला. यावेळी केशेगावचे माजी उपसरपंच दयानंद जळकोटे यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी नव्या सदस्यांचे स्वागत करून त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास जि.प. बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे, सरपंच मल्लिनाथ गावडे, रामराजे पाटील, शिव हुक्किरे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. साखरे यांच्या प्रवेशामुळे शहापूर गटात भाजपाला अधिक बळ मिळेल, अशी चर्चा परिसरात सुरू आहे.

### प्रा.डॉ. मनोज डोलारे यांची जिल्हा मानद वन्यजीव रक्षकपदी नियुक्ती

**धाराशिव, दि.१४ जुलै -**



श्रीपतराव भोसले उच्च माध्यमिक विद्यालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा.डॉ. मनोज भारत डोलारे यांची महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाकडून धाराशिव जिल्हा मानद वन्यजीव रक्षक म्हणून पुढील तीन वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी एकूण ३६ मानद वन्यजीव रक्षकांची नियुक्ती जाहीर करण्यात आली असून, वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अंतर्गत ही नियुक्ती करण्यात आली आहे. प्रा.डॉ. डोलारे हे गेल्या १५ वर्षांपासून पर्यावरण संरक्षण, जैवविविधता आणि वन्यजीव संवर्धन क्षेत्रात कार्यरत असून पक्षी अभ्यासक व वन्यजीव छायाचित्रकार म्हणून त्यांची राज्यभर ओळख आहे. ते जिल्हा पर्यावरण समितीचे सदस्य, बी.एन.एच.एस.चे जिल्हा समन्वयक तसेच महाराष्ट्र पक्षीमित्र संघटनेचे सक्रिय सदस्य आहेतफ त्यांच्या पर्यावरण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ही नियुक्ती करण्यात आली आहे.



### अनाळा जि.प. शाळेच्या शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी चिंतामणी

**परंडा, दि.१४ जुलै -**

परंडा तालुक्यातील अनाळा येथील केंद्रीय जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विनोद चिंतामणी तर उपाध्यक्षपदी जालिंदर शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शाळेत झालेल्या निवड प्रक्रियेनंतर नूतन समितीची घोषणा करण्यात आली. समितीच्या सदस्यपदी अनुराधा गौतम क्षीरसागर, चित्रा ज्ञानेश्वर ईटकर, पल्लवी तानाजी रेवडे, मंगल सतीश विदयागर, अंजली लक्ष्मण शिंदे, महेंद्र शिंदे, लक्ष्मण पुरंदरे, शिवाजी जाधव, अनिल शिंदे आणि साजिद शेख यांची निवड करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक मुबारक पठाण यांच्या हस्ते अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास माजी अध्यक्ष रेवन्नाथ शिंदे, माजी उपाध्यक्ष लक्ष्मण शिंदे यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धाराशिवच्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा...

# खरीप २०२५ च्या पिकविम्याचे ३३७ कोटी सात दिवसांत वितरित करण्याचे टीसीचे आदेश

### आ. राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जुलै -**



धाराशिव जिल्ह्यातील शेतकरी बांधवांसाठी दिलासादायक घडामोड घडली असून, खरीप २०२५ पिकविमा प्रकरणात राज्य सरकारच्या निर्णयाला केंद्रीय तांत्रिक सल्लागार समितीने कायम ठेवत विमा कंपनीचे अपील फेटाळून लावले आहे. तसेच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात सुमारे ३३७ कोटींची विमा रक्कम पुढील सात दिवसांत जमा करण्याचे आदेश समितीने दिल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली.

आमदार पाटील यांनी सांगितले की, केंद्रीय समितीने राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या भूमिकेला दुजोरा दिला आहे. त्यामुळे धाराशिव जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांना लवकरच त्यांच्या हक्काची विमा रक्कम मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयासाठी शेतकरी, विविध शेतकरी संघटना, लोकप्रतिनिधी आणि कृषी विभागाने सातत्याने पाठपुरावा केला होता.



या लढ्यात सहकार्य करणाऱ्या सर्वांचे त्यांनी आभार मानले. खरीप २०२५ मध्ये धाराशिव जिल्ह्यात सोयाबीन पिकासाठी एकूण ५०४ पीक कापणी प्रयोग (Crop Cutting Experiments - CCEs) करण्यात आले होते. त्यापैकी ५६ महसूल मंडळांतील ३६८ प्रयोगांवर विमा कंपनीने आक्षेप घेत राज्य तांत्रिक सल्लागार समितीकडे दाद मागितली होती. राज्यस्तरीय समितीने हे आक्षेप फेटाळून लावल्यानंतर विमा कंपनीने केंद्रीय टीसीकडे अपील केले होते.

सुनावणीदरम्यान विमा कंपनीने केलेल्या आरोपांना पुरेसे दस्तऐवजी पुरावे सादर करण्यात अपयश आल्याचे समितीने नमूद केले.

तसेच पीक कापणी प्रयोगांमध्ये फेरफार, नियमभंग किंवा प्रक्रियात्मक गंभीर त्रुटी सिद्ध न झाल्याने कंपनीचे अपील फेटाळण्यात आल्याची माहिती आमदार पाटील यांनी दिली.

## कळंबमध्ये अनैतिक व्यवसायप्रकरणी प्रभात लॉजवर छापा

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१४ जुलै -**

कळंब शहरातील प्रभात लॉजवर पोलिसांनी छापा टाकून अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून, रोख रक्कम, मोबाईल, नोंदवही व अन्य साहित्य असा १६,२०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक शेख यांच्या पथकाला गुप्त माहिती मिळाल्यानंतर बनावट ग्राहकामार्फत खात्री करून सोमवारी (दि. १३ जुलै) सायंकाळी प्रभात लॉजवर छापा टाकण्यात आला. तपासात आरोपी समाधान महादेव कांबळे (रा. इंदिरानगर, कळंब), अमोल राजाभाऊ सोनटक्के (रा. हासेगाव) आणि नरेश खेमराज जोशी (रा. बसस्थानक परिसर, कळंब) हे महिलांना वाणिज्यिक लैंगिक शोषणासाठी आश्रय देत असल्याचे निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

## पावसाने वाशी तालुक्याकडे फिरवली पाठ...

# खरीपातील सोयाबीन पीक धोक्यात; शेतकरी चिंतेत

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जुलै -**



यंदाच्या खरीप हंगामात पावसाने वाशी तालुक्याकडे अक्षरशः पाठ फिरवल्याने सोयाबीन पीक धोक्यात आले आहे. जुलै महिना अर्धा संपत आला तरी समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

अपुऱ्या पावसाच्या भरोशावर शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने सोयाबीनची पेरणी केली. मात्र, त्यानंतर पावसाने पूर्णपणे उघडीप दिल्याने अनेक ठिकाणी पिके करपू लागली असून उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. यंदा बियाणे, खते, औषधे, मशागत आणि पेरणीसाठी शेतकऱ्यांनी मोठा खर्च केला आहे. अनेकांनी कर्ज काढून शेती केली असून, पाऊस न झाल्यास हा सर्व खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वेळेत पाऊस न झाल्यास सोयाबीनच्या उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता असून शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहणार आहे. सध्या तालुक्यातील अनेक शेतांमध्ये जमिनीला भेगा पडू लागल्या आहेत, तर सोयाबीनची रोपे पिवळी पडून कोमेजण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत असून पावसाच्या प्रतीक्षेत आकाशाकडे डोळे लावून बसले आहेत.

शेतकऱ्यांच्या मते, येत्या काही दिवसांत चांगला पाऊस झाला तर पिकांना काही प्रमाणात जीवदान मिळू शकते; अन्यथा खरीप हंगामावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## विंड वर्ल्ड कंपनीविरोधातील शेतकऱ्यांचा संघर्ष निर्णायक टप्प्यावर; थकीत देयकांवरून संताप

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१४ जुलै -**

धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात विंड वर्ल्ड पवनचक्की कंपनीविरोधातील बाधित शेतकरी आणि ग्रामस्थांचा संघर्ष आता निर्णायक टप्प्यावर पोहोचला असून, थकीत देयकांवरून परिसरात तीव्र नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे.



शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक वर्षांपासून जमिनीचे भाडे, पगारी वाहनधारकांचे थकीत भाडे तसेच इतर प्रलंबित देयके अद्याप मिळालेली नाहीत. याबाबत कंपनी तसेच जिल्हा प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही कोणताही ठोस तोडगा निघालेला नसल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

कंपनीच्या प्रतिनिधींनी थकीत देयके १५ दिवसांत अदा करण्याचे तोंडी आश्वासन दिल्याची माहिती शेतकऱ्यांनी दिली होती. मात्र त्या आश्वासनाला जवळपास दोन महिने उलटूनही संबंधितांना प्रत्यक्ष पैसे मिळाले नसल्याने कंपनीच्या आश्वासनाच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दरम्यान, या प्रकरणाबाबत कंपनीची अधिकृत भूमिका जाणून घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी वारंवार दूरध्वनीद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र कोणत्याही अधिकाऱ्याने संपर्काला प्रतिसाद दिला नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कंपनीची अधिकृत भूमिका अद्याप स्पष्ट झालेली नाही.

यामुळे शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता होणार की केवळ वेळकाढूपणा सुरू आहे, याबाबत परिसरात चर्चा रंगली असून बाधित शेतकरी लवकरात लवकर न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त करत आहेत.

## जनादेशाचा विश्वास अबाधित ठेवा; पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणांची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जुलै -**

भारतीय राज्यघटनेतील दहाव्या अनुसूचीअंतर्गत असलेल्या पक्षांतरबंदी कायद्यात व्यापक सुधारणा करून लोकशाहीतील जनादेशाचे संरक्षण करावे, अशी मागणी ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशन, उमरगा यांच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भातील निवेदन उपविभागीय अधिकारी, उमरगा यांच्यामार्फत भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय विधी व न्याय मंत्री, भारत निवडणूक आयोग, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच राज्याच्या विधी व न्याय विभागाकडे पाठविण्यात आले.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, मतदार हा केवळ उमेदवाराला नव्हे तर त्याच्या पक्षाची विचारसरणी, जाहीरनामा आणि धोरणांवर विश्वास ठेवून मतदान करत असतो. त्यामुळे निवडणुकीनंतर पक्षांतर करून सत्तेच्या समीकरणात सहभागी होणे म्हणजे मतदारांच्या जनादेशाशी आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्त्वांशी प्रतारणा होय. सध्याच्या पक्षांतरबंदी कायद्यातील त्रुटींमुळे मोठ्या प्रमाणावरील पक्षांतराला अप्रत्यक्ष संरक्षण मिळत असून, त्यामुळे लोकशाही व्यवस्थेवरील जनतेचा विश्वास कमी होत असल्याची खंतही फाउंडेशनने व्यक्त केली आहे.

फाउंडेशनने निवेदनाद्वारे पक्ष बदलणाऱ्या आमदार-खासदारांचे सदस्यत्व तात्काळ रद्द करून नव्याने जनतेचा कौल घेणे बंधनकारक करावे, पक्षांतराच्या प्रकरणांचा निर्णय स्वतंत्र न्यायाधिकरण किंवा भारत निवडणूक आयोगाकडे सोपवावा, तसेच अशा प्रकरणांचा अंतिम निकाल ३० ते ६० दिवसांच्या आत देण्याची सक्ती करावी, अशी मागणी केली आहे.

याशिवाय पक्षांतर करणाऱ्या लोकप्रतिनिधींना किमान पाच वर्षे मंत्रीपद अथवा तत्सम राजकीय लाभाच्या पदांपासून दूर ठेवणे, दहाव्या अनुसूचीतील दोन तृतीयांश विलिनीकरण ही तरतूद रद्द करणे, भविष्यात 'राईट टू रिकॉल'चा विचार करणे तसेच जनादेशाचा अपमान करणाऱ्या आर्थिक प्रलोभनांवर आणि लोकप्रतिनिधींच्या खरेदी-विक्रीवर कठोर दंडात्मक तरतुदी करण्याचीही मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. राजू बटगिरे, कार्याध्यक्ष सत्यनारायण जाधव, उपाध्यक्ष व्यंकट उर्फ राजू भालेराव, सचिव किशोर औरादे, सहसचिव करिम शेख यांच्यासह ॲड. शीतल चव्हाण, ॲड. ख्वाजा शेख, ॲड. अर्चना जाधव, प्रदीप चौधरी, ज्योती माने, धानय्या स्वामी, प्रदीप मोरे, कविता साळी, बबीता मदने, किशोर बसगुंड, विजय चितली आदी पदाधिकारी व सदस्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## दिव्यांग वारकऱ्यांना बॅगचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१४ जुलै -**

वाशिम ते पंढरपूर अशी सुमारे ४०० किलोमीटरची पायी वारी करणाऱ्या संत सूरदास दिव्यांग पायी दिंडीतील २० दिव्यांग वारकऱ्यांना दयावान प्रतिष्ठान व सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रच्या वतीने प्रवासाच्या बॅगचे वाटप करण्यात आले.

कळंब येथे राहुल जाजू यांच्या निवासस्थानी दिंडीच्या मुक्कामादरम्यान हा उपक्रम पार पडला.

सकल मुस्लिम युवक महाराष्ट्रचे धाराशिव जिल्हाध्यक्ष तथा दयावान प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष इम्रान मुल्ला यांच्या हस्ते बॅगचे वितरण करण्यात आले. दिंडी प्रमुख सचिन तायडे यांनी मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी महादेव महाराज अडसूळ, इम्रान काझी, अभय गायकवाड, अमन शेख, समीर सय्यद, तोफिक सय्यद, अलिम दारवाले, आकाश पवार, वाजेद तांबोळी, आदिलअली सय्यद, आरेफ शेख, अमित जाधवर आदी उपस्थित होते.

## नळदुर्गमध्ये एसआयआर मतदार यादी दुरुस्ती प्रक्रियेत गोंधळ

### प्रशिक्षित बीएलओंची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१४ जुलै -**

नळदुर्ग शहरात सध्या विशेष सखोल पुनरिक्षण अंतर्गत मतदार यादी दुरुस्तीचे काम सुरू असून, या प्रक्रियेदरम्यान विविध अडचणी निर्माण होत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे. मतदार यादी दुरुस्तीचे काम करणाऱ्या बूथस्तरीय अधिकाऱ्यांना (बीएलओ) पुरेसे प्रशिक्षण मिळाले नसल्याने अनेक प्रश्न निर्माण होत असून, मतदारांमध्ये नाव वगळले जाण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एकाच कुटुंबातील काही सदस्यांची नावे वेगवेगळ्या बीएलओंकडे असल्याने नाव शोधण्यासाठी नागरिकांची धावपळ होत आहे. तसेच २००२ च्या मतदार यादीतील कुटुंबप्रमुखाच्या नावाखाली मर्यादित सदस्यांचीच नोंद दिसत असल्याने मोठ्या कुटुंबांतील इतर सदस्यांची नावे पडताळणी करताना अडचणी येत असल्याचे सांगितले जात आहे. या समस्यांवर उपाय काय, याबाबत अनेक बीएलओंनाही स्पष्ट माहिती नसल्याचा दावा नागरिकांनी केला आहे.




मॅपिंग प्रक्रियेदरम्यान काही मतदारांची माहिती 'मिसमॅच' होत असल्याने संबंधित नावे अंतिम मतदार यादीत राहतील का, याबाबतही मतदारांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. काही ठिकाणी बीएलओ प्रत्यक्ष घरोघरी न जाता फॉर्म इतरांकडे देऊन भरून आणण्यास सांगत असल्याची तक्रारही नागरिकांनी केली आहे. प्रत्यक्ष पडताळणी करूनच नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, अशी मागणी होत आहे.

याशिवाय, नळदुर्गमधील काही महिला मतदारांचे माहेर किंवा मूळ वास्तव्य कर्नाटक राज्यात असले तरी त्यांची नावे येथील मतदार यादीत आहेत. अशा मतदारांच्या नोंदणीबाबतही संभ्रम निर्माण झाल्याने त्यांची नावे वगळली जातील की काय, अशी भीती व्यक्त केली जात आहे. या संदर्भातही बीएलओंना स्पष्ट मार्गदर्शन मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

दरम्यान, नागरिकांनी भविष्यातील अडचणी टाळण्यासाठी संबंधित बीएलओंशी संपर्क साधून आपल्या नावाची, कुटुंबातील सदस्यांच्या नावांची आणि आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. तसेच या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी बीएलओंना अधिक प्रभावी प्रशिक्षण व मार्गदर्शन देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## झेडपीच्या विद्यार्थिनींची ६ सुवर्ण, ६ कांस्यपदकांची कमाई; धाराशिव जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची ट्रॉफी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१४ जुलै -**

नवी दिल्ली येथे दि.११ व १२ जुलै २०२६ रोजी आयोजित राष्ट्रीय मार्शल आर्ट क्रीडा स्पर्धा मालिका - ४ व द्वितीय राष्ट्रीय लाठी फेडरेशन चषक स्पर्धेत उमरगा येथील जिल्हा परिषद हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी दैदिप्यमान कामगिरी करत ६ सुवर्ण व ६ कांस्यपदके पटकावली. या शानदार यशाच्या बळावर धाराशिव जिल्ह्याला प्रथम क्रमांकाची मानाची ट्रॉफी मिळवून देत विद्यार्थिनींनी जिल्ह्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला.

देशभरातील विविध राज्यांतील नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतलेल्या या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्पर्धेत १६ वर्षांखालील मुलींच्या लाठी क्रीडा प्रकारात कु. अस्मिता भोसले, आनंदी कांबळे, सृष्टी सूर्यवंशी, गीता गायकवाड, महेश्वरी पालमपल्ले आणि शिवदर्शन शिंदे यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदके पटकावली. तसेच इतर विद्यार्थिनींनी कांस्यपदके जिंकून संघाच्या यशात मोलाची भर घातली.




या अभूतपूर्व यशाबद्दल आ. प्रवीण स्वामी, जि.प. उपाध्यक्षा उषाताई गायकवाड, नगराध्यक्ष किरण गायकवाड, सभापती आकांक्षा चौगुले, जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी प्रियवंदा म्हाडदळकर, शिक्षणाधिकारी डॉ. रवींद्र खंदारे, गटशिक्षणाधिकारी अमोल राजपूत, मुख्याध्यापक पद्माकर मोरे, शाळेतील शिक्षक, पालक आणि क्रीडाप्रेमींनी खेळाडू व प्रशिक्षकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.


### जाहिर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापूर यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र.८७८/२०२६**

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **फराहा नासिर सगरी रा. निलेगाव ता. तुळजापूर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांची स्वतः **फराहा नासिर सगरी** यांचा **जन्म दिनांक.** ०१.०८.२००३ रोजी निलेगाव येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १०.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**नायब तहसिलदार (महसुल),**
**तहसिल कार्यालय, तुळजापूर**

### जाहिर प्रगटन
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापूर यांचे कार्यालय**

**प्रकरण क्र.८६७/२०२६**

**प्रकरण : जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार **नासिर खाशिम सगरी रा. निलेगाव ता. तुळजापूर** येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांची स्वतः **नामे नासिर खाशिम सगरी** यांचा **जन्म दिनांक. १६.०९.१९७५** रोजी निलेगाव येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून पंधरा (१५) दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

**आज दिनांक १०.०७.२०२६ रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.**

शिक्का तहसील कार्यालय, तुळजापूर

स्वाक्षरित/-
**नायब तहसिलदार (महसुल),**
**तहसिल कार्यालय, तुळजापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संक्षिप्त...

## उदगीरात पत्रकार पाल्यांचा सत्कार व शैक्षणिक मार्गदर्शन सोहळा

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १४ जुलै : संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघ मुंबई शाखा लातूर लातूर विभागातील आणि उदगीर, देवणी, निलंगा ,शिरुर अनंतपाळ ,चाकूर ,अहमदपूर, जळकोट तालुक्यातील विविध वर्तमानपत्रात काम करणाऱ्या पत्रकार पाल्यांचा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शैक्षणिक मार्गदर्शन सोहळा दिनांक २६ जुलै २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे पत्रकार बांधवाच्या मुला मुलींनी शैक्षणिक क्षेत्रात मिळविलेल्या उल्लेखनीय यशाचा सन्मान मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राचे लाडके सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे , जिल्हा अधिकारी भारत बास्टेवाड, सिने अभिनेते सयाजी शिंदे संस्थापक अध्यक्ष गोविंद घोळवे विलास बडे संजय आवटे , उपजिल्हाधिकारी. सुशांतजी शिंदे,तहसीलदार राम बोरगावकर गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार , विलास बडे न्यूज १८ बडे मुद्दे, संपादक संजय आवटे लोकमत पुणे आवृत्ती हे विद्यार्थ्यांना शैक्षणिक मार्गदर्शन करणार आहेत.

आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तेव्हा लातूर विभागातील पत्रकार बांधवांनी आपल्या गुणवंत पाल्यांचे नावे सादर करण्यासाठी प्रा. डॉ प्रशांत पाटील, शिरूर अनंतपाळ, वसंत पवार अहमदपूर ,नरेश बिरादार देवणी, इरफान शेख,प्रभुदास गायकवाड उदगीर ,नागनाथ गुट्टे उदगीर, सुधाकर हेमनर चाकुर, माधव पिटले निलंगा, धर्मेंद्र कांबळे हाळी हंडरगुळी मुन्शी खिजोरोदिन,उदगीर धनाजी माटेकर हेर, निवृत्ती जवळे, सुनील मादळे, लक्ष्मीकांत मोरे यांच्याकडे आपल्या पाल्यांची नावे नोंदवावीत असे आव्हान संयुक्त महाराष्ट्र पत्रकार महासंघ जिल्हाध्यक्ष बबन कांबळे सचिव इरफान शेख असे आवाहन केले आहे.

## माता अहिल्याबाई होळकरांनी १२ जोर्तीलिंगाचा जिर्णोध्दार केला : सौ. दापकेकर

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १४ जुलै : माता अहिल्याबाई होळकरांनी १२ जोर्तीलिंगाचा जिर्णोध्दार केला आहे. माता अहिल्या मातेचा इतिहास निविन पिढीला सांगणे महत्वाचे आहे असे विचार शिवकथाकार सौ.स्वातीताई दापकेकर यांनी व्यक्त केले.

एस.टी.कॉलनी नळेगाव रोड मलकापुर येथील नव्यानेच उभारण्यात आलेल्या विघ्नेश्र्वर गणेश मंदिर, केदारेश्र्वर शिवालय मंदिर येथे मुर्ती प्राण प्रतिष्ठापणा व कलशारोहन सोहळ्यानिमित्य शिवकथाकार सौ.स्वातीताई दापकेकर यांची शिवकथेचे आयोजन करण्यात आले.

स्वातीताई यांनी मधाळवाणीतून कथेच्या तिसर्या दिवशी शिवरात्रीचे महत्व विषद केले. शिवकथा ही शिवभक्तीचे भांडार आहे.प्रदोष हा कल्याणकारी आहे मानवी जीवनातील सर्व दोष दुर होतात त्यावृत्ताचे नावच प्रदोष आहे.असे सांगून सर्व वाराच्या प्रदोषाचे महत्व सांगीतले. काशीविश्र्वनाथ तिर्थ क्षैत्राचे महत्व सांगून काशी विश्र्वनाथामध्ये मरण येण्यास भाग्य लागते. जन्मदेणारे आई वडिल निमित्य परंतू करता करविता इश्र्वर आहे. अंतकरणात भाव असेल तर इश्र्वराचे दर्शन निश्र्चित होते. धर्माचरण करणे प्रत्येकाचे कतृव्य आहे धर्मरक्षकरण हे अनंत जन्माची पुण्याई लागते. अहिल्या माताचे हिंदू धर्मरक्षणात मौलाचे योगदान असुन १२ जोतीर्लिंगाचा जिर्णोध्दात अहिल्या मातेनी केला आहे. पालकांनी आपल्या मुलांना मोबाईल पेक्षा संस्कार द्या , थोर महात्मांचे चरित्र वाचायला द्या

माता अहिल्या मातेचे चरित्र सांगा,सावीत्रीबाई, सिंध्दूताईचे चरित्र सांगा ,सावित्री फुले मुळे आज स्री उच्च पदावर आपले कर्तत्व सिध्द करत आहे.

असे सागून पैशाने सर्व सुख मिळवता येईल परंतू समाधन सत्संगानेच मिळते असे शिवकथाकार स्वातीताई दापकेकर यांनी व्यक्त केले.

शिवकथेस मलकापुर उदगीर परिसरातील महिला पुरुष मोठ्या संखेने उपस्थित राहत असुन ही कथा १५ जुलै पर्यंत चालणार आहे. यजमान दिगंबर बिरादार,सुभाष बिरादार,मिथून नरहरे, सुरज राजपाल,किशन राजपाल परिवाराच्या वतीने आरती संपन्न झाली.

## प्रमुख मागण्यांवर नगरपरिषदेकडून लेखी आश्वासन; प्रस्तावित मोर्चा स्थगित

तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १४ जुलै :अहमदपूर शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक प्रभावी व शिस्तबद्ध करण्यासाठी नगरसेविका सौ. तनुजाताई सिद्धार्थकुमार सूर्यवंशी व सम्राट मित्र मंडळाचे अध्यक्ष डॉ. सिद्धार्थकुमार सूर्यवंशी यांनी नगरपरिषद प्रशासनाला ११ प्रमुख मागण्यांचे सविस्तर निवेदन देत मागण्या तातडीने मान्य न झाल्यास नगरपरिषद कार्यालयावर भव्य मोर्चा काढण्याचा इशारा दिला होता.

या इशाऱ्याची गंभीर दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने सर्व मागण्यांवर लेखी उत्तर देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्र्वासन दिले आहे. निवेदनामध्ये शहरात युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबविणे, घनकचरा व्यवस्थापनाची निविदा प्रक्रिया तातडीने पूर्ण करून प्रभावी अंमलबजावणी करणे, सर्व प्रभागांतील नाल्यांची साफसफाई पूर्ण करणे, नादुरुस्त घंटागाड्या तातडीने सुरू करणे, घनकचरा व्यवस्थापन नियम-२०१६ ची प्रभावी अंमलबजावणी करणे, स्वच्छता कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरणे,कर्मचाऱ्यांचा ईपीएफ भरणे, कर्मचाऱ्यांना आवश्यक सुरक्षा साहित्य उपलब्ध करून देणे,कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी सक्तीची करणे, बसस्थानकासमोरील सार्वजनिक शौचालयाची सेवा तातडीने सुरू करणे तसेच शहरातील बंद पथदिवे दुरुस्त करून आवश्यकतेनुसार नवीन विद्युत साहित्य खरेदी करण्याची मागणी करण्यात आली होती.

# ना. बाबासाहेब पाटील यांचे हस्ते महावितरणच्या विविध विकासकामांचे लोकार्पण




तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १४ जुलै : सौर ऊर्जेच्या माध्यमातून विज निर्मिती करावी व सर्वांनीच सौर उर्जेला प्राधान्य द्यावे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी अहमदपूर येथे केले.

अहमदपूर येथे महावितरण कार्यालयामार्फत दहा एमव्हीए ट्रान्सफरचा तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या योजनेतून चार कोटी रुपयांच्या महावितरणच्या विविध विकासकामांचा लोकार्पण सोहळा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या शुभहस्ते संपन्न झाला यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अधीक्षक अभियंता अरविंद बुलबुले हे होते.

यावेळी व्यासपीठावर अहमदपूर पंचायत समितीचे सभापती सुरज पाटील, अहमदपूर नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष अय्याज शेख, शिवाजीराव देशमुख, तुकाराम पाटील विठ्ठल बोडके, अशोक केंद्रे,अझहर बागवान, अश्विन नागराळे, प्रफुल्ल गुंडरे, मुजीब पटेल, हुसेन मणियार आशिष तोगरे,अमित रेड्डी, युसुफ सय्यद, जावेद बागवान, मुजमील सय्यद, हुसेन मणियार, सद्दाम शेख, किरण बारमाळे, अफरोज शेख, प्रदीप कांबळे, सुधीर गुट्टे सुप्रिया भालेराव,गंगाधर ताडमे महेश हंबीर,राजकुमार शिंदे बाळासाहेब बेडदे, अशोक सोनकांबळे,नरसिंग जगताप, चंद्रकांत गंगथडे, प्रवीण रेड्डी सह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की अहमदपूर सह तालुक्यात मागच्या कालखंडात विजेच्या समस्या मोठ्या प्रमाणात होत्या त्या सोडवण्याचा महावितरणने प्रयत्न केला असून, वीज उपकेंद्राची संख्या सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अहमदपूर बस स्थानकाला आता चार्जिंग स्टेशन उपलब्ध झाले असून आता चार्जिंग च्या बसेस आपल्या सर्वांसाठी दाखल होणार आहेत. याचा सर्वांनाच अधिकचा फायदा होणार असल्याचे सुद्धा राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपविभागीय अभियंता दिनेश पाटील यांनी केले यावेळी त्यांनी महावितरणच्या कामाचा आढावा सादर केला. कार्यक्रमाची सूत्रसंचालन अनिल चवळे व माधव माने यांनी केले.

कार्यक्रमच्या यशस्वीतेसाठी महावितरणच्या अधिकारी,कर्मचारी यांनी पुढाकार घेतला कार्यक्रमास अहमदपूर शहरातील विविध मान्यवरांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

## कासलेवाडी मोडला दुचाकी स्वराचा अपघाती मृत्यू



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १४ जुलै : शहरातील समतानगर येथील जानकीराम दयानंद भिमाले ( वय - २८ वर्ष ) या तरुणाचा मोटार सायकल वरून पडल्याने जागीच मृत्यू झाल्याची घटना रविवार दि १२ जुलै रोजी रात्री १० वाजण्याच्या सुमारास लातूरहून शिरूर अनंतपाळ कडे येताना घडली आहे . या संदर्भात शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात आकस्मित मृत्यूची नोंद करण्यात आली आहे

तालुक्यातील कांबळगा ते शिरूर अनंतपाळ रोडवरील कासलेवाडी ( सरफराजपूर ) मोडवरील वळणावर रस्ता लक्षात न आल्याने दहा फुटाच्या खड्यात पडून मृत्यू झाला . रात्रभर कोणाच्या ही लक्षात आले नाही दि १३ जुलै रोजी सकाळी उजेडात मोटारसायकल व जवळ एक तरुण एका एस टी कर्मचाऱ्याला दिसले . त्यानंतर शिरूर अनंतपाळ पोलीसाना कळवून त्याची ओळख पटल्या नंतर त्यांच्या कुंटूंबीयाना कळवून त्यांच्या समक्ष पंचनामा करून सरकारी दवाखान्यात घेऊन शवविच्छेदन करून प्रेत कुंटुंबियाच्या स्वाधीन करण्यात आले . या संदर्भात दयानंद शिवराज भिमाले यांच्या फिर्यादी वरून एडी नंबर २२ / २०२६ नुसार शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे . पुढील तपास पो हे का विद्याधर कोपले करित आहेत .

त्याच्यावर शिरूर अनंतपाळ येथील सार्वजनीक समशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले .

यांच्या पश्र्चात आई - वडील , एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे .

## सुभाष पारशेट्टे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १४ जुलै : धामणगाव तालुका शिरूर अनंतपाळ येथील संत भगवान विद्यालयातील वरिष्ठ लिपिक सुभाष त्र्यंबक पारशेट्टे हे नियत वयोमानानुसार ३० जून रोजी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीच्या ९ जून रोजी आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने विद्यालयातील १४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य रजिस्टर आणि पेन या साहित्याचे डॉ. सुनिताताई चवळे यांच्या हस्ते विद्यार्थींना वाटप करण्यात आले.

यावेळी मुख्याध्यापक रविकिरण साकोळकर, बालाजी चोंडे, संदीप तवडे, गुणवंत कांबळे, आशा खेमे,महादेव वागलगावे, प्रिया बिराजदार, काशिनाथ चव्हाण उपस्थित होते.

यावेळी सुभाष पारशेट्टे यांचा विद्यालयाच्या वतीने भर पेहरावा,शाल, श्रीफळ देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांची आई वडील मुले यांचेही स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बी. व्ही. चोंडे यांनी केले तर आभार पी.बी. बिराजदार यांनी मानले

# जागतिक पेपर बॅग दिनानिमित्त राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने पेपर बॅग निर्मिती प्रशिक्षण




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १४ जुलै : जागतिक पेपर बॅग दिनानिमित्त महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात राष्ट्रीय छात्र सेनेच्या वतीने विद्यार्थ्यांना पेपर बॅग बनवण्याचे व्यापक व्यावहारिक प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे एनसीसी कंपनी कमांडर कॅप्टन डॉ. राम साबदे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे होते. प्रमुख पाहुणे तथा साधन व्यक्ती म्हणून रत्नदीप बालाजी नादरगे उपस्थित होते. कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती स्टाफ सेक्रेटरी डॉ. बी. एस. कांबळे हे होते. सूत्रसंचालन कॅडेट पद्मजा वाडकर यांनी केले तर आभार प्रदर्शन कॅडेट रत्नपारखे करण यांनी केले. या कार्यशाळेत रत्नदीप नादरगे यांनी विद्यार्थ्यांना पेपरपासून बॅग तयार करण्याचे तांत्रिक व प्रायोगिक प्रशिक्षण दिले. सदर प्रशिक्षणात महाविद्यालयातील राष्ट्रीय छात्र सेनेचे सर्व छात्र सैनिक आणि विविध शाखांतील विद्यार्थी सहभागी झाले व त्यांनी विविध आकारांच्या व शैलींच्या कागदी पिशव्यांचे नमुने तयार केले.

या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. मस्के यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. तसेच एनसीसी बटालियन लातूरचे कमांडिंग ऑफिसर कर्नल संतोष नवगन व प्रशासकीय अधिकारी कर्नल वाय. बी. सिंग यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

डॉ. आर. पी. साबदे यांनी आपल्या उद्बोधनात प्लास्टिकच्या अनावश्यक वापरामुळे होणाऱ्या पर्यावरणीय हानीवर जोर देत पेपर बॅगचा वापर वाढवण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष व उपप्राचार्य डॉ. एस. एन. हल्लाळे यांनी विद्यार्थी व उपस्थितांना हा संदेश समाजापर्यंत पोहोचवण्याचे आवाहन केले.

## बालाजी बोबडे पाटील अहमदपूर सोसायटी चेअरमनपदी



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. १४ जुलै : सर्वात मोठ्या अहमदपूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे चेअरमन म्हणून प्रगतिशील शेतकरी बालाजी बोबडे पाटील यांची निवड करण्यात आली तर तुकाराम सांगवीकर यांची व्हॉईस चेअरमन पदी निवड झाली.

१० जुलै रोज निवडणूक निर्णय अधिकारी श्री टापरे यांचे अध्यक्षतेत व सचिव श्री रमेश कांबळे यांच्या उपस्थितीत निवडीची प्रक्रिया पूर्ण झाली. माजी मंत्री विनायकराव पाटील यांच्या ताब्यातील अहमदपूर विविध कार्यकारी सहकारी सोसायटीत जवळपास ६०० शेतकरी सदस्य आहेत. तर एकूण १३ संचालक आहेत.

या संचालकपदी यतीराज केंद्रे, भालके आप्पा, राजीव रेड्डी, विलास पाटील काळेगांव, विजय कदम पाटील, मतीन जहागीरदार, सोमनाथ पुणे, नागेश भुतडा, राजपाल कदम, गंगाधर गायकवाड, उत्तम राठोड, शामल सांगवीकर हे संचालक मंडळ निवडून आले आहे.

या विविध कार्यकारी सहकारी सोसायटीचे स्मार्ट योजने अंतर्गत वेअर हाऊसचे जवळपास एक कोटी चे बांधकाम सुरू आहे. सदरचे काम चांगले व दर्जेदार करून घेणार असल्याचे नूतन चेअरमन बालाजी बोबडे यांनी सांगितले.

# किनगाव परिसरात पावसाने फिरवली पाठ

## दुबार पेरणीच्या भीतीने शेतकरी चिंताग्रस्त



तभा वृत्तसेवा

किनगाव दि.१४ जुलै : जुलै च्या सुरुवातीला झालेल्या दिलासादायक पावसामुळे किनगाव परिसरातील बळीराजा सुकावला होता. आणि त्या जोरावर अहमदपूर तालुक्यात पेरणीला प्रचंड वेग आला होता. कृषी विभागाच्या माहितीप्रमाणे तालुक्यात आतापर्यंत ५७.८ टक्के खरीप पेरणी पूर्ण झाली आहे. मात्र गेल्या ९ ते १० दिवसापासून पावसाने अचानक दडी मारल्याने बळीराजा चिंताग्रस्त झाला आहे. आता सध्या उन्हाळ्यासारखं वातावरण निर्माण झाल्यामुळे तालुक्यातील शेतकरी आता पुन्हा एकदा आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. सुरुवातीला पाऊस चांगला झाल्याने पेरण्या गतीने झाल्या., मात्र पिकाच्या पुढील वाढीसाठी सर्वच मंडळामध्ये मोठ्या पावसाची शेतकऱ्याला प्रतीक्षा आहे. अहमदपूर तालुक्यात सरासरी १२५ मिली लिटर पाऊस झाला. तालुक्यात सुरुवातीला झालेल्या मध्यम स्वरूपाच्या पावसामुळे पूर्वी पेरलेले बियाणे उत्तम प्रकारे उगवून वर आले आहे. परंतु गेल्या नऊ ते दहा दिवसापासून परिसरातील पाऊस गायब झाल्याने पिकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ज्या शेतकऱ्यांनी उशिरा पेरणी केली आहे, त्यांच्या पेरणीच्या योग्य उगवणीसाठी पाऊस गरजेचा आहे. या वर्षी जून महिना कोरडा गेल्याने कापूस लागवडीला उशीर झाला, परिणामी शेतकऱ्यांनी सोयाबीन पेरणीला सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. तालुक्यात गळीत धान्य अंतर्गत सोयाबीनची पेरणी जास्त आहे. सध्या पावसाअभावी पेरणी केलेले पिक करपून जात आहेत ..

# पावसाच्या प्रतीक्षेत शिरूर अनंतपाळचा बळीराजा

## पेरणी झालेला आणि न झालेला दोन्ही शेतकरी संकटात



तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १४ जुलै : शिरूर अनंतपाळ तालुक्यात यंदा पावसाने मोठी दडी मारल्याने बळीराजा दुहेरी संकटात सापडला आहे. तालुक्यातील अनेक गावांमध्ये अद्यापही पेरणी होऊ शकलेली नाही, तर ज्या भागात पेरणी झाली आहे तेथील पिके पावसाअभावी करपू लागल्याने शेतकऱ्यांची चिंता दिवसेंदिवस वाढत आहे.

पेरणी केलेल्या शेतकऱ्यांसमोर आता उगवलेल्या पिकांना कसे वाचवायचे, त्यांचे संरक्षण कसे करायचे, असा गंभीर प्रश्र्न उभा ठाकला आहे. दुसरीकडे, ज्यांची पेरणीच झालेली नाही, त्या शेतकऱ्यांनी बियाणे, खते, मशागतीसाठी मोठा खर्च करूनही पाऊस नसल्याने शेतात उतरता आलेले नाही. योग्य पाऊस कधी पडणार आणि पेरणी कधी होणार, या विवंचनेत ते दिवस ढकलत आहेत.

यंदा अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून किंवा जमवाजमव करून बियाणे, खते व इतर कृषी साहित्य खरेदी केले. शेताची मशागत पूर्ण करून पेरणीसाठी सर्व तयारी केली; मात्र पावसाने पाठ फिरवल्याने हा सर्व वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे पेरणी झालेला आणि पेरणी न झालेला अशा दोन्ही प्रकारचा शेतकरी सध्या चिंतेच्या छायेत आहे.

दररोज आकाशाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांसाठी प्रत्येक दिवस अधिक कठीण ठरत असून, या नैसर्गिक संकटातून मार्ग कसा काढायचा, हा प्रश्र्न अधिकच गंभीर बनत आहे. वेळेत दमदार पाऊस न झाल्यास खरीप हंगामावर मोठे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**पाऊस नाही... पिकाचे काय? - धनंजय शिंदे यांची व्यथा**

कळमगाव येथील प्रगतशील शेतकरी धनंजय बाबुराव शिंदे यांनी वेळेत पेरणी पूर्ण केली. सुरुवातीला उगवणही चांगली झाली; मात्र त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने आता पिके सुकण्याची भीती निर्माण झाली आहे. आता या पिकाचे करायचे काय? ते कसे वाचवायचे? हा प्रश्र्न त्यांना रात्रंदिवस सतावत आहे.

त्यांची ही व्यथा आज संपूर्ण तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांची बनली आहे. पेरणी केलेला शेतकरी पिके वाचवण्यासाठी चिंताग्रस्त आहे, तर पेरणी न झालेला शेतकरी पावसाच्या प्रतीक्षेत हवालदिल झाला आहे. अशा प्रकारची गंभीर परिस्थिती यापूर्वी क्वचितच पाहायला मिळाली असल्याचे अनेक ज्येष्ठ शेतकरी सांगत आहेत. त्यामुळे आता सर्वांच्या नजरा आकाशाकडे लागल्या असून, समाधानकारक पावसाची प्रतीक्षा अधिक तीव्र झाली आहे.

# बीड येथे कृषी विभागाचे 'क्रॉपसॅप' अंतर्गत खरीप हंगाम प्रशिक्षण संपन्न; कीड-रोग नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना करण्याचे आवाहन!

### अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडला उपविभागीय स्तरावर कार्यशाळा; पीक संरक्षणाबाबत तज्ज्ञांनी केले मार्गदर्शन

**बीड ( प्रतिनिधी):** खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पिकांवरील कीड आणि रोगांचे वेळीच सर्वेक्षण व नियंत्रण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागामार्फत विशेष पाऊल उचलण्यात आले आहे. उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय, बीड अंतर्गत 'कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प' (क्रॉपसॅप) या मोहिमेअंतर्गत सन २०२६-२७ च्या खरीप हंगामासाठी अधिकारी व कर्मचारी प्रशिक्षण कार्यशाळेचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. हा कार्यक्रम शुक्रवार, दिनांक १० जुलै २०२६ रोजी सकाळी ठीक १०:०० वाजता अहिल्यानगर रोड, म्हसोबा फाटा येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर अन्न तंत्र व कृषी महाविद्यालय येथे उत्साहात पार पडला.

**सविस्तर प्रास्ताविक आणि उद्देश:**

कार्यक्रमाची सुरुवात उपविभागीय कृषी अधिकारी उद्धव गर्जे यांच्या सविस्तर प्रास्ताविकाने झाली. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात क्रॉपसॅप प्रकल्पाची मुख्य उद्दिष्टे स्पष्ट केली. खरीप हंगामात कापूस, सोयाबीन यांसारख्या प्रमुख पिकांवर येणाऱ्या संभाव्य कीड व रोगांचे वेळेत सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना अचूक सल्ला देणे काळाची गरज आहे, असे सांगत त्यांनी या मोहिमेत गावपातळीवर पातळीवर कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले.

तज्ज्ञ मार्गदर्शकांचे विचार व तांत्रिक सल्ला

या कार्यशाळेत उपस्थित तज्ज्ञांनी उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सखोल तांत्रिक मार्गदर्शन केले.

**डॉ. बी. पी. गायकवाड (शास्त्रज्ञ पीक संरक्षण, केव्हीके खामगाव):** त्यांनी पिकांवरील



विविध कीड प्राथमिक लक्षणांची ओळख कशी करावी, याबद्दल सविस्तर माहिती दिली. हवामान बदलामुळे बदलणाऱ्या किडींच्या प्रादुर्भावावर जैविक आणि रासायनिक नियंत्रण पद्धतींचा समतोल वापर कसा करावा, याचे तंत्र त्यांनी समजावून सांगितले.

**डॉक्टर भानुदास भोंडे (जिल्हा समन्वयक, कृषी महाविद्यालय आंबेजोगाई):** त्यांनी शेतीमधील आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि कीड सर्वेक्षणाची अचूक पद्धत यावर प्रकाश टाकला. क्रॉपसॅप अंतर्गत गोळा होणारी माहिती ही अचूक असावी, जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य मार्गदर्शन मिळण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

**डी.व्ही. जाधवर (कृषी उपसंचालक, जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय बीड):** त्यांनी कृषी विभागाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या धोरणात्मक बाबींवर मार्गदर्शन केले. तसेच, क्षेत्रीय स्तरावर काम करताना कर्मचाऱ्यांनी शेतकऱ्यांशी थेट संपर्क साधून त्यांच्यात जनजागृती निर्माण करावी, जेणेकरून खरीप हंगामात पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल, असा सल्ला त्यांनी दिला.

या जिल्हास्तरीय प्रशिक्षण कार्यक्रमाला कृषी विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची मोठी उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने तंत्र अधिकारी गणेश वाघ, बीडचे तालुका कृषी अधिकारी ए. व्ही. साळी, शिरूर कासार येथील ए. सी. गांगर्डे, तंत्र अधिकारी आर. जी. मगर तंत्र सहाय्यक सय्यद यांच्यासह उपविभागातील मंडल कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहाय्यक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अर्जुन चव्हाण यांनी केले. कार्यशाळेच्या सांगतेप्रसंगी उपस्थित सर्व मान्यवरांचे आणि प्रशिक्षणार्थी कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले. या प्रशिक्षणाचा फायदा आगामी खरीप हंगामात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिकांचे संरक्षण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर होईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

## एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये लोकसहभाग आवश्यक - चंद्रकांत शेळके

**बीड (प्रतिनिधी):-** एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये नागरिकांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे कारण यामुळे प्रशासनाला अचूक, माहिती मिळण्यास मदत होते. या राष्ट्रीय कार्यात नागरीकांचा लोकसहभाग अत्यंत महत्वाचा आहे असे प्रतिपादन तहसिलदार चंद्रकांत शेळके यांनी केले.

बीड शहरातील वार्ड क्र. बीड शहरातील वॉर्ड क्रमांक 25 मध्ये 'एसआयआर मॅपिंग' नोंदणी आणि पडताळणी शिबिराचे आयोजन युवा नेते नगरसेवक अॅड. गोविंदा भैया शिराळे पाटील यांचे जनसंपर्क कार्यालय येथे दि.11 व 12 जुलै रोजी करण्यात आले होते. या प्रसंगी बीडचे तहसिलदार चंद्रकांत शेळके यांना प्रमुख पाहुणे म्हणून अमंत्रित करण्यात आले होते. यावेळी भाजपा नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे पाटील यांनी तहसिलदार शेळके शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

यावेळी तहसिलदार चंद्रकांत शेळके म्हणाले की, स्थानिक रहिवाशांना त्यांच्या परिसराची भौगोलिक आणि सामाजिक परिस्थिती अचूक माहीत असते.नागरिकांकडून बीएलओ, निरीक्षकांना माहिती मिळाल्याने प्रशासकीय कामात पारदर्शकता येते असे सांगून एसआयआर मॅपिंग नोंदणीमध्ये लोकसहभाग महत्वाचा असल्याचे ते म्हणाले.

यावेळी नागरीकांशी संवाद साधतांना लोकाभिमुक कार्यतत्पर नगरसेवक अॅड. गोविंद शिराळे यांनी तहसीलदार चंद्रकांतजी शेळके यांच्या समक्ष प्रशासनाला आवर्जून सांगितले की, राष्ट्र उभारणीच्या या दिव्य कामांमध्ये एक लोकप्रतिनिधी व लोकसेवक म्हणून माझे कार्यालय व येथील सर्व यंत्रणा हे यापुढेही संपूर्ण विशेष सखोल पुनर्निरीक्षण मोहीम संपेपर्यंत प्रभाग क्रमांक 25 मधील नागरिकांसाठी व प्रशासकीय कर्मचाऱ्यांसाठी सतत 24 तास उपलब्ध आहे. यापुढेही कोणालाही काहीही अडचण असल्यास त्यांनी तात्काळ माझ्या 8888555991 या संपर्क क्रमांकावर संपर्क करावा तसेच त्यांना तात्काळ मदत केली जाईल. असे आश्वासन युवा नेते कर्तव्यदक्ष नगरसेवक अॅड. गोविंद भैया शिराळे पाटील यांनी व्यक्त केले. वार्ड क्रमांक 25 व बीड शहरातील ज्येष्ठ नागरिक, महिला, युवक, पत्रकार, डॉक्टर, वकील, समाजसेवक, प्राध्यापक, प्रतिष्ठित नागरिक, वार्ड क्रमांक 25 व बीड शहरातील मतदार यांच्यावतीने, एस आर मॅपिंग शिबिराचे केलेले योग्य अशी बैठक व्यवस्था व सर्व सुविधायुक्त उत्कृष्ट नियोजन याबद्दल वरील सर्वांनी युवा नेते नगरसेवक अॅड. गोविंद भैया शिराळे यांचे कौतुक करून जाहीर सत्कार केला. यावेळी नागरीकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता अजून एक दिवस शिबीराचा कालावधी करण्यात आला. एसआयआर मॅपिंग शिबिर यशस्वी करण्यासाठी बहुमोल परिश्रम घेणाऱ्यांचे अॅड. गोविंद शिराळे पाटील यांनी आभार व्यक्त केले.

## अंबाजोगाई आगाराला मिळाल्या 5 नव्या 'राजमाता जिजाऊ' बस; आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई आगारातील जुन्या आणि नादुरुस्त बसमुळे ग्रामीण भागातील प्रवाशांची होणारी मोठी गैरसोय लक्षात घेऊन नमिता मुंदडा यांनी केलेल्या सततच्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. अंबाजोगाई बस आगारासाठी नव्याने ५ 'राजमाता जिजाऊ' बस उपलब्ध झाल्या असून, यातील दोन बस आगारात दाखल झाल्या आहेत. उर्वरित तीन बस उद्या सकाळपर्यंत पुण्यातून पोहोचणार आहेत. उद्या सकाळी ११ वाजता या नव्या बसचे रीतसर पूजन केले जाणार असल्याची माहिती आगार प्रमुख अमर राऊत यांनी दिलीं .



अनेक दिवसांपासून ग्रामीण भागातील प्रवाशांना जुन्या व खिळखिळ्या झालेल्या बसमुळे प्रवासात प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत होता. प्रवाशांच्या सुरक्षिततेचा आणि सोयीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. नागरिकांची ही रोजची फरफट आणि असुरक्षितता ओळखून नमिता मुंदडा यांनी एसटी महामंडळाकडे नव्या बससाठी सातत्याने मागणी लावून धरली होती. आगाराकडून प्रशासनाकडे एकूण १० नव्या बसची मागणी करण्यात आली होती, त्यापैकी पहिल्या टप्प्यात ५ बस प्राप्त झाल्या आहेत. त्यांच्या या यशस्वी पाठपुराव्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

नव्याने दाखल झालेल्या या 'राजमाता जिजाऊ' बस प्रवाशांसाठी अधिक सोयीस्कर आहेत. यापूर्वी आगारात उपलब्ध असलेल्या गाड्या २ बाय २ आसन क्षमतेच्या आणि ४४ सीटर होत्या. मात्र, आता आलेल्या नव्या बस या ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या असून त्यांची क्षमता ५५ सीटर इतकी आहे. एका बाजूला तीन आणि दुसऱ्या बाजूला दोन आसने असल्याने एकाच वेळी अधिक प्रवाशांना प्रवास करता येईल. या सर्व नव्या बस केवळ ग्रामीण भागातच चालवल्या जाणार असल्याने खेड्यापाड्यातील जनतेला मोठा दिलासा मिळाला असून त्यांचा पुढील प्रवास आता अधिक सुरक्षित आणि सुखकर होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत.

## गुरुकृपा ची सातत्यपूर्ण यशस्वी निकालाची परंपरा कायम. आयुर्वेद महाविद्यालयाचा 94.33% निकाल



**माजलगाव** :- परमपूज्य गुरूमाऊली अण्णासाहेब मोरे आयुर्वेद महाविद्यालय व रुग्णालय, माजलगाव (जि. बीड) येथील प्रथम वर्ष बी.ए.एम.एस. (Batch 2024-25) चा निकाल ९४.३३ टक्के लागला असून महाविद्यालयाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे.

या परीक्षेत महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. त्यामध्ये कु. प्राजक्ता संतोष माने यांनी ७१ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. सायली बाळासाहेब मुंडे यांनी ६९.४१ टक्के गुणांसह द्वितीय, तर कु. तेजल नितीन घाडगे यांनी ६९.११ टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला.

यशस्वी विद्यार्थिनींचा महाविद्यालयात सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या उज्ज्वल यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी, वैद्यकीय संचालक, प्राचार्या व शिक्षकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तापूर्ण अध्यापन, विद्यार्थ्यांची मेहनत आणि पालकांच्या सहकार्यामुळे हे यश मिळाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

## किल्ले धारूर बस डेपो येथे उत्साहात वृक्षारोपण; 'पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज' असल्याचा संदेश!

### नगराध्यक्ष बाळासाहेब जाधव आणि आगार प्रमुख मुळे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत उपक्रम संपन्न

**किल्ले धारूर (प्रतिनिधी) :** वाढते प्रदूषण आणि हवामान बदलाच्या काळात पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी किल्ले धारूर बस डेपो येथे आज एक कौतुकास्पद पाऊल उचलण्यात आले. दिनांक १४ जून २०२६ रोजी सकाळी ठीक ११:०० वाजता डेपो परिसरात भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. "झाडे लावूया, झाडे जगवूया... पर्यावरण संवर्धन हीच काळाची गरज आहे" हा संदेश देत या मोहिमेचा शुभारंभ अत्यंत उत्साहात पार पडला.



**मान्यवरांची उपस्थिती आणि उद्घाटन सोहळा:**

या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचे उद्घाटन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून खालील मान्यवर उपस्थित होते श्री. मुळे साहेब आगार प्रमुख, किल्ले धारूर डेपो श्री. बाळासाहेब जाधव नगराध्यक्ष, धारूर नगरी श्री. चिकसी सर आदर्श शिक्षक आगारातील सर्व सन्माननीय कर्मचारी आणि विविध संघटनांचे पदाधिकारी.

यावेळी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी, पत्रकार आणि स्थानिक नागरिकांच्या हस्ते डेपो परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

**अनोखा सत्कार आणि पर्यावरण पूरक संदेश:**

कार्यक्रमाचे एक मुख्य वैशिष्ट्य म्हणजे, येथे येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत नेहमीच्या पुष्पगुच्छांऐवजी 'एक वृक्ष भेट' देऊन करण्यात आले. सत्कारमूर्तींना रोपटे प्रदान करून निसर्गाप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या अनोख्या सत्काराने उपस्थितांची मने जिंकून घेतली.

झाडे केवळ लावू नयेत, तर त्यांचे संगोपन करून ती जगवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असा सूर याप्रसंगी मान्यवरांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केला.

एस.टी. महामंडळाच्या वतीने राबवण्यात आलेल्या या सुंदर आणि सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या उपक्रमाचे धारूरकरांकडून भरभरून कौतुक होत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कष्ट घेणाऱ्या सर्व आयोजकांचे शेवटी मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

## सोनम वांगचुक यांच्या उपोषणाला अंबाजोगाईतील सजग नागरिकांचा पाठिंबा

### केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी



**अंबाजोगाई :** नीट (NEET-UG) २०२६ परीक्षेतील कथित पेपरफुटी प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रसिद्ध पर्यावरणवादी नेते तथा सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू केलेल्या बेमुदत उपोषणाला अंबाजोगाईतील सजग नागरिकांनी पाठिंबा दर्शविला आहे.

यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांमार्फत केंद्र सरकारला निवेदन देण्यात आले असून, नीट परीक्षेतील कथित गैरप्रकाराची नैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, ३ मे २०२६ रोजी झालेल्या नीट (NEET-UG) परीक्षेतील प्रश्नपत्रिका फुटल्याचा आरोप समोर आला असून, या प्रकरणाच्या निषेधार्थ अभिजित दिपके यांच्या पुढाकाराने देशव्यापी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा म्हणून सोनम वांगचुक यांनी जंतर-मंतर येथे बेमुदत उपोषण सुरू केले असून, त्यांच्या उपोषणाचा १६ वा दिवस सुरू आहे. सलग उपोषणामुळे त्यांची प्रकृती खालावली असतानाही केंद्र सरकारने अद्याप या आंदोलनाची गंभीर दखल घेतलेली नाही, असा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे.

## बीड पोलिसांचे 'डीपआय एआय' राज्यभरासाठी आदर्श ठरणार

### राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीकडून कौतुक

**बीड :** गुन्हे तपास अधिक वेगवान, अचूक आणि तंत्रज्ञानाधिष्ठित करण्याच्या दिशेने बीड पोलिसांनी विकसित केलेल्या 'डीपआय एआय' या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित तपास प्रणालीने राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीची प्रशंसा मिळवली आहे. पोलीस तपास प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करणारा हा प्रकल्प महाराष्ट्रातील आधुनिक पोलिसिंगसाठी नवा मापदंड ठरण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. यासाठी नुकतीच राज्यस्तरीय समिती बीडमध्ये दाखल झाली होती. ही समिती आपला अहवाल वरिष्ठांना सादर करणार आहे.

या प्रकल्पाअंतर्गत गुन्हेगारांचा डिजिटल गुन्हेगारी इतिहास, हिस्ट्रीशीटर, गुंडा रजिस्टरमधील आरोपींची माहिती तसेच संघटित गुन्हेगारीच्या हालचालींचे विश्लेषण करणारी प्रणाली विकसित करण्यात आली आहे. या प्रणालीच्या साहाय्याने एमपीडीए अंतर्गत प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पात्र प्रकरणे तसेच मोक्का अंतर्गत तपासाची आवश्यकता असलेल्या टोळ्या आणि आरोपींची संभाव्य प्रकरणे स्वयंचलितपणे ओळखणे शक्य होणार आहे.

प्रणालीमध्ये Preventive Action Chart, Criminal Antecedent Search आणि Multi-Accused Role Analysis यांसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आरोपींचा गुन्हेगारी इतिहास, गुन्ह्यातील भूमिका आणि संघटित गुन्हेगारीशी असलेले संबंध तपास अधिकारी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. याशिवाय, बीड जिल्ह्यात २०१७ पासून नोंदविण्यात आलेले सर्व एफआयआर आणि ८०० हून अधिक आरोपपत्रांचा (Charge Sheets) समावेश Al Knowledge Base मध्ये करण्यात आला आहे. त्यामुळे तपास नियोजन, कागदपत्रांची निर्मिती, कायदेशीर विश्लेषण आणि निर्णय प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचे प्रभावी सहाय्य मिळणार आहे.

या प्रकल्पात एफएसएल, दूरसंचार सेवा पुरवठादार, बँका आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मसाठी स्वयंचलित अधिकृत पत्रनिर्मिती, लाईव्ह लोकेशन सहाय्य, गुन्हेगारी नमुना विश्लेषण, पुरावा व्यवस्थापन, ऑन-साइट डेटा संरक्षण, ई-कोर्ट समन्वय, समान न्यायनिर्णयांचे विश्लेषण आणि सुरक्षित डेटा साठवण अशा अनेक अत्याधुनिक सुविधांचाही समावेश करण्यात आला आहे. राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीने या प्रकल्पाचे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, कायदेशीर सुसंगती, डेटा सुरक्षा, वापरातील सुलभता आणि तपासातील उपयुक्तता या निकषांवर सखोल मूल्यमापन केले. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकानंतर समितीने DeepEye Al च्या नाविन्यपूर्ण संकल्पनेचे विशेष कौतुक करत, ६५ चाचणी प्रकरणांमधील (Test Cases) तांत्रिक क्षमता आणि तपासातील परिणामकारकत बाबत सकारात्मक अभिप्राय नोंदविला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त संत वामनभाऊ महाराज व संत मदन महाराज दिंडीतील वारकऱ्यांना मोफत अपघात विमा

### भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांचा सामाजिक उपक्रम; स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कडा यांच्या सहकार्याने पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेचा लाभ

**बीड, प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस तसेच लोकप्रिय नेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे बीड जिल्हाध्यक्ष श्री. शंकर देशमुख यांच्या वतीने वारकरी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी एक स्तुत्य सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा कडा यांच्या सहकार्याने पंतप्रधान सुरक्षा विमा योजनेअंतर्गत पंढरपूरच्या वारीसाठी पायी जाणाऱ्या वारकरी बांधवांचा एक वर्षाचा अपघात विमा पूर्णपणे मोफत काढून दिला जाणार आहे. या विम्याचा संपूर्ण प्रीमियम श्री. शंकर देशमुख स्वतः भरणार आहेत.

आषाढी वारीनिमित्त श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे ह.भ.प. संत वामनभाऊ महाराज यांची दिंडी दि. १४ जुलै २०२६ रोजी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली (ता. पाटोदा) येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणार असून, दि. १५ जुलै २०२६ रोजी श्री संत मदन महाराज संस्थान, कडा येथूनही दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. या दोन्ही दिंड्यांमध्ये हजारो वारकरी पायी सहभागी होत असतात. दिंडीचा मार्ग अनेक ठिकाणी राष्ट्रीय व राज्य महामार्गालगत असल्याने अपघाताचा धोका लक्षात घेऊन वारकरी बांधवांना आर्थिक सुरक्षा मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेली पंतप्रधान सुरक्षा विमा योजना ही सर्वसामान्यांसाठी अत्यंत उपयुक्त योजना आहे. या योजनेअंतर्गत अपघाती मृत्यू अथवा पूर्ण कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ₹२ लाख, तर अंशतः कायमस्वरूपी अपंगत्व आल्यास ₹१ लाखांचे विमा संरक्षण मिळते. वारीदरम्यान कोणतीही अनपेक्षित दुर्घटना घडल्यास वारकरी बांधव व त्यांच्या कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा, हीच या उपक्रमामागील भावना असल्याचे श्री. शंकर देशमुख यांनी सांगितले.

या उपक्रमासाठी १४ जुलै रोजी श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड, चिंचोली येथे तसेच १५ जुलै रोजी श्री संत मदन महाराज संस्थान, कडा येथे विशेष नोंदणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात सहभागी होणाऱ्या प्रत्येक वारकरी बांधवाने आपल्या बँक पासबुकची झेरॉक्स प्रत किंवा बँक खाते क्रमांक सोबत आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यावेळी श्री. शंकर देशमुख म्हणाले, "मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस आणि लोकनेत्या मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त समाजोपयोगी कार्य करण्याचा संकल्प केला आहे. वारकरी ही महाराष्ट्राची आध्यात्मिक परंपरा असून त्यांची सुरक्षितता ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक वारकरी बांधवाने या मोफत विमा योजनेचा लाभ घ्यावा आणि सुरक्षित व आनंदी वारी करावी."

मुख्यमंत्री मा. देवेंद्र फडणवीस व मा. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त राबविण्यात येणारा हा उपक्रम वारकरी सेवेला समर्पित असून, वारकरी बांधवांच्या सुरक्षिततेसाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने उचललेले हे एक महत्त्वपूर्ण सामाजिक पाऊल मानले जात आहे.

